साल अखेर " ० " १८
किरकोळ अंकास ८४

Single copy.....

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरें छापेस ८१

वऱ्हाडसमाचार.

Advertisements.
Below 10 lines... 2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 2 JULY 1894 NO 26

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख २ माहे जुलै सन १८९४ इ० अंक २६

ह्या राजश्रीनें केव्हां तरी पळ काढला असावा

एका गृहस्थास त्याच्या धर्मवेडामुळें एका जुलमी सरकारानें कारागृह दाखविला. तो ज्यांत कोंडला होता त्याच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षे हाल काढीत रहावें लागलें. हीं वर्षे संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्याने खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें केल्यामुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची आगळही लावली नव्हती. त्याच्या मनांत घोळूं लागलें कीं, काय मी पळ कां न काढावा? त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फूट उडी जमीनीवर मारली आणि त्या प्रदेशास शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारास एकी कडे ठेवून विचाराची दोरी जर सैल सोडली असती तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत रहावें लागलें नसतें.

ह्या स्वधर्मार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या बिचाऱ्याची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक. त्याला ज्या कारणास्तव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रूपानें जी सर्वांस आवडते त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतों. एक लखक बाई ह्मणते कीं, आज सोळा वर्षे झालीं, पित्त क्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेलें आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेलें ताटास हात लावीन तर शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खावयत नसें, कधीं कधीं मला मळमळ सुटे. पोटाचा नगारा होई आणि तोंडावाटें मोठा घड बेडका येई.

मला फारच त्रासदायक खोकला होऊन व बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर छाटत नसें. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तकवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या डिसेंबरांत माझ्या एका गिऱ्हाइकानें मदर सिजेलचा क्युरेटीव्ह सीरप (माता शिजेलचा रोगहारक पाक) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्या मुळें मी तें औषध घण्यास सुरु केलें. मी थोडे थेंब घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें. आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथरास एक वर्ष सतत जेवल्यावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची दामटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं, ह्या प्रदेशांतल्या बऱ्याच मंडळीनें दुसरें नांना उपाय करून थकले व जेव्हां ह्या शिरपाचा (पाकाचा) उपयोग केला तेव्हां तात्काळ गुण आला. ह्या औषधाचा (ह्मणजे माता सिजेलच्या पाकाचा) मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्या मुळें यावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण बेलाशक छापावें.

मी तुमची
(सही) (मिसीस) एम वार्ड
१९४ इकसटन रोड
शडफर्ड नोटिंगहाम
ता. १ ली माहे एप्रिल सन १८९२

मीसीस वार्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगापासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करितों. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा वाटा सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा ह्मणजे फारच खराब समजावयाचें. कुबेराचे सोबती होणें फारच थोड्याच्या ललाटीं लिहिलेलें असतें. परंतु सुदृढता हा सूर्य प्रकाशसारखी सर्व जगभर जिकडे तिकडे सारखी पसरते तद्वत ही पसरली पाहिजे. ही कमी राखावी हें त्याला अवगत आहे. तर तो त्याची काळजी घेईल व तो दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पचनीय पिंडाचा म्हणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता. जो रोग फारच घोकयाचा व दुःख देणारा आहे कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरिरांतली सर्व अंगें ह्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरण मुळें ह्या रोगाचें विष सर्व शरिरांत पसरतें. ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. ती जें औषध सांगतें त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठमोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेंत कसा तरी वेळ काढीत होते त्यास बाहेर निघून जाण्याची गुरुकिल्ली माहित नव्हती.

जर ह्या ओळी अवलोकन करणारे दुःखाचे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तिच्या सर्वांटीच्या आटाक्यांत लिहिलेल्या पत्रावरून रोगाचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवूं देते. हें आमच्या पत्रव्यवहार करणाऱ्या गृहस्थास लेखावरून समजेल.

D. H.

मिती जेष्ठ वद्य ३० शके १८१६

हवेच्या उपद्रवानें जितकीं मनुष्यें मरतात व लवकर मरतात तितकीं दुसऱ्या कोणत्याही रोगानें मरत नसतील. या पटकीचें मूळ नीच कशांत असतें याचा निश्चयात्मक शोध नाहीं तथापि डाक्टर कॉच यांच्या शोधक व सूक्ष्मगामी परिक्षणानें असा सिद्धान्त ठरला आहे कीं कालऱ्याचें उद्भीज पिण्याच्या पाण्यांतून शरीरांत प्रवेश करितें. एका प्रकारचा अतिसूक्ष्म कृमि आहे. याचें जनन व पोषण पाण्यांतच होतें. हा मनुष्याच्या शरीरांत पेय पदार्थांच्या द्वारें शिरला ह्मणजे त्याचें विष रक्त वाहिन्यांतून सर्व शरीरांत पसरतें, आणि हाग ओकीनें मनुष्य अल्प काळांत क्षीण, अशक्त, व अचेतन होत होत मृत्युगत होतो.

या हवेच्या उपद्रवा संबंधानें वरील प्रमाणें अनेक तर्क आहेत. कांहीं वैद्यांच्या दृष्टीनें हवेतच या रोगाचें बीज आहे. घाणीपासून कालरा उत्पन्न होतोच असें कांहीं नाहीं. परंतु एवढें खरें कीं घाणीनें या रोगाचा प्रसार फार लवकर होतो. 'भिषग्विलास' नांवाच्या मासिक पुस्तकांत या रोगाविषयीं माहिती दिली आहे. त्याच प्रमाणें 'आर्यभिषक्' मासिक पुस्तकांतही मधून मधून कांहीं माहिती या विषयावर आढळते. आह्मी त्या शास्त्रीय विवेचनाकडे वाचकांची जिज्ञासा उत्पन्न करण्या पेक्षां अधीक लिहूं इच्छित नाहीं.

हवेचा उपद्रव झाल्या नंतर त्यावरील औषधोपचार अतां सर्वत्र कमी अधिक प्रमाणानें ठाऊक आहेत. अनेक आडनांवीं रामबाण औषधेंही यावर जाहिरातींतून प्रसिद्ध आहेत. कित्येकांच्या योगानें मध्यम स्थितीतल्या रोग्यास गुण येतो परंतु त्यावर खरोखर रामबाण असें औषध अद्याप उपलब्ध नाहीं. रोगहारक औषधा प्रमाणें रोगप्रतिबंधक औषधें वैद्य व डाक्टर सांगत असतात परंतु त्यांचा उपयोग लोक तादृश करीत नाहीत तेव्हां त्यांचे गुणावगुण आम्हांस कळविता येत नाहींत. परंतु हल्लीं डाक्टर हाफकीन या नांवाच्या गृहस्थांनीं या रोगाला प्रतिबंधक असा उपाय गेल्या दोन वर्षांत योजिला आहे. हा उपाय कांहीं कृत्रिम लसीनें देवी काढण्याचा आहे. या देवी काढण्याची कृति सदर्हु डाक्टरांनीं आपल्या कुलपकिल्ली खाली गुप्त ठेविली आहे. यांच्या देवीचा प्रयोग हिंदुस्थानांतील बहुत स्थळीं करण्यांत आला आहे. कलकत्ता मुनसिपालिटीचा विचार देवी काढण्याचा उपाय त्या शहरीं करून पाहण्याचा आहे. देवीच्या उपचाराची प्रसिद्धी लोकांमध्यें अलिकडे पुष्कळ झाली व पुष्कळांनीं आपखुषीनें देवी काढून घेतल्या आहेत त्या वरून हा उपाय सार्वत्रिक चालूं होईल असाही सुमार आहे. या उपायाच्या जयापजया विषयीं खात्रीनें असें खुद्द डाक्टरांस हा कांहीं सांगतां येणार नाहीं. जशा देवी बहुत, करून प्रत्येक मनुष्याला येतात आणि त्या येऊ नयेत व आल्या तरी त्यांचा जोर कमी व्हावा ह्मणून देवी काढवितात त्या प्रमाणें कालऱ्याचा आजार नाहीं. हा प्रत्येक मनुष्याला होतो असेंच नाहीं तेव्हां कालऱ्यानिमित्त काढलेल्या देवीच्या गुणाविषयीं कांहींच खात्री देतां येत नाहीं शिवाय आमच्या मनांत या देवी काढण्याच्या उपाया विषयीं श्रद्धा बसत नाहीं याचें कारण आमचा विश्वास ज्या डाक्टर व वैद्य लोकांवर आहे त्या पैकी नांवाजलेल्या अशा कोणी गृहस्थांनीं या देवी विषयीं आपलें कांहीं मत लोकांस कळविलें नाहीं. डाक्टर हाफकीन यांनीं आपल्या उपाया विषयीं आमच्या प्रमुख वैद्यांची नीट समजूत घालावी ह्मणजे त्यांचा उपाय पुष्कळजण करितील आणि त्यांच्या औषधाची खरी किंमत कळून येईल.

रोमन बादशाहीचा ऱ्हास होण्यास मुख्य कारण रोमन लोकांचा अरेरावी व मानी स्वभाव होय ते स्वतांस विजयी राज्यकर्ते लेखीत असत आणि प्रजाजनास पादाक्रांत केलेलीं शरणंगत मनुष्यें ह्मणून वागवीत. त्यांच्यावर राज्य करावें आणि तलवार व अधिकार गाजवावा या साठीच आपला जन्म आहे असें ते ह्मणत. आयुष्याचा सर्व निष्कर्ष राज्य करण्यामध्यें होता. प्रजेची सुधारणा करण्याकडे त्यांचा बिलकुल कल नव्हता. जगाचें आधिपत्य आपल्या हातीं असावें असा त्यांचा निश्चयास होता. जगास चांगला धडा घालून द्यावा, जगाचें कल्याण करावें आणि मनुष्यांची स्थिती सुधारावी इत्यादि गोष्टींचा लवलेश रोमन लोकांच्या मनांत खेळत नव्हता. या एककल्ली, स्वकीय वर्चस्वाचा, व इतरांस तृणवत् समजून त्यास आपल्याच सौख्यार्थ योजण्याचा रोमन लोकांचा वर्तनक्रम फार काळ चालला नाहीं. राज्यप्राप्तीची तयारी राज्यक्रांतीला कारण झाली. आपलपोटेपणाचा व स्वार्थदृष्टीचा अतिरेक

नेहमीं असाच आत्मघातक, व मूलच्छेदी होत असतो.

वरील रोमन पादशाहीचा दृष्टान्त सांप्रतच्या इंग्रजी राज्यास चांगला लागूं पडतो. आमच्या ह्मणण्याचा असा अर्थ नाहीं कीं आह्मी या दृष्टान्तानें इंग्रजी राज्याचा ऱ्हास ध्वनित करितों. ईश्वर करो आणि तसें दुष्ट स्वप्न देखील आह्मास न पडो. इंग्रजीचा विनाशकाल ह्मणजे आमच्या देशाचाही विनाशकालच होय. तेव्हां राजनिष्ठेनेंच नाहीं तर स्वार्थदृष्टीनें देखील इंग्रजी राज्य चिरभक्कम व कल्याणप्रद व्हावें हाच आमच्या सर्व मनोराज्यांचा किल्ला आहे. इंग्रजी राज्याची दानत, सत्वस्थपणा, उदार शील इत्यादि कायम आहेत तों पर्यंत आमच्या पादशाहीला कांहीं धक्का नाहीं. परंतु आलिकडे राजकीय सुकाणू कांहीं निराळ्या दिशेनेंच राज्यनौका वहलवीत आहे. हा सांप्रतचा मार्ग आह्मा नेटिवांस मान्य नाहीं. नेटिवांच्या हातीं राज्यसूत्रें देण्यास, त्यांस अधिकारसंपन्न करण्यास, त्यांच्या व्हालंटिअर पलटणी बनविण्यास, व त्यांस आत्मवत लेखण्यास जो पर्यंत आमच्या राज्यकर्त्यांची मनोदेवता वहात नाहीं तों पर्यंत इंग्रजी राज्याची बळकटी पूर्णत्वास पोंचली असें आह्मांस वाटणार नाहीं. विद्या, शक्ति, प्रामाणिकपणा इत्यादि गुणांवर नेटिवांची किंमत ठरली पाहिजे, विलायत व इंडिया हे भूगोलदृष्ट्या भिन्न व दूर आहेत तरी राजकीयदृष्ट्या एकच व निकट संबंधी देश समजले पाहिजेत, आणि वर्ण, धर्म, व देश यांचा नेटिव व इंग्लिश लोक यांच्या मधील निराळेपणा न जुमानतां एका छत्राखालील सारखी हक्कदार ब्रिटिश प्रजा या संज्ञेखाली उभय लोकांचा समावेश केला पाहिजे. या गोष्टी क्षणार्धांत घडल्या पाहिजेत असें आह्मी ह्मणत नाहीं परंतु राजनीतीचा मूळ पाया वरील तत्वावर बसविला पाहिजे. बीज उत्तम पेरलें ह्मणजे वृक्ष व फळें येई पर्यंत वाट पाहण्यास आमच्या आंगीं ताकद आहे. आशा हा सर्व सुखाचें उत्पत्तिस्थान आहे. आणि किंबहुना आशा हेंच सर्व सुख आहे. वरील दृष्टान्तानें आमच्या राज्यकर्त्यांस कोणत्या गोष्टी बंद केल्या पाहिजेत हें कळलें ह्मणजे आमच्या लेखाची सार्थकता झाली. इतिहासाची खरी योग्यता भविष्यकालाला मार्गदर्शक धडा घालून देण्यांत असते. आणि रोमन पादशाही पासून आह्मांस व राज्य कर्त्यांस सुद्धां पुष्कळ गोष्टी शिकण्या सारख्या आहेत. सांप्रतच्या राज्यकर्तृत्वाची शैली किती या देशाला अपायकारक आहे हें पृथकपृथक उदाहरणें देऊन व्यक्त करण्याचें विशेष प्रयोजन आह्मांस दिसत नाहीं कां कीं तीं उदाहरणें भिन्न भिन्न प्रसंगीं विशेष खुलाखुलीनें सांगण्यांत पूर्वींच आलीं आहेत.

कामन्स सभेचा स्टेट सेक्रेटरी मि. फौलर यांनीं सिव्हिल सरव्हिस परिक्षेच्या प्रकरणांत मोठा अपमान केला आहे. विलायतचे लोक आणि मुख्यत्वें करून नामदार पाल आदिकरून लोक स्टेट सेक्रेटरीच्या ठरावावर स्वस्थ बसतील असें आह्मास वाटत नाहीं नामदार पाल यांनीं मि. फौलर यांस असाही टोंक मारला कीं कामन्स सभेला आपला सिव्हिल सरव्हिस परीक्षविषयींचा ठराव रद्द करण्यास लावावा. मि. फौलर यांच्या कारकिर्दीचा ओनामा फार वईट झाला. त्यांनीं आपल्या ठरावांत महाराणी सरकारच्या जाहिरनाम्याला हरताळ लाविला. लोकमताचें प्राबल्य त्यांच्या ठरावानें निर्मूळ होण्यासारखें नाहीं. या देशावर त्यांनीं आपल्या ठरावानें अत्यंत अपकार केला आहे त्याचा प्रतिकार होईपर्यंत आह्मी स्वस्थ बसणार नाहीं. आह्मी नाउमेद, निराश, व निष्कार्य राहणार नाहीं. अखेर दाद मिळेपर्यंत आह्मी सर्व राष्ट्रवाले रडूं आणि आपल्या हक्काचें रक्षण करूं व इंग्रजी राज्यावरील काळिमा दूर करूं. सिव्हील सरव्हिस इंडियांत होऊं नये याला कारण काय? कारण हेंच कीं इंडियांत परीक्षा घेतल्यानें नेटीव लोक मुख्य राज्यकारभाराच्या जागा पटकावतील, युरोपियन अधिकारी राष्ट्राच्या संरक्षणानिमित्त पाहिजेत तितके देशांत राहणार नाहींत आणि त्या मुळें इंग्रजी राज्याला देखील धक्का पोंचेल!

वरील कारण सयुक्तिक व यथायोग्य क्षणभर मानिलें तर त्या पासून इंग्लिश लोक राज्यसूत्रें नीट चालवूं शकतील परंतु त्या व्यवस्थेनें काळे व गोरे या लोकांचा एक मिलाफ होण्याचा कांहींच रंग नाहीं. उभय लोकांमधील निराळेपणा हरएक प्रकरणांत राज्यकर्ते आपल्या कृतींनीं जाणवतील आणि ब्रिटिश प्रजेचे हक्क व अधिकार हे आंग्लो-इंडियन आम्हास कधींच मिळूं देणार नाहींत. हा दुही कायमपणें माजविण्याची राजनीती आतां बंद करण्याचा काल समीप आला आहे. आम्ही म्हणतो कीं आमच्या लोकांस राज्यकारभारांत फारसें शिरूं द्यावयाचें नसेल तर काहीं हरकत नाहीं; पण त्याच्या मोबदल्यांत आमच्या लोकांस विलायतेस मोठमोठ्या हुद्द्याच्या जागा देण्याचा नवीन परवाना मिळाला पाहिजे. परीक्षेच्या कसाला जे टिकतील व विलायतेस जे लोक जाऊं शकतील त्यांस विलायतेस भारी पगाराच्या जागा देत जाव्या आणि इंडियांतील जागा इंग्लिश लोकांस द्याव्या. या व्यवस्थेनें परस्परामध्यें दळण वळण विशेष होत जाईल, रूप व एकोपा दुणावेल, आणि परिणामीं उभय देश ब्रिटिश राज्याखालीं एकस्वरूप व एकजीव होतील! परंतु हा विचार कबूल कोण करणार! सर्व सत्ता आमच्या राज्यकर्त्यांच्या हातीं आहे आणि सत्ते पुढें शहाणपणाची काय मात्रा! आपल्या सौख्याचा, वैभवाचा व भाग्यशालीपणाचा वांटा आमचे स्वार्थसाधु आंग्लो इंडियन राज्यकर्ते नेटिव लोकांस संतोषानें देतील असें आम्हास वाटत नाहीं तेव्हां त्यांच्या तोंडांत साखर घालून आम्ही आपला कार्यभाग प्रयत्नाच्या सातत्यावर साधून घेतला पाहिजे.

✓ सलामाचें वेड कित्येक युरोपिन अधिकाऱ्यांस असतें. वऱ्हाडांतले असले वेडेपीर पुष्कळ नाहींत असें नाहीं. परंतु त्या भाबेराव अधिकाऱ्यांच्या तोंडाला तोंड देऊन त्यांची चूक त्यांच्या पदरांत घालण्या सारखें कोणी खंबीर, जोरदार, व निर्भिड गृहस्थ अद्याप कोणी झळकले नाहींत. ह्मणून असले घेर घेर या प्रांतांत पुष्कळ गोरे अधिकारी चालवीत असतात. व्याघ्राचें कांतडें पांघरणारे असे थोर अधिकारसंपन्न पुरुष पंजाबांत नुकतेच जगा समोर आले आहेत. मि० सिलकाक नांवाचे कोणी गृहस्थ पंजाबांत डेपुटी कमिशनर आहेत. यांस राव बहादूर बक्षिराम रामसिंग एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर यांनीं सलाम केला नाहीं ह्मणून सिलकाक यांनीं त्यांस घोड्यावरून खालीं उतरविलें आणि त्यांचा बहुत अपमान केला. मि० हारिसन हे एकाची दाढी उपटल्या बद्दल पंजाबांत बडतर्फ होऊन फार काळ लोटला नाहीं तोंच हें दुसरें उदाहरण घडलें. राव बहादूर बक्षिराम यांस तें सहन न होऊन त्यांनीं फौजदारींत फिर्याद केली असून तोंडी माफी ते कबूल करीत नाहींत. हें प्रकरण ते पक्कया निकालाला पोंचविणार आहेत. विहितच आहे कीं:——

॥ न तेजस्वी साहे प्रकट परतेजोबल मदा॥

मि. एटकिन साहेब व वैदर्भकार

मनुष्यास एखादी वस्तु आवडेनाशी झाली ह्मणजे तिचे ठायीं असणारे सर्व गुण त्यास दोषरूपी भासूं लागतात व इतकें करूनही जर त्याचे मनाची तृप्ति झाली नाहीं तर तिजसंबंधानें हवे तसे मिथ्यारोप करण्या विषयीं तो प्रवृत्त होऊं लागतो. तद्वत वैदर्भकार यांनीं ता० ९ जूनचे अंकांत मि. एटकिन साहेब यांज विषयीं लिहितांना केवळ आपली लालसा तृप्त करण्या करितां बराच सत्यापलाप केल्या सारखा दिसतो. वैदर्भकार यांनीं मि. एटकिन साहेब यांज विषयीं एकतर्फी जें नुसतें दोषाविष्करण केलें आहे त्याचें आतां खंडन करित बसणें म्हणजे बेरंच समयबाह्य होणार आहे तथापि त्यांचे मतानुरूप असणाऱ्या दोषनिदर्शनांत साहेब मजकुरां वर जो कृतघ्नतेचा आरोप त्यांनीं लादला आहे तो मात्र सर्वथैव मिथ्या आहे हें वाचकांस कळविल्या वांचून आमच्यानें राहवत नाहीं. रा० ब० जठार यांचें सन्मानार्थ टौनहालांत सभा भरली होती व ते समयीं साहेब मजकुर दृष्टिगोचर झाले नाहींत हें सर्व बरपंगी बरोबर आहे परंतु सभा भरण्याचे आदले दिवशी मि. एटकिन साहेब राव बहादुरास स्वतः भेटले व त्यांनीं त्यांजपाशीं प्रांजळ पणें सांगितलें कीं "आपले सन्मानार्थ टौनहालांत उद्य जो समारंभ होणार आहे तेवेळीं माझे न येण्यानें कदाचित आपल्यास बरें वाटणार नाहीं परंतु मी आपल्यास उघडपणें सांगतो कीं माझ्या निराशे मुळें उद्याचा समारंभ मला फार दुःसह होईल तथापि मी यावेंच अशी जर आपली ईच्छा असेल तर माझ्याच्यानें आपलें मन मोडवणार नाहीं." यावर रा० ब० यांनीं "आपण येण्याचें कारण नाहीं" असें सांगितलें त्या वरून साहेब सभेस आले नाहींत. तसेंच रा० ब० स्टेशनावर जाण्यास निघण्याचे पूर्वीही साहेब मजकूर त्यांस एकांत समयीं भेटले होते. या उभय गोष्टी वरून वैदर्भकार यांनीं साहेब मजकूर यांजवर लादलेला कृतघ्नतेचा दोष मिथ्या आहे हें वाचकांचे ध्यानीं येईल.

The Berar Samachar

MONDAY JULY, 2, 7 1894

The State of Secretary's resolution on the question of Simultaneous Examinations was a foregone conclusion. The defeat of the Home-Rule Bill did not predict for the Indian problem a better success before the despotic battery of a highly centralized and bereaucratic government. But in moments of disappointments we feel most the sting and realize our position in the true light of stern realities. The dis-heartening resolution depicts a gloomy horizon but our full trust in the good name of our rulers sends us a ray of hope. We would not be dupes of a future day but we have a loyal and constitutional way of appealing against the resolution. All our hopes and battlefields lie in the House of Commons—the highest source of justice and redress. Heavy disappointments bring on however a temporary lethargy. But the hour makes the man.

The Poona Sarvajanic Sabha has vigorously led a crusade against the resolution. For its right earnest attempts at awakening national activity the Sabha deserves a cordial vote of thanks. The resolution is a summary of the philosophies of the narrow—minded, selfish and despotic Anglo—Indians and the protest of the public meeting at Poona at once brings the question to a narrow point. We would frame in the eloquent words of Lord Dufferin a simple question:—whether or not, will the English people regard with approval and goodwill our natural ambition to be more extensively associated with the rulers in the administration of our own domestic affairs? On the issue of this question rests the permanency or otherwise of the benign English rule.

MR. AITKEN'S REPLY

(Concluded from our last no. 25)

Be always reverent. There is a great deal in the word reverence, but I cannot adequately speak on it now, as I must not be tedious. I can only say a few words. There is a great deal of irreverence in the world at present.

Through the rapid spread of knowledge and the advances made in science, men have, for some years past, been throwing off the old religious beliefs, and the self-restraints which those beliefs inculcated, not only in India but all over the world. The leading professors of science have much to answer for. The last twenty years they have done their best to overturn men's belief in a Supreme Intelligence A few years ago, they reached a high pre-eminence, and were regarded as almost infallible authorities, and the great mass of men, too busy or too careless to think on serious things for themselves, were only too glad to believe, without questioning, what the professors taught, to use a familiar phrase, they shut their eyes, and opened their mouths, and swallowed all that was given them. But a reaction is setting in. Men are becoming tired of listening to assertions without the smallest particle of proof, such as the following, one of Professor Huxley's recent utterances, that living matter differs in degree only, and not in kind,

from dead matter, or, to tâke another that one long chain of causation connects the nebulous originals of sun and planets with the protoplasinic foundations of life and organization. Such dogmatic assertions, and nebulous utterances, are proving too much for the patience of men, and signs are not wanting to show that the professors themselves, feel that they have been on false gronnd, and, having failed to find what they have been trying to find and will never find they are being forced back, however unwillingly, to the acknowledgment of a first Great Cause, an all pervading, all controlling, Supreme Intelligence whom they have so long striven to deny. Biologists have succeeded in tracing life back to its simplest and earliest forms, but they are still as far off as ever they were, from knowing what life is. It, therefore, ill becomes a man to boast of his knowledge, and to vaunt his unbelief in this and in that.

We are surrounded by mysteries, and it becomes us to ponder them humbly and reverently, as in the presence of a Power higher than man. If you will only keep your eyes open, and your minds active, you may observe many of those mysteries for yourselves, and they will make you think. They are on all sides of you; and I could mention many, but I will only mention one. The small black ant is very active just now, filling its storehouse, and may be seen carrying dead bodies or bits of dead bodies, of insects, up the walls. In proportion to its size an ant's strength makes the strength of an elephant sink into insignificance. But it sometimes happens that an ant finds itself carrying more than it can with safety, and it gets into difficulties, and, yesterday, I was interested in observing an ant trying to carry a piece of matter which was evidently more than it could manage, up the wall of my room. Finding itself in danger of falling, it signalled, how I do not know, to an ant running about near, and that ant ran to its assistance, and the two put their heads together, and consulted as to how they could take hold of the piece of matter so as to divide its weight between them. They tried first one way and then another, and at last they succeeded, and carried their burden up the perpendicular wall, easily, and rapidly. Tnat small ant viewed microscopically, is seen to be a perfectly organized structure.

That is surely marvellous enough, but what about the intelligence? whence came it?

These may seem simple things, but they make the thoughtful ponder.

By cultivating a habit of reverent thinking, it will come natural to you to show reverence to those who have a right to expect it from you, the aged, your parents, and your teachers. And you will also learn that there is a reverence due to your equals, that you ought to behave towards them with consideration for their feelings and opinions. Cultivate reverence; it is beautiful in old and young.

And to all of you gentlemen who are fighting life's battles, I would say, life is real, life is earnest, life is beautiful. Fight the gold fight. Quit you like men. Never yield to sorrows or contradictions.

And now, gentlemen. students, and pupils, old friends and young friends, in bidding you all farewell I will conclude by reciting an English translation of a short poem by Goethe one of the greatest of Germans, encouraging all who are inclined to despond, through failing to realize that life is beautiful, and that they ought to live happy, by directing you to look beyond yourselves to a power higher than man, who watches over you and cares for you,

The Future hides in it
Gladness and sorrow,
We press still thorow
Nothing that abides in it,
Daunting us—Onward.
And solemn before us
Veiled, the dark Portal
Goal of all mortal;
Stars silent rest o'er us,
Graves under us silent.
While earnest thou gazest,
Comes boding of terror,
Come Phantasm and error,
Perplexes the bravest
With doubt and misgsving.
But heard are the Voices,
Heard are the Sages
The worlds and tLeAges,
"Choose well—your choice is
Brief and yet endless."
Here Eyes do regard you
In eternity's stillness,
Here is all Fullness
Ye brave, to reward you:
Work work, and despair not,
Farewell

Sir W. Hunter has contributed an able article to the last number of 'India.' The tone is impartial, the style persuasive and elegant, and the main subject a well balanced retrospect of the present Indian problems. We cannot do to—day full justice to it but would like to advert our reader's attention to the position the Englishmen and Natives hold in the estimation of tLe well-known writer. He remarks thus:—

"What strikes an impartial observer most is not the difference between Englishmen and Indians but the resemblances Possibly the average Hindu intellect is more subtle and active than the average English mind, but the distinction, if it exists, is not very conspicuous Nor have I ever been able to perceive much difference in what may be called the moral qualities of the mind. People that have been long "held down" do not exhibit the same vigorous self assertion which we find in conquering races. It is procable that perjury is more rampant in Criminal Courts in India; but if we look to the County Courts or the Divorce Court it will be found that Englishmen pretty well hold their own There is, however, one marked difference between the Oriental and the Western mind that is most impressive There is simply no comparison between Englishmen and Hindus with respect to the place occupied by family interests and family affections in their minds. The love of parents for children and of children for parents has scarcely any counterpart in England Parental and filial affection occupies among our Eastern fellow-citizens the place which is taken in this country by the passion between the sexes. Love as depicted in English novels, plays a small part in Indian society, for the choice of a mate is not often left by Indian custom to the parties concerned; but its absence is more than made up by the intensity of the attachment that exists between members of the same family. The "Family" in the old sense of the word still exists in India; in England, it is a very different institution. The romance of Indian life is the romance, not of the individual, but of the family. There is good and there is evil in both systems, but it is far from certain that the advantage is wholly on the English side."

वऱ्हाड.

हवामान—हल्लीं मनस्वी उकडतें. पावसानें थोडा हिरमोड केला परंतु वर्तमान चिन्हां वरून पुन्हा कृपादृष्टी होईल असा रंग दिसतो. शुक्रवारीं एक दोन सरी चांगल्या पडल्या. एकंदर पाऊस ४। इंचावर झाला आहे. रोगराई विशेष म्हणण्या सारखी नाहीं.

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. एजुक्यूशनल इनस्पेक्टर हे रजेवरून परत आपल्या कामीं रुजू झाले. गेल्या रजेंत त्यांनीं पुण्याच्या वसंतोत्सव व्याख्यानमालेत थोडा भाग उचलला होता; आणि त्यांच्याच अध्यक्षते खालीं येथील वर्षोत्सवव्याख्यानमाला लवकरच सुरू होईल.

येथील हायस्कुलांतील ५० रुपयांचे असिस्टंट रा. रा. बळवंत यादव खोलकुटे बी. ए. यांची सेशन कोर्टांत कायमची नेमणूक झाल्या मुळें त्यांच्या जागीं रा. रा. गणपत रामचंद्र दामले बी. ए. यांस नेमिलें.

यवतमाळचे नायब तहशिलदारीवर पंधरा महिन्यांचे मुदती साठी जुडिशिअल कमिशनरचे क्लार्क रा० रा० यशवंत रामभान आंसेगांवकर पाटील यांस नेमिलें आहे.

कर्नल मेकंझी साहेबांचे क्लार्क आफ कोर्ट रा० रा० रघुपत मोहनराव यांस तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

त्या रजेंत बुलढाणा डेपुटी कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट रा० रा० विष्णु रंगनाथ शेंबेकर यांस कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट नेमून बुलढाण्यास यवतमाळचे क्लार्क आफ कोर्ट मि० सैफुद्दीन खान यांस बदलिलें. यवतमाळास रा० रा० वासुदेव विठ्ठल चांदेकर यांस बदलून त्यांच्या उमरावतीच्या क्लार्क आफ कोर्टच्या जागीं रा० रा० हरिहर काशिनाथ यांस नेमलें.

कर्नल मेकंझी कमिशनर यांची स्वारी गेल्या शुक्रवारीं दिवसाच्या गाडीनें हैदराबादेस गेली आहे आणि नंतर त्यांचा विचार रजेवर विलायतेस जाण्याचा आहे. त्यांस पोंचाविण्या साठीं मि० हेअर शेगांवपर्यंत गेले होते.

पंढरपूरच्या आषाढी यात्रेला लोकांनीं जाऊं नये अशा विषयीं सरकारची योजना चालूं आहे. पंढरपुरास गर्दी होउन पटकीचा उपद्रव फार वाढेल आणि तिचा प्रसार सर्वत्र होत जाईल अशी भिती आहे.

अकोल्याचे दवाखान्या वरील डाक्टर दुगिट्या यांनीं एक महिन्याची रजा कमी केल्यावरून त्यांचे रजेंतले डाक्टर रा० रा० शिवराम बाळकृष्ण यांची तळेगांव दशसहस्रास बदली झाली.

वाशिमचे असि० कमि० मि० मारिस हे रजेवर गेल्यामुळें त्यांच्या जागीं यवतमाळचे ए० असि० कमिशनर रा० रा० गणेश बापूजी यांस वाशिमास बदलिलें.

आषाढी एकादशी व मोहरम हे एकाच वेळीं आल्यामुळें हिंदु मुसलमान तंटा होऊं नये ह्मणून आमचे लोकप्रिय व दूरदर्शी डेपुटि कमिशनर मि० हेअर साहेब यांनीं असा हुकूम दिला आहे कीं उभय जातीच्या लोकांनीं देवळें व मशिदी यांच्या समोर पंचवीस कदम पर्यंत वाद्यें वाजवूं नयेत.

मि० हैदर अली अब्बासी हे गेल्या बुधवारीं येथील कामावर रुजू झाले आणि त्यांच्याकडे खातें नंबर ३१ व पहिला वर्ग मानिस्ट्रेटचे काम सोंपविलें आहे.

कर्नल मेकंझी साहेबांच्या रजेंत मि. बुलक कमिशनर होतील व आमचे विद्वन्मणि मि. आबर्ड हे जुडिशिअल कमिशनर होतील कां कीं या रजेच्या स्वल्प मुदती साठीं कर्नल स्पानकी जुडिशिअल कमिशनर होऊं इच्छित नाहींत. मि. हेअर डेपुटी कमिशनर हे सिव्हील व सेशन जज्ज होतील असें वैदर्भीकार म्हणतात.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहीरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. ता १९ मिसल नंबर ११

१८९४

विद्यमान सिविल जज्ज साहेब जिल्हा अकोलें. यांचे कोर्टांत

नांव न्यू वलद हुकूमचंद आ० पा० करणार मातुश्री.

गणा जवळ हुकूमचंद रहाणार उकळी तालुके अकोट जि० अकोला यांस मयत.

हुकूमचंद बापाचे नांव किसनदास रहाणार उकळी तालुके अकोट जि० अकोले या चे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावे ह्मणून सदरहु अर्जदार याणे अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणुन ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यानीं तारीख ७ माहे जुलई सन १८९४ इसवी रोजी सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २७ माहे जून सन १८९४ इसवी.

शिक्का

V. N. Dandeker.

सिव्हिल जज्ज.

वर्तमानसार.

स्त्रियांना आनिती पासून परावृत्त करण्या करितां लंडन येथें बायकांची एक मंडळी स्थापन झाली आहे. अशी मंडळी येथें स्थापन होईल का?

शिकागो शहरांत २,७२६ पोलिसाचें लोक शहरच्या बंदोबस्ताकरितां आहेत.

औरंगझेब बादशाहाचे कारकीर्दीत लाहोर सुभ्याचें (लाहोर प्रांताचें) उत्पन्न सालीना २॥ कोट रुपयांचें होतें. असा पूर्वीचा हिशेब काढून बघतां समजतें.

भारतमित्र नांवाच्या हिंदी पत्रांत बिहार येथील एक चमत्कारिक हकीकत प्रसिद्ध झाली आहे ती अशी:— शाहाबाद जिल्ह्यांतील एका गांवांत एक शेतकरी आपल्या साथीदारासह भर दोन प्रहरीं शेतात नांगर चालवीत होता. इतक्यांत एकाएकीं एक एक भयंकर वेष धारण केलेला पुरुष तेथें आला व तो शेतकऱ्यास ह्मणाला, 'अरे दुष्टा! तूं हें काय करतोस? जो बैल जगाचें पालन करणारा व माझें वाहन आहे, त्याला ऐन माध्यान्ह समयींही तूं चैन पडूं देत नाहींस, करितां तुला व तुझ्या या गांवास आतां भस्म करून टाकतो.' असें शब्द ऐकतांच तो शेतकरी घाबरला व नांगर सोडून गांवांत पळाला. आणि गांवांतील लोकांस असें सांगून लागला कीं, 'माझ्या शेतांत श्री शंकरजी प्रगट झाले आहेत.' तें ऐकून गांवांतील सर्व लोक तेथें आले. पण त्यांना शेतांत महादेव तर कोठें दिसले नाहींत परंतु त्या शेतकऱ्याचा साथीदार व नांगराचे बैल जमिनींत घुसलेले त्यांच्या दृष्टीस पडले. त्यावेळीं लोकांनीं एकाग्र चित्तानें परमेश्वराची प्रार्थना केली तेव्हां ते बैल व तो मनुष्य वर आला. पुनः त्याच दिवशीं रात्रीं शेतकऱ्यांस असा दृष्टांत झाला कीं, त्याला श्री शंकरजीनीं प्रगट होऊन असा उपदेश केला कीं, या देशांतील सर्व शेतकऱ्यांनीं जाऊन एकवार गंगेचें स्नान करावें व त्यांनीं आपलीं शेत कोर्षी सर्व हत्यारें धुवून काढावीं. व आतां यापुढें गोरक्षणाचा चांगला बंदोबस्त करावा. असें केलें तरच सर्वांस क्षमा करण्यांत येईल. यावरून एके दिवशीं सर्व शेतकऱ्यांनीं मोठा मेळा केला. त्यावरून तत्प्रांतीय सर्व इंग्रज लोक फार घाबरून गेले. शिवदर्शनाचा चमत्कार खरा असो किंवा खोटा असो, पण बिहार प्रांतांतील लोक गोरक्षणाचें कामीं जिवावर उदार झालेले दिसतात येवढें मात्र खरें. हा काय प्रकार असेल तो असो.

हिमालयावर गंगेच्या उगमाजवळ गोहोना येथें मोठाले डोंगर कोसळून एक मोठा तलाव झाला आहे. त्यांत हल्लीं २००।२५० फूट पाणी झालें असून तें कोणीकडून केव्हां फुटेल व किती प्रदेश वाहून जाईल अशी भीति वाटूं लागली आहे.

मुंबईच्या अफू मक्तेदाराची अब्रु घेणारे मि. प्रौचेचे जोडीदार मनसुकलाल यांसही माजिस्त्रेटानें अपराधी ठरवून २५० रुपये दंड केला व त्यांपैकीं २०० रुपये फिर्यादीस देण्याचें ठरविलें. तसेंच मि. डायर यांस २०१ रुपये दंड करून त्यां पैकीं १५० रुपये फिर्यादीस दिले व मि. हडसन यांस फक्त २० दंड केला.

दावणगेरी येथें एका तीन वर्षाचे मुलीला नाहाण आलें आहे, एवढेंच नव्हे, तर ती दर महिन्याला विटाळशी होते व तारुण्याचीं चिन्हेंही तिच्या अंगीं दिसूं लागलीं आहेत, असें गदगचे एका पत्रांत लिहिलें आहे!

क. त.

सरहद्दीवर व जिरिस्थान येथें पुन्हा चोऱ्या व दरवडे होऊं लागल्याचें कळतें.

निदान सहा महिने तरी कापडावर जकात बसत नाहीं असें पायोनियर ह्मणतो.

बुद्ध—गया येथील बुद्ध मंदीर हें विष्णूच्या नवव्या अवतारांचें असल्यामुळें त्यावर हिंदूंचेच स्वामित्व आहे असें ठरलें.

कित्येक लुटारू लोकांनीं बल्लारी येथील कलेक्टरची तिजोरी लुटल्याचें कळतें. अद्याप त्यांस धरल्याचें समजलें नाहीं.

इंग्लंड सरकाराच्या १८६५ च्या पोलिसच्या पांचव्या आक्टांत एक अगत्याची सुधारणा करण्याचा विचार व्हाइसराय करीत असल्याचें कळतें.

रेलवेच्या इंजिनांतील धूर, बाहेर न पडतां आंतच मुरला जावा अशी एक युक्ति, आस्त्रेलियांत एकानें काढली आहे. खरी असेल तर फारच उपयोगी आहे.

रुप्यासारखी 'अल्युमिनम' नांवाची एक नवीन धातु शोधण्यांत आली असून ती पुष्कळ स्वस्त पडेल असें ह्मणतात. या धातूच्या, कागदाच्या नोटाप्रमाणें परंतु कागदाहून उत्तम नोटा करतां येतील अशाबद्दल शोध चालू आहे. ही धातु फार हलकी चेंबट व सफेदार आहे. स० वि०

बडोदें सर्वे सेठलमेंट मधील क्याशबाक्स चोरांनीं नेली वाहवारे पोलीस!

नायबदिवाण कचेरींतील कारकुनाचें पागोटें भरदिवसा गेलें वाहवारे पाहरेकरी!

पावसानें धुपाळी केली. वेरावळ रेलवेचा भाग धुऊन गेला.

मुंबईच्या रक्षणा करितां आतां १८२९ पोलीस संख्या झाली.

हिंदुस्थानांतील आगगाड्यांवर सर्व जातीचे मिळून एकंदर १७८३६२ नौकर आहेत.

कोल्हापूर इलाख्यांत पन्हाळगडावर पाराशर ऋषीची गुहा असून त्यांत कोणी योगी राहतो.

बडोदें सरकार आपले राज्यांत कांचेचा कारखाना काढणार आहेत, विलायतचा एक गोरा या कारखान्यावर लवकरच येईल. कांहीं दिवस त्याची चैन चालणार.

म. मि.

जबलपूरच्या पश्टणींतले तीन गोरे होडींत बसून एका खडकावर जात असतां त्यांस मधमाशांनीं गांठून त्यांची गाळण केली. एकानें नदींत उडी टाकली व बुडाला. दोघे इस्पितळांत आहेत.

चालू वर्षाच्या आक्टोबर, नोवेंबर व दिसेंबर या तीन महिन्यांत हिंदुस्थान सरकाराकडून अफूच्या पेट्या ३,१०५ विकल्या जाणार आहेत. ही अफूची विक्री ह्मणजे विषाची विक्री आहे, ती सरकारनें कायदेशीर करून ती विषाची विक्री करण्याचें दुकानही सरकारनेंच घातलें आहे, तेव्हां त्यास वाईट कोण ह्मणणार?

बिहारचा एक तहशिलदार दिल्ली येथें यमुनेच्या स्नानास गेला असता त्यास सुसरीनें ओढून नेलें व पुढें त्याचा पत्ताही लागला नाहीं. विचाऱ्यानें यमुनेंत जिवंत समाध घेतली ह्मणावयाची!

एका तरुण रजपुताचा जमिनीच्या संबंधाचा खटला संस्थानांत तन्ट होता व तो हरला त्यामुळें त्याणें त्या संस्थानच्या दिवाणाचे नाक कापले असें सांगतात. दिवाणाचे अन्यायानें त्याचा कज्जा बुडविला असेल तर त्यास झालेली नाक कापण्याची शिक्षा यथायोग्य झाली असेंच ह्मणतील आणि समजून उमजून अन्याय करणाऱ्या न्यायाधीशास अशाच प्रकारच्या शिक्षा करण्याचें सुरू होणें हें भावी सुधारणेस अवश्य आहे.

उदेपूरच्या हद्दींतल्या एका दरोडेखोर टोळीनें चितुरास येऊन कित्येक दरोडे घातले. एका बोहोऱ्याचे १०,००० रुपये घोरले.

शाबाजपुराकडे गेल्या २५ व्या तारखेस नदीस महापूर येऊन फार नुकसान झालें व कित्येक माणसेंही वाहून गेलीं. चहांच्या बागाही कित्येक बुडून गेल्या.

पोष्टांतून इकडून तिकडे जाणाऱ्या व्यापाऱ्यांच्या हुंड्या मध्येंच मिळून त्या चालवून पैसे उपटणारे कांहीं लोक निघाले आहेत या बद्दल हुंड्या पाठविणाऱ्या व्यापाऱ्यांनीं सावध राहावें. अशा रीतीनें २५०० रुपयांच्या दोन हुंड्या चोरणाऱ्या कांहीं लोकांस मुंबईपोलिसानें नुकतेंच पकडलेंही आहे.

आफगाणिस्थानाशीं इंग्लंडचें कोणत्या प्रकारचें नातें आहे हें इंग्लंडानें स्पष्ट करून सांगणें जरूर आहे, आणि तसें करून आफगाणिस्थानाच्या संबंधानें इंग्लंडावर काय काय जबाबदारी आहे हेंही सांगून टाकावें असें तुर्कस्थान ग्याझेटचें ह्मणणें आहे.

काश्मीरची वृद्ध राणी मागच्या बुधवारीं मरण पावली. त्या करतां आफीसें, व्यापारधंदा वगैरे बंद होता. प्रेताबरोबर राजा, प्रधान व मानकरी वगैरे अनवाणी पायांनीं गेले होते.

हांग कांग येथें जी एक प्रकारच्या रोगाची साथ आली आहे त्याच्या योगानें आजपर्यंत अगदीं थोड्या मुदतींत १,९०० माणसें ठार झालीं व ८०,००० चिनी लोक त्या रोगाच्या भीतीनें त्या बेटांतून निघून गेले!

फोर्ट चिला नावाचा चिला येथें जो एक नवा किल्ला सरहद्दीच्या रक्षणाकरतां हिंदुस्थानसरकारानें बांधला त्यावर काश्मीरच्या इंपेरियल फौजपैकीं कांहीं फौज ठेवण्याचें ठरलें आहे.

रशिया आपली ट्रान्स सैबेरियन रेलवे मोठ्या झपाट्यानें वाढवीत आहे.

सिलेशिया प्रांतांत ट्रेपो येथील कोळशाच्या खाणींत अपघात होऊन १९० माणसें ठार झालीं व २० जखमी झालीं.

इजिप्तचा खेदीव टर्कीची राजधानी कानस्टांटीनोपल येथें जाण्यास निघाला असून मुखत्यार पाशा बरोबर आहे.

ब्रुसेलस, लंडन, पारीस व बर्लीन या सरकारांच्या दरम्यान कोंगो प्रकरणी जारीचा पत्रव्यवहार सुरू आहे. ठा० अ०

विजेचे नांगर— जावा बेटांत चालू झाले आहेत व ते फायदेशीर आहेत असें सांगण्यांत येतें. खाटीकखानें सुरू करून हिंदुस्थानांतील जनावरें नाहींशीं करण्याचा क्रम चालू केल्यानें आमच्या शेतकीची फार हरकत झाली आहे. असें ह्मणणाऱ्या हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांस समर्पक जबाब देण्यांत विजेच्या नांगरावें हें एक चांगलें साधन होईल.

फ्रान्स देशांत कांबेच्या विटा निघाल्या असून त्या भक्षमही असतात. कोळसेही कांबेचीं निघालीं आहेत. या वरून थोड्या दिवसांत तिकडील घरें पारदर्शक होतील असा अदमास वाटत आहे. न्या. सि.

पंखांचीं मांजरें— "आर्मिले" नामक एक बेट अटलांटिक महासागरांत आहे तेथें जाणारे येणारे जहाजावरील मालिमास त्या ठिकाणीं पंखांचीं मांजरें आढळलीं असें तो सांगतो. हे पंख त्या मांजरांच्या दोहों बाजूंच्या कुशीकडेस असतात व त्या योगें पक्षाप्रमाणें तीं बरोब उंच उडत असतात त्यांचें ओरडणेंही मांजरासारखेंच ऐकूं येतें, आश्चर्याची गोष्ट खरी! परमेश्वराची लीला अगाध आहे. सु. प.

१७ वर्षाच्या वयाची एक गोरी तरुण सायबीण आपला सायबी पोषाक बदलून हिंदुस्थानांतल्या स्त्रियांच्या रितीप्रमाणें लुगडें नेसून व चोळी घालून एका तरुण मुसलमान गृहस्थाबरोबर जात असतां फैजाबाद येथील स्टेशनावरच्या रेलवे पोलिसानें पकडली व तिला परत तिच्या घरच्या माणसांकडे पाठवून दिली. तिणें ती साडी चोळी टाकून आपला सायबी पोषाक करावा, असा तिला पुष्कळ आग्रह केला पण तिणें तसें करण्याचें नाकारलें असें अलहाबादची तार सांगते.

कालीकत येथें नुकतेंच एका स्त्रीला एक मेंढरूं झालें, त्याचे डोळे व कान जन्मल्यावरीं व गळ्याच्या वरच्या भागाला होते. ह्या मुलाच्या पालकांनीं सरकार असल्या विजातीय विकृत घेण्यास नेहमीं तयार असतें असें समजून तें तेथील दवाखान्यांत नेलें होतें. पुढें त्या मुलाचें काय झालें तें समजलें नाहीं. खा० वि० गु०

सुलतानाचें मत प्रतिकूळ असल्यामुळें खेदिवाचा लंडन व पारिस येथें जाण्याचा बेत रहित झाला.

देशी कागद— खानेसुमारीच्या कामास एकंदर ३०० टन कागद लागला तो सगळा देशी कागदाच्या कारखान्यांनीं पुरविला ह्यावरून देशी कारखान्यांचीं बरीच सरशी होत आहे असें दिसतें.

सोन्याचा परदेशी भराटा— हिंदुस्थानातून ह्या जून महिन्यांत जवळ जवळ एक कोटीचें सोनें बाह्य देशीं गेलें. शु० सू०

उत्तरध्रुवा कडून अटलांटिक महासागरास जे बर्फाचे पर्वत वाहत वाहत व लोटत लोटत येतात ते २।२ शें वर्षांचे असतात असें भूगर्भशास्त्रज्ञांचें मत आहे. न्या० सु०

जाहीरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोले म्युनसिपल कमेटीचे हद्दींतील बारा फत्तरांचे आंत गुरें चारण्याचे हक्काचा लिलाव सन १८९४।९५ इसवी साबाबद्दल ता. ५ माहे जुलै सन १८९४ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहू वेळीं टाऊनहालांत हजर व्हावें कळावें तारीख ८।६।९४

Md. Husain
Secretary
A. M. C.

हें पत्र आकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

जाहिरात.

सर्व लोकांस असें जाहीर केलें जातें कीं रा० रा० रामराव जयकृष्ण गढीकर यांनां कुलमुक्त्यारपत्र आह्मी दिलें होतें. तें तारीख १ जुलई सन १८९४ इ० रोजीं रद्द केलें आहे. यापुढें आमचे संबंधानें कोणीही त्यांचेपाशीं व्यवहार ठेवूं नये. ठेविल्यास आम्ही त्याचे जबाबदार नाहीं. तारीख २९ माहे जून सन १८९४ इसवी.

(सही)

वासुदेवराव भगवंतराव देशपांडे
परगणें खोलापूर व
हलिचपूर.

नोटीस

रा. रा. योगाजी बलद विठोबा पाटील अडगांव सरप कसबे बोर्डेगांव तालुके बाळापूर जिल्हे अकोले यांस नोटीस देणार रामजी बलद इरमानजी पाटील दुकान मौजे कसूरे तालुके बाळापूर जिल्हे आकोले नोटिशीनें असें कळवितों कीं तुझाकडे आमचे दुकानची बाकी येत्या दिपवाळीस दिवाळी ते रुपये ९८६ नऊशें शाहयेंसी. त्यांत दिपवाळी नंतर दोन वेळ मिळून वसूल रुपये (३००) तीनशें वजा जाता बाकी रुपये राहिले ते (६८६) साहाशें शाहशी तुम्हांकडे आमची रकम दरशेकडा एक रुपया व्याजानें आहे. व अशा कर्जी व्याजानें आम्ही रकम तुम्हाकडे ठेवणेस बीलकुल खुशी नाहीं म्हणून ही नोटीस देऊन तुम्हांस असें कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासून आठ ८ दिवसांत व्याज मुद्दल मिळून सर्व रुपये अणुन निकाल करावा. असें जाहालें नाहीं तर जी रकम तुमचेकडे आहे त्याजबद्दल ही नोटीस दिल्या तारखे पासून रुपयें सर्व अदा होईपर्यंत तुम्हांस व्याज दरमाहा दरशेकडा रुपये (२) दोन प्रमाणें द्यावे लागतील. हें तुम्हांस अगोदर आम्ही कळविलें आहे नंतर कोणत्या ही प्रकारची सबब तुमची ऐकिली जाणार नाहीं म्हणून दिली नोटीस सही. या नोटीशीचा खर्च तुम्हांस द्यावा लागेल. कळावें ता० २४।६।९४ इसवी.

(सही)

रामजी बलद इरमानजी पाटील
मौजे कसूरे दस्तुर नागोजी
रामजी पाटील कसूरे.

जाहिरात

सर्व लोकांस या लेखानें जाहीर खबर देण्यांत येते कीं मजकी तुलसी नामें लक्ष्मी मर्द संभाजी राहणार तुळंग खुर्द तालुके बाळापूर इच्या कडून कोणीही स्थावर जंगम इस्टेट विकत, गहाण, बक्षीस, वगैरे घेऊं नये व तिच्याशी कोणताही देवघेवीचा व्यवहार करूं नये. जर कोणी कांहीं देवघेव व व्यापार करील तर त्याचा तो जबाबदार राहील. त्या बद्दल सदरहू लक्ष्मी मर्द संभाजी इच्या जवळील इस्टेट विलकूल देवाल नाहीं. कळावें तारीख २७।६।९४ इ.

(सही)

सूर्यभान बलद विष्णाजी राहणार
तुळंग खुर्द तालुके बाळापूर
याच्या हातची निशाणी बखर.

नोटीस

तीर्थ स्वरूप गंगा भागिरथी लक्ष्मी मर्द संभाजी कुणबी राहणार तुळंग खुर्द तालुके बाळापूर जिल्हे आकोले इस.

नोटीस देणार सूर्यभान बलद विष्णाजी राहणार तुळंग खुर्द तालुके बाळापूर या लेखान्वयें असें कळवितों कीं मजा चुलता नामें संभाजी मरण पावल्या नंतर तुह्मी त्यांच्या पत्नी हयात इस्टेटीचा उपभोग घेत आहा आणि त्या करण्याला माझी बिलकूल तक्रार नाहीं. परंतु आतां असें कळतें कीं तुह्मी स्थावर जंगम इस्टेटीची अफरातफर मांडली आहे आणि तुमच्या मनांतून सर्व जिन्नगी मला वारसदार या नात्यानें मिळूं न देतां दुसऱ्याच्या घरीं घालविण्याचा रंग दिसतो. तुह्मी चुलत्याच्या मागे जिन्नगीची कोणतीही गैरकायदा व्यवस्था करूं नये. तुह्मास पोटापाण्यास जें कांहीं लागेल तें सर्व पुरविण्यास मी तयार आहे. परंतु तुह्मी खोट्या नात्या मिळूं जिन्नगी कोणास गहाण, विकें, बक्षीस वगैरे कांहीं देऊं नये. व तीची तशी विल्हेवाट लावण्यास तुह्मास कायद्यानें मनाई आहे. चुलत्याचें देणें जें कांहीं वास्तविक कर्ज असल तें मी देण्यास तयार आहे या पुढें तुह्मी कर्ज काढूं नये व पैसा व जिन्नगी उधळूं नये. सदरा व वडील संभाजी बलद मुकुंदा यांच्या सख्या शिवाय तुह्मी कोणतीच गोष्ट करूं नये. आमच्या घरातून जिन्नगी बाहेर घालविण्याचा तुह्मा छंद आहे पण तसें आह्मी तह्मास करूं देणार नाहीं. या उपर दांडगाईनें व दुसऱ्याच्या नादानें तुह्मी कांहीं देवघेव केली तर ती रद्द करण्यात येईल आणि त्याची जबाबदारी तुमच्या डोकयावर राहील जो तुह्माशी व्यवहार करील तो सर्वथैव फुकट बुडेल. त्या देवघेवीला इस्टेट जबाबदार व देणार नाहीं. ही नोटीस पोचल्या तारखेपासून आठ दिवसांचे आत चुलत्याच्या वेळची जिन्नगी खाली नोंद केलेली नीट सफळूं ठेविली आहे अशा विषयी पक्की झडती व हिशेब द्यावा व तसें न करा तर तुह्माचा निर्णय करून तुह्मी इस्टेट संभाळण्यास अडाणी व गैर माहितगार आहां म्हणून सरकार मार्फत निराळी व्यवस्था करविण्यात येईल :—

(१) शेती नंबर १; (२) तीन भावांच्या समाईक शेती पैकीं चौथा हिस्सा; (३) सोन्याचें कडे तोळे ५; (४) ५०० रुपये रोख; (५) दूधणे पेवांतील खंडी १, (६) गाया ६, ४ बैल, १ गाडी; (७) चांदी वगैरे आणखी या शिवाय इतर चीजवस्तु दागदागिने वगैरे मिळून जी स्थावर जंगम इस्टेट तुमच्या ताब्यांत आहे तिची कोणत्याही प्रकारें उलाढाल व देवघेव करण्याची या नोटिशीनें तुह्मास बंदी केली आहे. या उपर तुह्मी नीटपणें वागून कायदेशीर वर्तन न ठेवलें तर या नोटिशीच्या खर्ची सुद्धा सर्व रक्कम भरून घेऊन जिन्नगी ताब्यांत घेतली जाईल कळावें तारीख २७।६।९४

(सही)

सूर्यभान बलद विष्णाजी राहणार
तुळंग खुर्द तालुके बाळापूर
याच्या हातची निशाणी
बखर.

नोटीस

रा. रा. कन्हैयालाल किसनदास अगरवाले राहणार जळगाव वऱ्हाड जिल्हे अकोले यांस नोटीस देणार वेंकटप्रसाद रामप्रसाद तीळवारी राहणार जळगाव वऱ्हाड नोटीसिनें असें कळवितों कीं आमचें घर घाल्याचे इनस्य सुद्धा जागा देन वर्ष पासून तुम्हांस दरमाहा दोन रुपये भाड्यानें टरव करून दिलें करारा प्रमाणें आम्हीं भाड्याचे रुपये मागीत असतां तुम्ही आज पावेतो दिले नाहींत व असें सांगतां कीं हे भाड्याचे रुपये सदरहु घर दुरस्ती करितां लावितों असें सांगतां परंतु आज पावेतों कांहीं एक दुरस्ती न करितां उलटें घराची बादुरस्ती झाली व ज्यास्त होत आहे याजकरितां तुह्मास ही नोटीस देऊन कळवितों की नोटीस पावले दिवसा पासून आठ दिवसांत सदरहू घर खाली करून आमचे आमच्या ताब्यांत द्यावें व भाड्याचे रुपये आज तारीख पर्यंत जे झाले आहेत ते देऊन सदरहु मुदतींत खोद दयावे असें न झालयास सदरहू घरास जें तुह्मांस दरमहा भाडें दोन रुपये आहे तें रोज ८ आणे प्रमाणें भाडें घर तुम्ही आमच्या स्वाधीन करा पर्यंत घेतलें जाईल. व घर दुरस्ती बद्दल जो खर्च दुरस्तीस लागेल त्या खुद्द सर्व रुपये व ह्या नोटिशीच्या खर्ची सुद्धां अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान व खर्च होईल तें सर्व भरून घेतलें जाईल म्हणून दिली नोटीस सही. तारीख २७ माहे जून सन १८९४ इसवी.

(सही)

वेंकटप्रसाद रामप्रसाद तिळवारी
करती जळगांव
बुद्रुक खुर्द.

NEARLY READY

CRIMINAL COURT MANUAL

for the

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with repeals of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Criminal matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminal Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Beran.

किंमत १० आणे

गुरुचरित्र

पांच किंवा जास्त प्रती एकदम घेणारास दर प्रतीस

आठ आणे

हा ग्रंथ आज पर्यंत ८।१४ आण्यास मिळत होता. त्याच्या आतां फारच थोड्या प्रती शिल्लक आहेत ग्राहकांनीं त्वरा करावी.

आर्य भूषण छापखाना, पुणें.

घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ जुएलचें (ह्मणजे चक्रांचें खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास बोगरा, कांटे सासर्कीपर्यंत, आंकडे ठळक चिकारी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिरपातील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. ज्यास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र कथाटलाग मागवा. व्हीपी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक.

विजयादशमीचें सोनें

[२४ व्या अंकावरून पुढें चालूं]

ODE ON THE POETS

Bards of Passion and of Mirth
Thus ye live on high, and then
On the earth ye live again;
And the souls ye left behind you
Teach us, here, the way to find you
Where your other souls are joying,
Never slumber'd never cloying
Here, your earth-born souls still speak
To mortals, of their little week;
Of their sorrows and delights;
Of their passions and their spites;
Of their glory and their shame;
What doth strengthen and what maims
Thus ye teach us every day,
Wisdom, though fled far away.
Bards of Passion and of Mirth
Ye have left your souls on earth
Ye have souls in heaven too,
Double-lived in regions new! J. Keats.

दिव्यात्मा सुख या परि सेवी त्याला
विकृती तृप्ति नसे
संसार क्षणभंगु मनुजा काव्यात्मा
तव शिकवितसे ॥ १ ॥
विष परिणामीं दुःख गणावें प्रथम
सुखाला मुळूं नये ।
विषवत् पाहिजे परितें सौख्याचे अन्ति
सुधारस सपहविये ॥ २ ॥
इंद्रियगण हा अरि समजावा; इच्छा
छया दूर वसो
लाजिरवाणें कधीं न करणें, सत्कृतीं
मन रमत असो ॥ ३ ॥
ब्रह्मरहस्य ध्यान सदोदित करा शेवटीं
तें फळद ।
काम क्रोध व्यर्थ पसारा उपजा मानवा
हे विशद ॥ ४ ॥
काव्यात्मा तव अनुदिन ऐसा परोपरी
मनुजा शिकवी
महीवरी तुह्मी नसा तरी हा अभिनव
गोष्टी अद्भुत वी ॥ ५ ॥
भावरसाकुल ॥ ब्रु० ॥

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याच्या मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं सन १८९० चा आक्ट ८ कलम १० प्रमाणें.

अर्जीचा नंबर क्लास १३ मिसल नंबर ३

१८९४

विद्यमान सिविल जज्ज साहेब बाहादुर जिल्हे अकोला. यांचे कोर्टात

अर्जदार कृष्णाबाई
जवजे रंगराव जाहागीरदार
जात हिंदु ब्राम्हण
राहणार बाभुळगांव तालुके अकोला

वरील (अज्ञान) विठ्ठल, शंकर व शामराव बापाचें नाव रंगराव जात हिंदु ब्राह्मण राहणार बाभुळगाव ता० अकोला यांणें त्याच्या माल मिळकतीच्या वहीवाटीचें सरटीफिकीट मिळावें ह्मणुन अर्ज दिला यास्तव व मृत्युपत्राचे आधारें किंवा दुरतऐवजा वरून किंवा आगदी जवळचे नात. लग पणाचे कारणा वरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहु अज्ञानाचे मालमिळकतीवर सांभाळ कर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्याणी तारीख ११ माहे जुलई सन १८९४ इ० रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळी ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हकीकती दाखल करावी. तारीख २२ माहे जुन सन १८९४ इ०

V. N. Dandeker.
सिवील जज्ज.

दि० क्लास १३ नंबर ३

९४

विद्यमान डिस्ट्रिक्ट जज्ज साहेब बहादूर कोर्ट अकोलें.

कृष्णाबाई जवजे रंगराव विठ्ठल जाहागिरदार मौजे बाभुळगांव परगणे बाळापूर तालुके अकोलें. जिल्हे अकोलें तर्फे मुक्त्यार नरहर खंडेराव रहाणार अकोलें.

सन १८९० चे अक्ट ८ यांतील कलम १० प्रमाणें अर्ज.

अर्ज करितो असा कीं,

१ विठ्ठल रंगराव, व शंकर रंगराव व शामराव रंगराव हिंदु ब्राह्मण यांचे प्रत्येकाची जन्माची मिती खालीं लिहिले प्रमाणें; हे तिघेही मौजे बाभुळगांव परगणे बाळापूर तालुके अकोलें जिल्हे मजकूर येथें रहातात.

(१) विठ्ठलराव रंगराव मिती जेष्ट शुद्ध ६ शके १८०२ मु० तारीख १४ माहे जून सन १८८० इ०

(१) शंकरराव रंगराव मिती माघ वद्य १२ शके १८०६ ता० ११ माहे फेब्रुवारी सन १८८५ इ०

(१) शामराव रंगराव मिती आश्विन शुद्ध ३ शके १८१० मु० तारीख ८ माहे अक्टोबर सन १८८८ इ०

२ अज्ञानाची समाईक मिळकत खालीं लिहिले प्रकारची.

१ मौज बाभुळगांव येथील जाहगिरींत १ हिस्सा.

३००० स्थावर माल शेती अकोले व इतर तालुक्यात असलेली अजमास किंमत रुपये.

१०००० नगदमाल सोनें चांदी मोती, जवाहिर, तांबे, पितळेची भांडी, कपडा लोखंड गल्ला जनावरें वगैरे अजमास किंमत रुपये.

५००० घर बाडा गायबाडा पागा दुकान वगैरे मौजे बाभुळगांव व परगणे अकोले येथील अजमास कि० रु०

४०००० देणें घेण्याचा व्यापार गहाणवरून, दस्तैवजा वरून, हुकूमनाम्या वरून व इतर प्रकारें.

९८०००

३ हा सर्व माल प्रस्तुत अर्जदाराचे ताब्यांत व अर्जदार बाभुळगावी रहात आहे. आणि यातील कांहीं माल व देणें घेण्याच्या वह्या चालू सालापर्यंत कांहीं दस्ता ऐवज हुकुनामे वगैरे अज्ञानाचे चुलते सखाराम विठ्ठल याचे ताब्यांत असून ते अकोलें येथें स्थित आहेत. आणि अज्ञान इसम हे अर्जदाराचे जवळ आहे. सबब त्याची नक्की किंमत आज मला दाखवितां येत नाहीं करितां वरील आकारा लिहिल्या प्रमाणें अदाजयांनीं किंमता दाखविल्या आहेत.

४ अज्ञानाचे जवळचे नातेवाईक व त्याचे रहाण्याचे गांव वगैरे सुद्धां खालीं लिहिल्या प्रमाणें.

१ सखाराम विठ्ठल अज्ञानाचा चुलता रहाणार अकोले.

१ रामराव कृष्णराव अज्ञानाचे चुलत बंधु रहाणार बाभुळगांव.

१ हरणाबाई जवजे रहाणार एलिचपूर अज्ञानाची बहिण.

५ अज्ञानाचा बाप रंगराव विठ्ठल हे तारीख माहे ज्यानेवारी सन १८९४ इसवी रोजी मरण पावले त्याणी मृत्युपत्रा वरून किंवा इतर प्रकारानें अज्ञानाचे मिळकतीचा व शरीराचा पालण करणारानें नेमला नाहीं.

६ पुर्वी पालण करणारा नेमण्या बद्दल कोणतही कोर्टांत अर्ज वगैरे केला नाहीं.

७ अज्ञानाचे शरीराचे पोषण करण्यासाठीं आणि मिळकतीचे संरक्षण करण्यासाठीं पालण करणारा नेमला जावा असा हा अर्ज आहे.

८ अर्जदारीण ही अज्ञानाची मातोश्री असून अज्ञानाचे शरीराची व मिळकतीचे संरक्षण करण्यास योग्य आहे.

९ शास्त्रा प्रमाणें आई व बाप या उभयतास मुलाचें पालन पोषण करण्याचा हक्क आहे व त्याची मिळकत संरक्षण करण्याचा हक्क आहे. पैकीं बाप मरण पावला आहे. अर्जदारीण अज्ञानाची मातोश्री असल्यामुळें अज्ञान हे सज्ञान होई पावेतों किंवा त्या पैकीं एखादा सज्ञान होई पावेतों त्याचें शरीराचें व मिळकतीचें संरक्षण करण्याचा सशास्त्र अधिकार आईस ह्मणजे अर्जदारीण इजला आहे.

१० अर्जदाराचा चुलता अर्जदाराचे बापापासून विभक्त जाहला असोन अर्जदाराचा बाप मेल्या नंतर मिळकत आपली समाईक आहे असा वाद सांगून अज्ञानाचे मालाचा अभिलाष करण्यास इच्छित आहे. ह्या साठीं अज्ञानाचे मालाचें संरक्षण करण्या साठीं व अज्ञानाचे इष्टेचे पैकीं कर्ज वसूल करण्यासाठीं अज्ञानाचे शरीराचे संरक्षण करण्या साठीं पालन करणार नेमण्या विषयीं अर्ज करण्यास कारण झालें आहे.

११ अर्जदारीण ही स्वतःच गार्डियन होण्यास राजी आहे.

सही

कृष्णाबाई जवजे रंगराव जहागीरदार बाभुळगांव तर्फे मुखत्यार नरहर खंडेराव शहर अकोलें

साक्ष

कनुलाल नानकराम अगरवाले साहू खामगांवकर दस्तूर खुद.

गोपाळ गणेश कुलकर्णी चानोकर मुक्काम अकोलें दस्तूर खुद.

सदरहू प्रमाणें अर्ज केला आहे तर चौकशी होऊन सरटिफिकिट मिळावें. हा अर्ज तारीख २० माहे जून सन १८९४ इ०

कृष्णाबाई जवजे रंगराव जहागीरदार राहणार बाभुळगांव तर्फे मु० नरहर खंडेराव राहणार अकोलें.

मीं अज्ञानाची आई कृष्णाबाई जवजे रंगराव विठ्ठल अशी प्रतिज्ञा करते कीं सदरहू अर्जांत लिहिलेला मजकूर माझे माहितीप्रमाणें खरा आहे.

कृष्णाबाई जवजे रंगराव जहागीरदार राहणार बाभुळगांव तर्फे मु० नरहर खंडेराव राहणार अकोलें.

खरी नकल

Tukaram Waman
शिरस्तेदार

नोटीस.

श्रीमंत जानकीबाई जवजे बळवंतराव देशपांडे अज्ञान पालन करणार सासू कळिताबई जवजे रामचंद्र देशपांडे परगणे खोलापूर व इलिचपूर तर्फे म्यानेजर निसबत इस्टेट देशपांडे.

यांस:—

१ खालीं सह्या करणार यांनकडून देण्यांत येते कीं तारीख २९ माहे मे सन १८९४ इ० रोजीं तुह्मी आह्मांपासून मौजे आमतपूर येथील शेतें.

सर्वे नंबर	एकर	गुंठे	आकार रु०
९	६	११	१९
३९	५	०	९८८
१८२	२	६	४

यांचे एकंदर एकर १३८१७ याची सालीम जमिनीची कबुलायत बुक नंबर १ यांतील नंबर १६५ सन १८९४ इ० ची तुह्मी आपले एकत्याचे नांवाची करून घेतली.

२ परंतु अजपर्यंत वहिवाटी प्रमाणें तुमची मालकी फक्त निमे (म्हणजे एकर १३ ८१७ याची निमे) जमिनीवरच असून बाकीची निमे (म्हणजे एकर १३ ८१७ याची निमे) जमीन पुरुषोत्तमराव देशपांडे व नरहरराव देशपांडे यांचे मालकीची आहे. व त्यांचे जमिनीची (पुरुषोत्तमराव व नरहरराव) लागवण गेल्या सालपर्यंत (सन १३०३ फसली पावेतों) त्यांनीं वर्षे ५ आह्मास केल्या वरून आह्मीं त्यांना कबुलायत लिहून दिली होती.

३ "हल्लीं सरकार मार्फत सर्व जमीन आह्मास मिळाली आहे. व त्या प्रमाणें सर्व जमिनीची (एकर १३ ८१७ चा) कबजा ही आह्मांस मिळाला आहे" असें आम्हांस समजावून आमचे जवळून सर्व जमिनीची (एकर १३ ८१७) कबुलायत करून घेतली. परंतु आतां आम्हांस असें समजतें कीं सर्व जमिनीचा कबजा तुह्मांस मिळाला नाहीं. यामुळें अर्थात तुमची मालकीही सर्व जमिनीवर (एकर १३८१७) नाहीं. व आमचे जवळून तर तुह्मी कबुलायत करून घेतली आहे. करितां आपणांस वेळींच सावध करितों कीं आह्मी एकंदर (एकर १३८१७ जमिनीचे संबंधानें तुह्मांस जबाबदार रहाणार नाहीं. फक्त तुमच्या मालकीचे एकर १३८१७ याचे निमे) जमिनी करितां मात्र आपणांस मंजूर असल्यास तितक्या पुरते आह्मी जबाबदार राहूं.

(४) पुरुषोत्तमराव भगवंतराव देशपांडे व नरहरराव भगवंतराव देशपांडे यांचे हिश्याची (एकर १३८१७ याचे निमे) जमिनीची तारीख २३ माहे जून सन १८९४ इ. रोजीं त्यांना आम्ही कबुलायत करून देऊन त्यांचे जवळून जमीन वहीती करितां आम्हीं आपल कबजांत घेतली आहे. (एकंदर १३ ८१७ याची निमे) करितां आपली कबुलायत एकंदर १३ ८१७ याची निमे एकरा पुरती बातल आहे असें समजावें. कळावें लोभ असावा हें विनती. तारीख २४ माहे जून १८९४ इ०

[सह्या]

१ हिरालाल गुलाबराय
दस्तुर खुद्द.

२ शिताराम शानिराम
दस्तुर खुद.

३ मोहनलाल गुलाबराय
निशाणी कच्चार.

रहाणार मौजे असतपूर तालुके इलिचपूर जिल्हे मजकूर.

सदर्हू नोटीस तारीख २५ जूनच्या 'वऱ्हाड समाचारांत' छापिली जावयाची होती परंतु उशिरा निमित्त पुढील अंकीं छापिली जाईल. आणि त्या साठीं हा नोटीस या जादा पत्रकानें बजाविली आहे. कळावें. तारीख २५ माहे जून सन १८९४ इ०

बाळाजी वासुदेव सोमण.
म्यानेजर, वऱ्हाड समाचार.

नोटीस.

रा. रा. रामराव जयकृष्ण गढीकर रहाणार इलिचपूर यांस:—

खालीं सही करणार यांनकडून कळविण्यांत येतें कीं तुम्हांस मजकडून कुळमुखत्यार पत्र दिलें होतें. तें तारीख १ माहे जुलई सन १८९४ इसवी रोजीं रद्द केलें आहे. या पुढें आमचे संबंधानें कोणचेही प्रकारें कोणाशीं मुखत्यार या नात्यानें व्यवहार ठेवूं नये. ठेवल्यास आह्मीं जबाबदार नाहीं. कळावें तारीख २५-६-९४ इसवी.

(सही)

नरहरराव भगवंतराव देशपांडे
परगणे खोलापूर व इलिचपूर

सालअखेर " ७ " १८
किरकोळ अंकास ८४

Annual in arrears 7 ,,1Re 8 as.
Six monthly.....3 " 8 as.
Single copy..... 4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरें वेपेस ८१

वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 9 JULY 1894 NO 27

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख ९ माहे जुलै सन १८९४ इ० अंक २७

चार तास होऊन गेले आतां आशा सोडा-

अरे देवा! मी तीन चार तास व्यर्थ घालविले ते जर परत आणतां आले असते तर किती मजा झाली असती. पहा! एका क्षणांत मनुष्यावर किती संकटें येऊन पडतात!

मिस्तर जेम्स करटीस आणि मिस्तर सी. एस बेनेट हे दोघेजण पुष्कळ वर्षे अगदीं जिवलग मित्र होते. ते स्पान फ्रान्सिसको शहरांत राहत असत. गेल्या उन्हाळ्यांत पडिल्याच वेळेस एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून बरेच भांडले. सुविचार मनांत आले व पुन्हां त्यांची गट्टी जमली परंतु एकदां घडी बिघडली ती बिघडली. विचार दैवीनें आपल्या स्मरण वहीत टिपून ठेविले होते तें एकमेकांपासून अलग राहण्याबद्दल खबरदारी घेत होते. ह्या द्वयांची गांठ एका रस्त्यांत पडली. पुन्हां भांडण सुरू झालें. करटीसच्या मुखांतून फारच कठोर व काळजीला झोंबण्यासारखे शब्द निघाले आणि त्यानें रागाच्या सपाट्यांत पिस्तूल काढली व बनेटवर झाडून त्यास लागलीच राम ह्मणावयास लावलें. पुढेंही तो स्वनिंदेनें व दुःखानें नाडला गेल्यामुळें वरच्या सारख्याच लाखोल्या वाहत असे.

हें पहा असें बागणें किती निरर्थक, कुचकामाचें व दांभिक आहे बरें!

परंतु कस्टीस ह्मणत असे कीं एका क्षणांत मनुष्यावर कोणती संकटें येतील ह्याचा नेम नाहीं. असें आपणास क्षणभर खरें वाटतें परंतु ह्या पेक्षां दुसरा अगदीं खोल विचार आहे तो कोणाच्या ध्यानांत येतो? ह्या संकटाचें खरें स्वरूप समजलें नाहीं तर कांहीं चिंता नाहीं. तर ह्याच मुद्यावर दुसऱ्या एका गोष्टीचा विचार करूं.

एक सुज्ञ बाई ह्मणते कीं सन १८६० सालीं अक्टोबर महिन्यांत मला असा ज्वर जडला होता कीं त्यांतून मी वाचेन असें मला वाटत नव्हतें. माझ्या शरिरांत सर्व ठिकाणीं वेदना होऊं लागल्या व खोकल्यानें मला इतकें जर्जर करून टाकलें कीं माझ्या शरिराचा चेंदा मेंदा होतो कीं काय असें मला वाटलें. मी बिछान्यांत पडून राही परंतु रात्रंदिवस शोष ह्मणाल तर देवाचें नांव. माझ्यानें उठून बसवत नसल्या मुळें मला चमच्यानें अन्नरस माझ्या तोंडांत घालीत असत. माझी छाती इतकी घडघडत असे कीं ती उशीवर तुह्मास साफ दिसून येईल.

आणि वेदना इतक्या जालीम होत होत्या कीं जसें कोणी मला भोंसकत आहे. मी अशी पंगु होऊन अंथरुणाशीं खिळून राहिलें व मला दम बरोबर घेतां येईना. वैद्यबोवा आह्मास सतत एक महिनाभर औषधोपचार करीत होते. परंतु दिवसानुदिवस क्षीण होत चालले. कधीं कधीं रात्रीं माझी अशी गाळण होऊन जाई कीं सकाळपर्यंत मी जगेन किंवा नाहीं ह्याची मला शंका वाटत असे. त्यांनीं आपल्या दुसऱ्या वैद्याची सल्ला मसलत घेऊन असें ठरविलें कीं हा रोग बरा होणें कठीण आहे. मला तकवा आणण्यास थोडीशी दारू पाजीत असत. कोणत्याही औषधापासून मला काडी इतका गुण ह्मणून आला नाहीं. मी आतां यमसदनीं जाणार असें मला वाटूं लागलें.

अशा वेळीं प्लिमथ जवळच्या मोटली गांवांतील मिसीस किटिंग माझी मैत्रीण होती ती धावून आली व मला मदर सिनेलचे क्युरोटिव सिरप ह्मणजे माता सिनेलचा रोग हारक पाक) घेण्यास गळ घातली. मी लागलींच एक बाटली पैदा करवून औषध घेण्यास सुरू केलें. थोड्याच दिवसांनीं मला अन्न घेतां येऊन पचविण्याची शक्ती आली आणि वाईट लक्षणें कमी होत चाललीं. ह्यावरून असें दिसून येतें कीं ज्या उपाधीनें हिच्या शरीरांत आपला पूर्ण अम्मल बसवून इतक्या शिखरास पोचावला होता कीं तिच्या आयुष्याची दोरी तुटण्याची वेळ जवळ येऊन ठेपली. आपल्याला उपाधि समजो वा न समजो परिणाम असा व्हावयाचा. करटीसनें जो अपराध केला होता त्याचें मुख्य कारण त्याचें एकदम रागावणें व त्या भरांत धिःकार व सुड घेण्याच्या विचारास उत्तेजन देणें व मनांत असल्या दुष्ट हेतूस स्वाधीन होऊन अशा प्रकरचे खून करण्यास तयार होणें हें होय. ह्याच प्रमाणें ह्या बाईच्या रोगाची उपाधि झटली असतां अग्निमांद्य व अजीर्ण होय. कीं जी अखेरीस बेफाम होऊन जिवास धका व विण्यास कारणीभूत झालें ह्याचें सार ह्मणाल तर एकच. अरिष्टाची टेहळणी प्रारंभींच करावी व पुढें वाढू देऊं नये ह्मणजे तें अरिष्ट आपल्या अटोक्यांत सहज ठेवता येतें.

ह्या औषधाच्या सहा बाटल्याचा फन्ना केल्यावर माझी तब्बेत पूर्ण ताळ्यावर आली आणि तीस वर्षा पूर्वी पेक्षां मला आतां हजार हिशानें बरें वाटत आहे. माझ्या दोन मुली पण अजीर्णा पासून त्रासल्या होत्या त्या ह्या औषधानेंच बऱ्या झाल्या. मला कोणी विचारतील त्यास मी मोठ्या आनंदानें सांगेन.

(सही) मिसीस लुई ज्याकसन
बिल्डर्स आर्मस होटेल
ब्रिजरोड, ह्यामरस्मिथ, लंडन
तारीख १४ माहे जानेवारी
सन १७६२

वर लिहिलेल्या ओळी ज्या पत्राचें सार आहे त्यांस मिसीस जानसन बाई असें प्रदर्शित करते कीं सन १८६०च्या अक्टोबरात जें दुखणे लागलें होतें त्याच्या वीस वर्षा पूर्वी तिचे पित्ताशय व पक्वाशय बिघडलीं होतीं. तिच्या तोंडाची रुचि बिघडून गेली होती. आणि थोडें जरी खाल्लें तथापि तिच्या पोटांत कळा मारीत. तिला थकल्यासारखें व गळून गेल्यासारखें आणि उदास झाल्यासारखें वाटे आणि पोट अगदीं खोल गेल्यासारखें वाटल्यामुळें तिला फारच वाईट वाटे. तिच्या छातींत बरगड्यांत तीव्र वेदना होत, छातींत धडधड होई, घेरी येई व वारंवार रस्त्यांत पडे व तिला घरीं कोणी तरी उचलून आणीतें. F.L.

विजयादशमीचें सोनें

LOVE

All thoughts, all passions, all delights,
Whatever stirs this mortal frame,
All are but ministers of love,
And feed his sacred flame.
Oft in my waking dreams do I
Live o'ver again that happy hour,
When midway on the mount I lay
Beside the ruin'd tower.
The moonshine stealing o'er the scen,
Had blended with the lights of eve;
And she was there, my hope, my joy
My own dear Genevieve!

मधुर कथा परिसावी आतां । मी कैसी मिळविली कांता ॥ ध्रु० ॥ विचार मनिचे सर्वहि साचे, मनोधर्मवा नानापरिचे, संतोषाच्या कळाहि सकळा, फार कशाला मर्त्य तनूला, ज्या ज्या वस्तू चंचल करिती, त्या त्या सर्वहि या दूततती, अनंग राजा त्याच्या काजा तत्पर किंकर सर्वहि असती, मानव चित्तीं कामवन्हिची, ज्वाला अधिकचि हे चेतविती, अप्रतिहत मज खास वाटते कंदर्पाची येथें सर्वहि सत्ता ॥ १ ॥ मधुर कथा०

सुंदर सुखकर मित्रा ! वेळा, चित्तीं आठवी वेळोवेळा, व्यग्रवृत्ति मम मानस जेव्हां, धांवत येते स्मृतिहि तेव्हां, अर्ध गिरीवर पडक्या बुरुजा निकट वसे मी—जीवचि माझा, मोद जणो मम मूर्तिमंत हा, आशा फास पसरिला कीं हा, गोदावरि मम समीप बैसे, सायंकाळीं गगनि होसे, चंद्रकोर ती— पांडुर पांडुर, ज्योत्स्ना गिरिवर दवकत येई मिश्रित होई संध्या रुचिला, ती वेळ पुन्हां आठवि आता ॥ २ ॥

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध ७ शके १८१६

वऱ्हाडचे बंदीखाने

(सन १८९३ ची हकीकत)

या प्रांतांत एकंदर लहान मोठे बंदिखाने सहा आहेत त्यांत पूर्व वऱ्हाडांत उमरावतीचा बंदिखाना मुख्य आहे आणि पश्चिम वऱ्हाडात अकाल्याचा मुख्य आहे. यवतमाळ व इलिचपूर जिल्ह्यांतील सहा महिन्यावरील शिक्षेचे कैदी उमरावती तुरुंगांत ठेवितात आणि बुलढाणा व वाशिम येथील सहा महिन्हून अधिक सजा पावलेले कैदी अकोल्यास धाडतात. शिकंदराबाद (दक्षिण हैदराबाद) येथील अधीक मुदतीचे बंदिवान इन्स्पेक्टर जनरलच्या हुकूमा प्रमाणें अकोल्यास किंवा उमरावतीस जात असतात. तुरुंगावरील मुख्य-अधिकारी जिल्ह्या जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन यांस दवाखाने तपासण्यासाठीं बाहेर फिरावें लागतें त्यामुळें थोडी बहुत गैरसोय होते. कर्नल लेन इन्स्पेक्टर जनरल यांचा विचार या प्रांतासाठीं एक मुख्य तुरुंग स्थापण्याचा असून त्यावर निराळा कायमचा सुपरिनटेंडंट असावा असा आहे. अशा व्यवस्थेने भारी मुदतीचे कैदी चांगल्या शिस्तेंत राहून तुरुंगाचा व्यवहारिक दृष्टीनें अधीक फायदा करून घेता येईल. सूचना वरिष्ठ सरकाराकडे केल्या आहेत पण त्यांचा अद्याप समाधानकारक असा कांहींच निकाल लागला नाहीं.

सन १८९३ साल अखेरीला एकंदर १३७९ कैदी तुरुंगांत होते आणि सरासरी दररोजचें प्रमाण १२४३.३६ इतक्या कैद्यांचें निघतें. सन १८८० साला पासून गेल्या तेरा वर्षांत इतके पुष्कळ कैदी कधींच एका वर्षांत नव्हते. अवघ्या वर्षांत ३२७५ लोक शिक्षा पावले आणि नवे जुने मिळून ३०९३ कैद्यांची वर्षभरांत सुटका झाली. गेल्या तीन वर्षांतच कैद्यांचा मोठा भरणा झाला आहे. सन १८९० च्या अखेरीस ८६४ कैदी होते त्या ऐवजीं गेल्या वर्षीच्या शेवटल्या दिवशीं १३७९ कैदी होते.

कैदीखान्यांतून लोक संख्या फार वाढली आहे याचें कारण कर्नल लेन साहेब असें दाखवितात कीं गहूं व जोंधळा हीं दोन्हीं धान्यें फार महाग झालीं आणि पीकपाण्याची सुबत्ता नसली ह्मणजे लोक अर्थातूच गैर मार्गाचा आश्रय करितात. गैरमार्गातून हे नवशिके चटकन उजेडांत येतात व कायद्या अन्वयें शिक्षा पावतात. तुरुंग तुडुंब भरत जाण्यास प्रजेचा भुकेबंगालपणा कारण आहे हें इन्स्पेक्टर-जनरल यांनीं अर्धे मुर्धे कबूल करून संक्षेपानेंच त्या प्रकरणाला फाटा दिला आहे. घोर दारिद्र्य, अन्नान्न दशा, निराश्रय व निराशा हीं कारणें राज्याला देखील अपायकारक आहेत. ज्या राज्यांत प्रजा पोटानें मरते त्या राज्याची प्रजेला तरी काय जरूर राहणार आहे! जे पोटासाठीं मोल मजुरी करितात, किंवा ज्यांचा चरितार्थ शेतकीवरच चालतो त्यांच्यावर महर्गतेचें संकट अगोदर येतें आणि त्यांची व नेहमी अल्पवस्था व दैना होत असते. या वर्णनांतल्याच लोकांचा मोठा भरणा गेल्या साली कैद्यांच्या समूहांत आढळतो ह्मणजे १५३१ अपराध्यांत ११३३

अपराधी शेतकरी व लहानसहान कारबाडकष्ट करणारे मजूरदार आहेत. राष्ट्रीय सभेचे आदिजनक मि. ह्यूम यांनीं दोन वर्षां पूर्वीं वरील स्थितीचा कडेलोट झाला म्हणजे काय दुःखद परिणाम ओढवतील याचें चित्र उत्तम दाखविलें आहे. लोक दरिद्री, अनाथ, व अन्नाला मोताद होत चालले म्हणजे त्या राज्याची शंभर वर्षें भरलीं म्हणून समजावींत आणि बंडें, दंगे व राज्यक्रांती यांना कांहींच उशीर लागणार नाहीं. उत्तरोत्तर जीवनकलह मोठा दुर्घट होत चालला आहे आणि त्यांत देखील जमिनीचा धारा वाढविण्याचा संकल्प सरकारचा पक्का ठरला आहे हें कांहीं चिन्ह ठीक नाहीं. प्रजेला, पोटभर अन्न व अंगभर वस्त्र यांची कधीं तूट पडणार नाहीं अशी राज्यकर्त्यांनीं तजवीज केली पाहिजे म्हणजे प्रजेला विद्यामृत यथास्थित पाजलें पाहिजे, मुलुक कामधंदा पुरविला पाहिजे, आणि करांची आकारणी प्रजेच्या शक्ति बाहेर जाता कामा नये. (पुढें चालू)

हिंदु मुसलमानांमधील दंग्याची वाबटळ अद्याप डोळ्यांत धूळ उडवित आहे ह्मणून मोठी दिलगिरी वाटते. पुण्यास ज्ञानोबाच्या व तुकारामाच्या पालखी संबंधानें हिंदु मुसलमानामध्यें मारामारी झाली हें अगदीं ताजें उदाहरण आहे. येण्याचे सुधाकर कर्ते ह्मणतात कीं महामारीला बळी द्यावयाच्या बेळेस मुसलमानांनीं काहूर उसळून दिला. पंढा मोहरम व आषाढी एकादशी यांची गदा एका वेळीं होणार आहे तेव्हां ताबूद, पंजे, पालख्या, वाद्यें भजनें, सोंगें गोहत्या इत्यादि पैकीं कोणत्या बाबी संबंधानें कोणती तक्रार उत्पन्न होईल व त्याचा किती भयंकर परिणाम होईल याचें कांहीं धोरण बांधताच येत नाहीं. प्रभासपट्टण, मुंबई, येवलें, वायव्यप्रांत आदिकरून सर्व मुलुखांत ही उभय लोकांची यादवी व धुमाकूळ चांगली माजली आहे आणि दंगा होतो किंवा होईल असा रंग दिसतो तेथें सरकारचा बंदोबस्त कडेकोट होत असतो. परंतु अशा उपायानें दंग्याचा बीमोड होत नाहीं. सैन्य, तोफांची सरबत्ती, बंदिवास, काळेपाणी, फांशी इत्यादि साधनें उध्दवलेला दंगा मोडण्यास चांगलीं समर्थ आहेत परंतु हा कांहीं चांगलासा प्रतिबंधक उपाय नाहीं. हिंदु लोक ह्मणतात कीं मुसलमानास सरकारचें अप्रत्यक्ष पाठबळ मिळत आणि मुसलमान ह्मणतात कीं विद्येनें पूढें सरसावलेल्या हिंदू लोकांवर सरकारची मेहरबानी आहे. आणि अशा वादावर आंग्लो इंडियन पत्रकर्ते कोटिक्रम करितात कीं वरील परस्पर विरोधी गोष्टी वरून सरकारचा निःपक्षपातीपणा चांगला कळून येईल. मुंबईचा दंगा उध्दवल्या पासून आम्ही सूचवित आहों कीं सरकारानें तिऱ्हाईत पणानें उभय जातीच्या लोकामधील वादांगांचा निकाल करून परस्परांच्या चालीरिती, हक्क अधिकार, यांचें योग्य नियमन करून टाकावें, आणि उभय जातीपंचाचे साह्यानें सर्वांची मैत्री करून द्यावी. सरकारची राजपद्धति अद्याप आहे ती नारद मुनी प्रमाणें कळ लावून मौज पाहण्याची आहे. पुण्याच्या हिंदु जाहिर सभेनें थोडे दिवसांपूर्वीं मुंबई सरकारचें एकपक्षीय वर्तन स्पष्टपणें दाखविलें आहे. असल्याच वागणुकींत मूळबीज आहे. दंग्याचें हें मूळ बीज उपटून टाकल्या शिवाय दंगे बंद होणार नाहींत ह्मणून आम्ही ही सूचना करितों.

आमच्या वऱ्हाड प्रांतांत हिंदुमुसलमानांची एकी व मैत्री आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. बहुत करून आमच्या प्रांतीं दंग्याची भिती नाहीं. फार वर्षांपासून उभय जातीच्या लोकांमध्यें परस्पर दळणवळण, व्यवहार व सलाम वगैरे चालू आहेत. कांहीं ठिकाणीं मुद्दाम भांडण उत्पन्न करणारे लोक तुरळक आढळतात आणि त्यांच्या मध्यें मारामाऱ्या देखील होतात परंतु त्याचा संसर्ग इतर सुखवस्तुजनास बिलकूल होत नाहीं. उदाहरणार्थ अकोट स पालखी संबंधानें तंटा पडला होता परंतु तो कांहीं विशिष्ट व्यक्तींमधील असून त्यास सार्वजनिक कांहीं स्वरूप नव्हतें. अशा आनंदाच्या व सख्यभावाच्या प्रेमळ वर्तनांत कांहीं अधिकारी आपल्या एककल्लीपणानें बिब्बा न घालतील व उभय लोक बाहेरील गोष्टी ऐकून परस्परांच्या उपमर्दास प्रवृत्त न होतील तर अद्यापपर्यंत स्वस्थता, शांतता, व एकत्रपणा हीं आह्मामध्यें जशीं वास करीत आहेत तशींच कायम राहतील अशी आमची पूर्ण खातरी आहे.

विषयसुखाच्या लालसेनें किती मनुष्यें मातीमोल झालीं असतील याची गणतीच करितां येणार नाहीं. किंबहुना दुनियेच्या इतिहासाला वैचित्र्य आलें आहे त्याच्या बहुविध कारणा पैकीं एक बलवत्तर कारण कामलीला अथवा कटिशूळव्यथा हेंच आहे. मुलांला अल्पवयांतच धडा शिकविला असतो कीं– 'स्वस्त्री वांचूनि इतर स्त्री ती माता स्वसा सुता मान' परंतु हा कित्ता फार थोडे लोक वळवितात. हे विचार सूचण्यास राष्ट्रीय सभेचे हितचिंतक मि० नार्टन यांचा व्यभिचार हें कारण झालें. मि० नार्टन व्हाइसरायचे कायदे कौंसिलदार होतात तोंच त्या उच्च स्थाना पासून त्यांचा अधःपात झाला. पापाचा घडा केव्हां भरतो व केव्हां फुटतो याला कांहीं नेमच नाहीं! बहुत प्रसंगीं पापाचरण अकल्पित मार्गानीं दत्त ह्मणून मनुष्याच्या आड येतें आणि क्षण न लागतां त्याच्या सर्वस्व सुखाचा किल्ला जमीनदोस्त करितें.

मि० नार्टन आपल्या व्यभिचाराच्या घोरपडीतून एकदा सुटले ह्मणून त्यांच्या इतर चांगुलपणाच्या आठवणीनें बरें वाटतें. कैदेची शिक्षा त्यांस खरोखरीची झाली नाहीं तरी त्यांचें मन त्यांस खऱ्या कैदेची उत्कृष्ट कल्पना देईल. सलीव्हन नांवाच्या गृहस्थाची धर्मपत्नी यांच्या नादानें खऱ्या संसारसुखाला आंचविली असें आम्ही हिंदुलोक म्हणतो. या बाईस आपल्या कृतीचा पश्चात्ताप बहुत वाटला तरी मातीच्या घड्या प्रमाणें पातिव्रत्याचा भंग एक वेळ झाला कीं तो कायमचा झाला. या बाईनीं आपल्या नाराच्या सुटकेसाठीं. मि. सलीव्हन पाशी विनवणी केली म्हणून मि. नार्टन फौजदारीतून वाचले. गेल्या आठवड्यांत मि. नार्टन यांनीं विलायतच्या कोर्टांत आपल्या दुराचरणा बद्दल सुमारें ४९ हजार रुपये खर्च करून प्रायश्चित्त घेतलें. ज्या बाईचे वंचन कायदेपंडित मि. नार्टन यांनीं केलें त्या बाईशीं हे लग्न लावून सुखानें संसार करोत आणि त्यांच्या भावी वर्तनानें गत दुष्कार्तीवर जंग चढो असें आम्हीं इच्छितों. कुर्ग प्रांतांत वकीली करणार नाहीं व कायदे कौंसिलदार होणार नाहीं असें वचन मि. नार्टन यांनीं मि. सलीव्हन पास दिलें आहे. मि. नार्टन यांस कोणी हंसावयाला नको. पुष्कळांच्या पापा खालीं अशीं अनर्थावह कुलंगडीं जळत असतील! आयरलंडचा देशभक्त पार्नेल यांची कोण वाहवा होती आणि आयरलंडांत त्यांच्या शब्दा शिवाय पान देखील हालत नव्हतें परंतु ओशियांशी केलेला व्यभिचार जगप्रसिद्ध होतांच मि० ग्लाडस्टन इत्यादिकांनीं त्यांस तुणवत व पशुवत समजून त्यांस मरणप्राय यातनेंत लोटून दिलें.

दुराचरणें उजेडांत आलीं ह्मणजे नांवें ठेवण्यास सर्व तत्पर राहतील परंतु जर कोणी दुराचरणाचा असला वाईट परिणाम पाहून पश्चात्ताप पावला व पापनिवृत्त झाला तर आह्मी या लेखाचें सार्थक्य समजूं. पुण्याचरणाचें फळ स्वर्गतुल्य किंबहुना अमोल आहे ह्मणून आह्मी अशा इतिवृत्तकथनानें स्वतांस व लोकांस पुण्यशील करूं इच्छितों.

फ्रान्स देशाचे मुख्य प्रधान कारनाट यांचा एका इट्यालीयनें खून केला ह्मणून तो देश व सर्व युरोपखंड हळहळत आहे! फ्रान्साला कारनाट साहेबा सारखे मुत्सद्दी फार पिढ्यांत मिळाले नव्हते. त्यांची कारकीर्द शांतिप्रसारक, संपत्तिवर्धक, स्वास्थप्रिय अशी झाली. लढाईचीं वादळें यांच्या अंमलांत झालीं नाहींत ह्मणूनच फ्रेंच राज्याचें जहाज कालसमुद्रांत आनंदानें पर्यटण करीत होतें. त्यांच्याच तोडीचे व किंबहुना निवडानिवडीच्या प्रसंगीं मताधिक्यानें त्यांच्यावर वर सरशी करण्यासारखे दुसरे गृहस्थ कासिमिर पेरिअर हे त्या प्रजासत्तात्मक राज्याचे सूत्रधार बहुमतानें झाले आहेत. फ्रान्सावर वरील खुनानें मोठें अरिष्ट ओढवलें त्याला कारण एका राज्यद्रोही इट्यालीन लोकांची टोळी आहे. तिच्यांतील लोकांनीं चिठ्ठ्या टाकून संटो नांवाच्या इसमाकडे त्या खुनाची कामगिरी सोंपविली आणि त्यानेंच ती अखेर बजावली असें बाहेर आलें आहे.

फ्रान्स देशांतील दंगेधोपे पाहिले ह्मणजे आपल्या देशांतील सुस्थितीचें महत्व विशेष वाटतें. फ्रान्सची राज्यव्यवस्था आवडत नाहीं असें लोक तिकडे आहेत तसे इंग्लिश राज्यकारभाराला नाखुष व असंतुष्ट असे लोक इंडियातही असतील. परंतु वरील प्रकारचे खून व दंगे इकडे होत नाहींत हा गुण कोणाचा? इंग्रज सरकारचा चांगुलपणा किंवा नेटिव लोकांचा राजनिष्ठपणा फक्त एकटें वेगळें कारण आहे असें आह्मी ह्मणत नाहीं. कांहीं गुण सोनाराचा व कांहीं सोन्याचा असतो त्या प्रमाणें आहे. आमचें शौर्य, विक्रम, व देशाभिमान अद्याप आमच्या शरीरांत खेळतात परंतु सत्य प्रतिज्ञा, राजनिष्ठपणा, व प्रामाणिकपणा, यांच्या बंधनांनीं आम्ही व आमचे राज्यकर्ते एकत्र सुखानें नांदू असाच या देशाचा निर्धार आहे. हत्याराचा कायदा केल्यानें, निःशस्त्र बनविल्यानें, सुधारलेल्या गुलामगिरींत लोळविल्यानें आम्ही बंडखोर व राजद्रोही होणारे लोक नाहीं हें राज्यकर्त्यांनीं पक्कें समजून आम्हा लोकांस समदृष्टीनें, आपरबुद्धि सोडून व परहिताच्या विचारानें वागाविण्यास शिकावें !

राज्यकारभारा निमित्त सरकारानें भिन्न भिन्न व्याजाच्या दरानें कर्जे काढेलीं आहेत त्या पैकीं दर साल दर शेंकडा चार व्याजाचें कर्ज एक अब्ज आहे. हीं कर्जे पुष्कळ वर्षां पासून सांचत सांचत येत चाललीं आहेत. गेल्या ३० व्या तारखेची हिंदुस्थान सरकारची जाहिरात अशी आहे कीं १८४२-४३ सालच्या गव्हरनमेंट प्रामिसरी चार व्याजाच्या नोटावर येत्या आगष्ट महिन्या पासून ३॥० रुपये व्याज आकारलें जाईल. तसेंच सन १८९४-९५, १ मे १८६५, व १८७९ या सालच्या सरकारांतील ठेवी वरही चार व्याजाच्या ऐवजीं ३॥० व्याजाचा दर आकारला जाईल. तेव्हां ज्यांच्या पाशीं वरील सालच्या सरकारांत व्याजी लाविलेल्या ठेवीच्या नोटा असतील त्यांनीं जुन्या नोटा व्यांकेवर दाखल करून नव्या नोटा त्याच्या मोबदल्यांत करून घ्याव्या. या नोटा नव्या करण्या साठीं नेल्या ह्मणजे त्यावर १८९५ जुलै ३१ तारखे पर्यंत ३॥० व्याजाच्या दरा वरील जुन्या दराशी पडलेला फरक आगाऊ आकारला जाईल. या शिवाय १८३२-३३ सालच्या व १८३५-३६ सालच्या ठेवी जुलै २८ वे तारखेपर्यंत १८६५ मे १ तारखेच्या ठेवींत बदलल्या जातील तेव्हां त्या त्या सालच्या ठेववाल्यांनीं आपल्या ठेवी बदलून घेण्याची त्वरा करावी.

व्याजाचा दर कमी केला आहे यावरून सरकाराला कर्जाऊ पैसा नको असा भावार्थ नाहीं. पूर्वीं स्वीकारलेल्या ठेवी वर चार रुपये प्रमाणें व्याज देण्याची ताकद नाहीं ह्मणून ही योजना आहे. सांपतच्या स्थितीला ही व्यवस्था नामी असून पुष्कळ फायदेशीर आहे पण सरकारच्या अभिवचनावर ज्यांनीं पैसा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष सरकारास ठेवीच्या रूपानें दिला त्यावरील व्याज उतरलें ही ठेववाल्यांची बुडणूक आहे आणि बाजारांत व्याज उतरल्यामुळें त्या ठेवीची वेचीही कमी भावानें होईल असा दुहेरी तोटा झाला. परंतु सरकारापाशीं त्राण नाहीं ह्मणून ही निरुपायाची तोड सरकारानें काढली यांत कांहीं गैरशिस्त नाहीं परंतु सर्व चार व्याजाची कर्जे ३॥० व्याजाच्या ठेवीच्या नोटांत बदलावयाला पाहिजे होतीं आणि ही व्यवस्था एकंदर एका अब्ज कर्जा संबंधानें केली नाहीं हा भिन्नपणाचा व अर्धवट प्रकार झाला हें बरोबर नाहीं.

The Berar Samachar.

MONDAY JULY, 9, 1894

The Berar Sarvajanik Sabha's protest contravening the proposed enhancements of the land-revenue is welcome by the Local and Imperial Governments. Whatever the final decision may be on the question, we are are much obliged to Messrs. Joshi and Mudholkar the prime movers of the institution for their energetic, cordial and vigorous lead in the matter. The quota of success that their protest attains is a promising earnest for them to shrink from no responsibility and to leave nothing undone. The Berar Sarvajanik Sabha has ably refuted the arguments

put forward in Government's proposals. The statistics and quotations in the protest prove that things are not what they appear. The representation of the Sabha is however limited to the points of the original proposals. We would take here a bird's eye-view of the general out—look of the agricultural status because that position in regard to the bulk of wealth and the degree of com[illegible]s the condition of the province.

The [illegible]ural condition of the people is not attractive. The masses that form the main population have no staying power in them. They are bordering on the brink of poverty and starvation. Land is fast changing proprietors and the actual cultivators run on on to increase the alarming numbers of *pure* tenants. They are at the mercy of those who hold land from the Government and the proposed enhancements threaten to change the sub-tenancy into a matter of hard work and no gain. The class of money—lenders and pleaders is growing richer and wealthier at the expense of the agriculturists. The drain of the province's resources to maintain a double government is telling upon its material prosperity The English administration is very expensive and burdensome and the claims of the Suzerin—power—the Nizam upon the surplus revenues are satisfied to the total exclusion of all public demands We are as it were a buffer state and our revenues are hampered a vast deal. The province is a security with the Government for the expenses of contingent armies and a trust as regards administration. The British India is groaning under the *cursed* home—charges while our grievance is that the province sacrificed for the maintenance of a capital army. Peace is thus purchased at a heavy price and safety of purse and person is promised by a largely spending administration. There are no industries worth mention and hence springs up the agragrian discontent. In derogation of the blessings of the benign administration the system of Civil justice foments quarrelsome influences and entices men to fight upon their estate with the risk of its loss in the long run. We do not know how to depict the true state of the agricultural classes. Here is an apt illustration of what we mean in an article of the Pioneer:—

"But when we come to consider the distribution of this flood of wealth which has been set flowing throughout the country within a generation, we cannot help arriving at the conclusion that the prosperity thus called into being has been of remarkably chequered character. While the progress of the commercial classes has been surprisingly rapid, there is a consensus of opinion that the agricultural community has been unable to secure its due share of the increased value of the produce, while, on the other hand, there are causes at work which tend to deprive it of any share of profits which it has been able to grasp."

The mankind has no doubt gained so far as to bring the whole world to administer to its pleasure and happiness with the recent inventions add appliances but the question is how far our people contribute to strike a handsome balance of material prosperity. Our people pay for what they receive but in the coming time of hard struggle we shall not have enough to purchase because we are emptying our pockets to the last pie. We are not wealth—producing people except in so small a measure as we reach in tilling our lands and reaping the harvest. The present emergencies call for a new direction in industrial activities. Our prospect must be gloomy and disheartening indeed if no resourceful industry is opened for our manual labour. The rental share of the Government in land—produce leaves a margin of bare maintenance. Land is not returned to government on account of its high rent because we must not lose even what little we have to work in and live upon. Our argument will point out to the Government the necessity of opening new markets for labour if they wish to queil agragrian discontent. Enhancements of the land—tax will breed discontent and loosen the spring of agricultural activity to a deadly loss of the staying power.

Is Indian Nation built in a quarter of a century? The question suggests itself upon reading a History of the Indian people in the columns of the Pioneer—a paragon of Anglo-Indian knowledge and philosophy. The learned editor mentions with due pride the traditions and events that formed the kingdom of Great Britain; but when he descends to philosophise upon Indian history he puts forth for people's admiration the Indian Empire as a marvel of the world—the out-come of English knowledge and wisdom. Let the reader go over the following piece taken down by the Hindu of Madras from the Pioneer:—

"Revolutions there have been, it is true," writes the Pioneer "but the country was slowly ripening for these movements, and, *looking back* upon them from the stand-point of modern life and modern history, they appear to us as no more unnatural than the hourly striking of the clock that denotes the progress of a day's time. Everything has taken time to ripen and develop. When the due time came, and the growth was complete, the fruit either fell naturally, or some accidental jar precipitated events by a little, and the same result followed." It is these lessons, some of them commonplace and some absurd, that the Pioneer has learnt from Green's History. And in the ardour of its newly attained enlightenment, forth it comes to apply them to what seems to it to be the condition of things in India. And what does it see here? "The whole procession of events," it writes, "if spasmodic leaps can be called a procession, has been contrary to all that history has taught us to be essential to stability. There is nothing in the history of the Indian people that has been led up to by the slow but sure action of time. Everything has been untimely sudden, and the result of some freak of the faddist. On no part of the edifice thus built up can we trace the substantial masonary that has stood the test of time and has shown itself strong enough to stand a further weight being superadded to it. To the historian of the future it will appear like some building run up for the exhibition of men's fads and, perhaps pulled down when sound sense has shewn the superiority of a structure founded on a solid political basis and built up on the actual needs of the country." The *Pioneer*, of course, thinks it is absurd to talk of the Indian people. "We (the *Pioneer* at any rate does not, we should think) assume the people of India to be the men who call themselves so—the educated Brahmin and the Bengali Babu." The history of these two classes, our contemporary states, "has had exactly thirty-six years of life." The changes inaugurated after the mutiny, by throwing open appointments to "purely literary qualification, led to the sudden growth of the classes. Our readers can easily imagine the rest of the *Pioneer's* line of argument."

What is here said of the Bengali faddist is typical of the perverted views of the Anglo—Indian papers. We care a fig for such remarks and we are prepared to prove that the English Empire has been the growth of the native loyalty and devotedness to one power since once it took its roots in the hearts and sympathies of the people. The Engliah dominion is no real marvel. It was a matter of pure accident and a concourse of fortunate events. The French dominions had equally the same run of chances and misadventures. The latter would not have been a whit worse. Events at that stage of the Indian history prepared a way for foreigners and were ready to institute any power on the throne. We do not think we shall be far from the truth if we trace the foundations of the British empire to the wisdom, foresight and appreciation of our amestors who perceived full well the march of events and welcomed a race as rulers for their liberal promises and sterling merits of honesty and proud traditions.

Some Anglo-Indian papers attempt to represent us as people who spread disaffection and sow seeds of rebellion. We are stamped with the hall—mark of unfitness to criticize the Government from the stand—point of honest convictions within due bounds of loyalty because we wield the power—the liberty of the press as a mischievous giant. Granted for argument's sake that we do so. Will not such a measure necessitate the suppression of a pullication like the following from the pen of an eminent Anglo—Indian?

"Their hope is that next time they will all stick together, and, delusive as the hope may be, it is based on one week spot in our rule, to which the writer of these words has through more than forty years incessantly drawn attention. The Indian Empire is the only grand political structure in the world which hangs in air. Even the British Empire, though it has grown and grown till its surface is to its stem like the head of a mushroom to its stalk, rests on one solid basis, a nation of thirty-nine millions who cannot be defeated by equal numbers in the field, who can move throughout the ocean pathway, be the enemy who he may, and who can raise more money for a seven years' war than all Europe put together. The British Empire in India rests on nothing but its white soldiery. We have governed for a centuary with an intention of governing well, and in many respects we have succeeded."

What does it effect? It curdles our blood to think for a moment that the English rule rests on its *white* Soldiery. The people hailed the advent of the British empire because it promised a dawn of civlization and a free nationality. Is it not libellous and seditious to turn our minds from the good bright side of the English rule?

वऱ्हाड.

हवामान—पावसा बद्दल मोठी हाकाटी आहे. किरकोळ पावसाच्या सरी पडतात व भावी वृष्टीचें अश्वासनही कृपाघन देतात पण अनुभवास गोष्ट येईल तेव्हां खरें. रोगराई ह्मणण्या सारखी कोठें आढळांत नाहीं.

रा. रा. गणेश बापूजी जिल्हा जज्ज, वाशीम हे यवतमाळाहून येथें येऊन मित्र मंडळीच्या भेटी साठीं दोन दिवस राहिले आणि आपल्या कामावर वाशिमास रुजूं झाले.

श्रीयुत कर्नल मेकेंझी यांची स्वारी हैद राबादेहुन आज रोजीं परत उमरावतीस जाण्याचा प्रोग्राम ठरला आहे.

कर्नल सी. टी. लेन इनस्पेक्टर जनरल पोलीस इत्यादि हे गेल्या ४ थ्या तारखेस हैदराबादेस रवाना झाले. येत्या शुक्रवारच्या आगबोटीनें तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जाणार आहेत. या रजे नंतर ते आठ दहा महिने काम करून नंतर पेनशन घेणार आहेत. यांच्या सारखा अनुभवी, कृपाळू, कार्यदक्ष व चतुर अधिकारी विरळा मिळेल !

मे. राईट पोलीस सुपरीनटेंडंट हे वरील तीन महिन्यांच्या रजेत इनस्पेक्टर जनरल होणार असल्या विषयीं ठरलें आहे.

मि. आर. आर्बर्ड सिव्हील आणि सेशन जज्ज यांची नेमणूक वऱ्हाडा साठीं लांड रेव्हिन्यू कोड (रयतवारीचा कायदा) रचण्या संबंधाच्या विशेष कामगिरीवर सिमल्यास एक महिन्या साठीं झाली आहे.

लांड रिकार्ड खात्यांतील ७५ रुपये पगाराचे सेकंड क्लार्क रा. रा. गोपाळराव नागपूरकर यांनीं आपले सरकारी चाकरीचा राजिनामा दिला. कारण काय झालें तें समजलें नाहीं.

निजाम सरकारची स्वारी शिकारीहून परत आल्यानंतर एक दरबार भरविणार आहे आणि त्याच दरबारांत नवाब विकार उल मुल्क यांस दिवाणगिरीचीं वस्त्रें मिळतील असें लोक बोलतात. मि. लौडन रेसिडेंट हेच सध्यां निजाम सरकारचे खरे मंत्री व चालक आहेत.

आमच्या जिल्ह्याचे पोलीस इन्स्पेक्टर रा. रा. धोंडजी कोंडजी हे यंदा मोहरमची व आषाढी एकादशीची व्यवस्था नेहमीं प्रमाणें सुयंत्र व सुरळीत लावतील असा आश्वासपूर्ण भरंवसा आहे. आरंभापासून या जिल्ह्यांतच यांचा उत्कर्ष झाला व येथील लोक यांचा हिकमती व चतुराईचा सल्ला मोडूंही शकत नाहींत.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहीरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. क्वा १९ मिसल नंबर १२

१८९४

विद्यमान सिविल जज्ज साहेब जिल्हा अकोलें. यांचे कोर्टांत

नांव गोविंद चिमणाजी कुळकर्णी राहणार मोखता० बाळापुर जिल्हा अकोला यांस मयत भगवंत बापाचें नांव चिमणाजी रहाणार मानेगांव तालुके खामगांव जि० अकोला याचें कर्ज वसूल करितां येण्यासाठी सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहु अर्जदार यांणें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणुन ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यानीं तारीख १७ माहे जुलई सन १८९४ इसवी रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ९ माहे जुलई सन १८९४. इसवी.

शिक्का

V. N. Dandeker.
सिव्हिल जज्ज.

वर्तमानसार.

चीन व जपान यांमध्यें वैमनस्य अति पडलें असून कोरिया येथें युद्ध संग्राम जबरदस्त होईल असें दिसतें.

कांहीं अफूच्या लागवडी विरुद्ध असणाऱ्या युरोपिअन लोकांना साक्ष देण्यास सरकारानें येऊं दिलें नाहीं.

चिलास किल्यावर काश्मीरची फौज ठेवावयाचा सरकारचा विचार आहे.

जर्मन लष्करांत आठ बायकांस कर्नलचा हुद्दा मिळालेला आहे. आमचीं हत्यारेंच गेलीं तेव्हां आमच्या हिकडे असले हुद्देदार होण्यास योग्य असें पुरुष तरी तयार होऊन कसे पुढें यावेत!

यंत्रानें बुटाला ब्ल्याकिंग लावणें—शिकागोच्या प्रदर्शनांत अशा प्रकारचें यंत्र आणलें होतें. त्याचा अनुभव पहावा या हेतूनें एका भोंकांत ९ सेंट ह्मणजे २॥ आण्याचें एक नाणें टाकलें व यंत्रा समोर ठेवलेल्या खुर्चीवर बसलों. इतक्यांत दोन बाजूला ब्रश फिरूं लागले ज्या बाजूस ब्ल्याकिंचा डबा ठेवला होता तो आपोआप वर आला ब्रशास तें ब्ल्याकिंग लागलें. नंतर तो खालीं गेल्यावर एक बुटासुद्धां पाय त्या ब्रशाखालीं टवला व चोंहाकडे तें लावावें, ह्मणून पाय फिरविला. एकां पायाचें झाल्यावर तो दुसऱ्या ब्रशाखालीं ठेवतांच त्याच्या जलद गरगर फिरण्याकडून त्या बुटावर चकाकी आली हे ब्रश साडेतीन मिनुटें फिरतात. अडीच मिनुटें झाल्यावर घांट वाजते; व एकच मिनीट राहिलें आहे असा इशारा देते. मनुष्याच्या बुद्धीची अगदीं कमाल! हीं यंत्रें निरनिराळ्या शहरांतील मुख्य मुख्य रस्त्यावर ठेवणार आहेत. न्यूयार्क व इतर शहरांत जीं लहान लहान गरीब मुलें बुटाला ब्ल्याकिंग लावून आपला उदरनिर्वाह करितात त्यांच्या पोटावर पाय पडला. पण रडत न बसतां हीं अमेरिकन पोरें दुसरा कांहीं धंदा काढतील बरें!

किमया करणारा साहेब -- फ्रानसीस नामक एका भामटे साहेबास एका माजिस्टेटानें तीन महिने सक्तमजुरीची कैदेची शिक्षा दिली. त्यानें असें ढोंग मानविलें होतें कीं साळूंखी सारखें ओरडणारे एका काळेकुळकुळींत विलायती पाखराचें कलेवर जाळून त्याच्या भस्माच्या लेपनाने तांबें पितळेचीं भांडीं मी सोन्या रूप्याची करून देतों! याच्या नादीं कित्येक लोक लागून फसलेही गेले.

सरकार स्वारी खुष होईल असा शिकारीचे वेळीं फोटो काढल्यावरून निजाम सरकारांनीं तेथील प्रसिद्ध फोटोग्राफर मि. लाल दीनदयाळ यांस २९ हजार रुपये इनाम दिले.

फ्रेंचांनीं बुडालेल्या आगबोटी शोधून काढण्याकरितां एक आगबोट तयार केली आहे. तिजवरील दिव्यांचा उजेड १९,००,००,००० मेणबत्यांच्या इतकां पडतो. सु० प०

मध्य प्रांतांतल्या दुष्काळाच्या कामावरील माणसांची संख्या वाढत आहे. सागर जिल्ह्यांतल्या कामावर ७,७०० लोक झाले. ह्याही जिल्ह्यांत कांहीं कमी झाले तरी १, ३२३ आहेतच. काम करून घेतल्यावांचून फुकट खाऊं घालण्याची व्यवस्था मुळीं केलेलीच नाहीं डाको जिल्ह्यांत धान्याचा भावही वाढला आहे.

श्रीनगर येथें पाऊस फार पडत असून महापुराची भीति आहे. कडकत्यासही एकसारखा पाऊस पडत आहे.

मध्यहिंदुस्थानांत धान्याची फार महागाई होत असून रीलीफ कार्य सुरू करण्याची वेळ येणार असें दिसत आहे.

बल्लदेशाच्या सरहद्दीबद्दल हिंदुस्थानसरकार एक कायदा करण्याच्या विचारांत आहे.

अ० द०

मोरोक्को येथून आलेल्या ताज्या बातमीवरून कळतें कीं, तेथें घोटाळा झाल्याचे कळतांच इंग्रज सरकारची एक गनबोट तावडतोबीनें तांजीर येथें निघून गेली. इंग्लिशांनीं यावेळीं आपलें घोडें पुढें सारल्याचें पाहून फ्रेंच व स्पेनांतील लोक यांचें पित्त फारच उसळलें आहे. फ्रेंच पत्रकर्त्यांनीं इंग्लंडावर आपला बिलकूल विश्वास नाहीं, असें स्पष्ट लिहिलें असून तांजीर येथें इंग्रज लोकांला फ्रेंच उतरूं देणार नाहींत असें दर्शविलें आहे! युरोपियन राष्ट्रांची स्थिति हल्लीं बिघाड पक्ष्याप्रमाणें झाली आहे. अंमळ कोठें क्षत पडल्याचें दिसें पर्यंत काय तो अवकाश; लगेच तीं तेथें उड्या घालतात; व एकमेकांस तूं कां? तो कां असें करून झोंबू लागतात.

थोडें दिवसांपूर्वी चीन देशांत एका तरुणाला त्यानें पितृहत्या केली म्हणून फांशी देण्यांत आलें; व त्याचे बरोबरच त्याचे शिक्षकालाही त्या शिक्षकानें त्याला पितृभक्त असण्या विषयीं जेंव्हां शिकवावयाचें तसें शिकविलें नाहीं ह्मणून फांशी देण्यांत आलें! ही पद्धत विलक्षणच होय!

घातकी मास्तर—हवेली पैकीं मौजे हिंगणें येथील गांवठी शाळेवरचा मास्तर भालचंद्र रघुनाथ लेले हा आपल्या शाळेंतील ३।४ मुलांचे अंगावरील सुमारें ७५ रुपयांचे डागिने काढून घेऊन त्यांस शाळेंतल्या एका खोलींत कोंडून ठेवून तो फरारी झाला. त्याला पोलिसानें मुद्देमालासह पकडून म्याजि. पुढें उभें केलें. आरोपी गुन्ह्यास कबूल असल्यामुळें हवेलीचे ऑनररी म्याजि. रा. ब. रास्ते यांनीं त्याला आठ महिने सक्तमजुरीची शिक्षा दिली.

वेड्याकडून खून—गेल्या आठवड्यांत शिरूर (घोडनदी) येथें इस्पितळांत असलेल्या बापू भाई नांवाच्या एका मुसलमान वेड्यानें त्याजवर पाहण्यास असलेल्या पोलिस शिपायाचा भयंकर रीतीनें खून केला. शिपाया पेक्षां वेडा फार दांडगा व सशक्त होता. त्या शिपायाजवळ वेड्यानें पिण्याला पाणी मागितलें तें आणण्यास शिपाई लोटा घेऊन गेला. व जातांना वेड्याचे खोलीचें दार बाहेरून कडी लावून घेतलें, आणि पाणी आणल्यावर उघडलें तों वेड्यानें त्याच्या हातचें पाण्यानें भरलेलें भांडें होतें तें घेऊन त्याचें डोक्यावर जोरानें मारलें त्यामुळें शिपाई तिरीमिरी येऊन खालीं पडला. तेव्हां त्याचे पाठीवर वेड्यानें बसून त्याच भांड्यानें त्याचें डोकें इतकें ठेचलें कीं, त्यामुळें तावडतोब तो शिपाई मेला! वेड्याला येथील डाक्तरखान्यांत तपासणीकरितां आणिलें आहे. सरकारच्या नौकरींत शिपाई मारला गेला आहे; तेव्हां त्याचे कुटुंबी यांस कांहीं तरी पेन्शन देण्या विषयीं आमच्या जिल्ह्याचे पोलिस सुपरि. हे शिफारस करतील असें आह्मी इच्छितों.

दी. बं.

मुलतान शहरांत एका मुसलमानानें पुष्कळ कबूतरें बाळगलीं होतीं. दुर्दैवानें एक बोका त्या खुराड्या पाशीं गेला. हें पाहून त्या मुसलमानानें त्या बोक्यास धरून एका खोलींत कोंडलें. आणि कांठीनें त्यांस मारूं लागला. आपल्यास पळून जाण्यास कांहीं उपाय नाहीं, असें पाहून रागानें त्या बोक्यानें उडी मारून त्या मनुष्याच्या नरडीचा घोट घेऊन त्यांस ठार मारलें. दार लाऊन त्या मुसलमानानें हें कृत्य केलें होतें. पुढें दोन दिवस त्याचें दार उघडलें नाहीं असें पाहून शेजाऱ्या पाजाऱ्यांनीं त्याच्या खोलीचें दार उघडलें तों तो बोका त्या मनुष्याचें मांस खाऊन खुशाल मजेंत आहे असें दिसलें.

हिंदुस्थान सरकारकारचा ठराव सार्वजनिक विश्रांति स्थानाविरुद्ध गुन्हे केल्याबद्दल खटले केले, आणि विश्रांति स्थान मुनसिपल हद्दींत असलें तर त्या गुन्ह्याबद्दल जे दंड करण्यांत येतील त्यांचा पैसा मुनसिपालिटी कडे जमा करावा असें हिंदुस्थान सरकारानें नुकतेंच ठरविलें आहे.

इंडियांतील यंत्रालयें, गिरण्या व कारखाने हीं सांप्रतच्या प्रमाणानें हळूं हळूं वाढत गेलीं तरी देखील हा देश विलायतेला मागें सारील अशी तिकडील गिरणीवाल्यास दहशत पडत चालली आहे. या देशांतील तागाचा व्यापारबंदा फार फैलावला हें पाहून डंडी येथील कारखानदार व मजूरदार लोक ओरडूं लागले आहेत. कापसावरील जकातीचा प्रश्न निघाला होता तेव्हां मानचेस्टर वाल्यांनीं आकाशपाताळ एक केल्याचें आमच्या डोळ्यापुढें खेळत आहे तरी देखील तिकडील लोकांची ओरड निराळ्या प्रकारानें चालूंच आहे. विलायतच्या पत्रामधून अलिकडे असे उद्गार बाहेर येऊं लागले आहेत कीं ग्रेट ब्रिटनवाल्यांनीं नीवापाड मेहनतीनें इंडिया देश जिंकिला तो ग्रेट ब्रिटनच्या व्यापारधंद्यावर तिळांजली सोडण्यासाठीं जिंकिला नाहीं! आमचे राज्यकर्ते पोकळ प्रौढी मारीत असतात कीं इंडियाचें राज्य इंडिया देशाच्या हितासाठींच आम्ही करितों आणि जर नेटीव आपला राज्यकारभार आवरण्या सारखे होतील तर त्यांच्या हातीं राज्यसूत्रें देऊन आम्ही विलायतचा रस्ता धरूं. ही थोरवी बोलण्यास पूरतीं आहे आणि हे उद्गार मनुष्यस्वभावाला विरोधी आहेत हें सर्वजण जाणून आहेत आणि आमची विनंती राज्यकर्त्यांपाशीं एवढीच आहे कीं सध्यां प्रमाणें विलायतच्या सुखवैभवालाच फक्त हा देश खर्ची घालूं नये. कित्येक सामान्य ह्मणी मध्यें देखील मोठा गूढार्थ असतो आणि वरील विनंतीला दृष्टांन्त लागूं पडतो तो असा कीं ऊस गोड लागला ह्मणून मूळा सकट खाऊन टाकूं नये!

शाळाखात्यांतील शिक्षकांचा पगार गृहस्थाश्रमाला व अब्रूदारीच्या निर्वाहाला पुरेसा नसतो ह्मणून कांहीं व्यवस्था सरकारनें करावी एतदर्थ मुंबईचे कौंसिलदार नामदार शेटवाड यांचा भगिरथ प्रयत्न चालूं आहे. कालावधीनें त्यांच्या प्रयत्नाला यश येईल अशी आशा आहे. कदाचित् मुंबई इलाख्यांत निराळी तजवीज झाली ह्मणजे ती या प्रांतांत ही अंमलांत येईल हें उघड आहे. सगळ्याच उष्ट्या गोष्टी या प्रांतानें घ्याव्या असा कांहीं सरकारी ठराव नाहीं तेव्हां आगचे नवे डायरेक्टर नामदार शेटलवाड यांचा विषय आपल्या विचारांत घेऊन कांहीं योजना करितील तर त्यांच्या कारकिर्दीचा श्रीगणेशायनमः शुभकारक होऊन त्यांच्या वर्तनांतील स्वावलंबनाचें प्राधान्य लोकदृष्टीस उदाहरणा दाखल होईल.

सदर्हू नामदार शेटलवाड यांच्या वरील स्तुत्य प्रयत्नांत एक निराळाच प्रश्न उद्भवला आहे. त्यांनीं मुंबई इलाख्यांतील मुनसिपालिट्यांकडून शिक्षकांच्या पगारा संबंधानें कांहीं माहिती मागविली होती. कित्येक मुनसिपालिटीचे प्रेसिडेंट आंग्लो इंडियन कलेक्टर होते त्यांस यांच्या प्रश्नाला उत्तर देणें अपमान कारक वाटलें. हा प्रश्न मुनसिपल सभे पुढें ही ठेवण्याचें त्यांनीं नाकारलें व आपल्या अधिकाराच्या तोरावर नन्नाचा पाढा वाचला हीं गोष्ट इलाखे सरकारास कळविली पण त्यांच्या उत्तरांत नामदार शेटलवाड यांजवर बराच ताशेरा झाडला असून कोणती ही माहिती देणें अगर न देणें हें प्रेसिडेंटाच्या खुषीवर आहे असें ठरविलें आहे कायदे कौंसिलदाराचा व सामान्य गृहस्थाचा अधिकार मुनसिपाटी जवळ माहिती मागण्या संबंधानें सारखाच आहे असें एक स्वतंत्र विधान आहे. मद्रास इलाख्यांत मुनसिपल कायद्यांत मुनसिपालिटीचे कागदपत्र वर्तमानपत्रकर्ते वगैरेस पाहण्यास देण्यासंबंधानें कायद्यानें निराळी तजवीज होत आहे. अद्याप पर्यंत आमच्या वऱ्हाडच्या मुनसिपालिट्यांत असा वादाचा प्रश्न निघाला नाहीं. याला दोन कारणें आहेत. मुनसिपल कामकाजा संबंधानें लोकांमध्यें चांगली कळकळ व आस्था नाहीं. आणि दुसरें, मुनसिपालिटीच्या चालकाचें वर्तन लोकांच्या ह्मणण्याला अपवादकारक असें नसतें. दुसरें कारण समाधानकारक आहे आणि त्यावरून लोकमत कांहीं जागृत असेल तर तें सरकारी मताविरुद्ध नसतें किंवा लोकमताचेंच प्राबल्य असतें. आम्ही आमचे व्हाइस प्रेसिडेंट रावसाहेब देवराव विनायक यांच्या जवळ एखाद्या सार्वजनिक प्रकरणांत कांहीं माहिती मागतो तेंव्हां ते बहुत करून मोठ्या तत्परतेनें ते ती माहिती पुरवीत असतात हेंही या प्रसंगीं कळविणें वावगें होणार नाहीं.

The Berar Samachar

MONDAY JULY, 16, 1894

In the well-known Marathi newspaper the '*kesari*' one may percieve the new flood of light that is thrown on the history of the Marathas after the battle of Panipat. The learned editor suggests a new standpoint from which he looks at the events in which Nana Fadnis and Mahadaji Scindia played the most signal parts. The lives of these two men checkered the history of the people and moulded the facts that happened to pave the way to the establishment of the British Empire. By-the-by we remember full well the indications of the same view that our learned orator of Akola—we mean of course Mr. Vishnu Moreshwar Mahajani M. A.—put forth before his audience in 1892 and 1893 at the Autumn-lecture series. The whole course of history as regards its political aspect is changed by the new theory and we see now the development of Mr. Mahajani's theory in the the columns of the *Kesari*. We were then rather remiss to notice the deep significance of his opinions; and his suggested explanation of this Maratha period shared the usual fate of platform speeches.

The *promised* history of the Mahrattas by Rao Bahadur Ranade is likely to come forth in a short time and we shall then have to revise our meagre historical series in the schools. We come to learn anew in a substantial form the proud national traditions. We have a noble heritage of old times and let the English rulers learn that our political history is not of the last quarter or half of the present century. The Indian nation is not the marvellous creation of the English rule but it is the growth of a number of centuries with so many transitional periods that no word's history has ever witnessed in the same number of years. Mr. Bal Gangadhar Tilak's 'Orion or the researches into the Antiquity of the Vedas' will give an idea of a very old age of 4500 B. C. since then it was that the Indian nation was being built and the Pioneer's history of an Indian people as the outcome of some thirty year's British rule will sink into insignificance and total oblivion. Empires have come and gone and still the Indian nation continues to exist. A people that have outlived so many, and so numerous and so continuous crises in political life must have a long existence to live. The English rule was founded because the national strength wanted some concentraling power to shape it into a consistent whole and it is no wonder when the whole house was set against itself the commercial genius of the English people developed into a political idea of founding an empire. There was no one to wield the power of the nation and the English took time by the fore—lock. The English were destined to rule because there was no prospect of a probable ruler among the people themselves. A strong vigorous, and powerful hand was wanted from the outside to curb the warring elements. For illustration's sake we may instance the reader in the lives of Nana Fadnis and Mahadaji Sinde. One was the genius of the nation and the latter the pattern of military valour. But when the high patriotism and far—reaching aims of Nana Fadnis were rendered null and void by the selfish and self—aggrandising policy of the Scinde the meddlesome and ambitious aspirations of the English people fanned the fighting men's jealousies and laid down the foundations of their own empire. From our own history we have thus a two—fold lesson to set down. We should be one people with the ruling race to make the Indian nation permanent and secure. And let our rulers in turn learn the kind of respect they owe to us as a people of high national traditions and mould us into a part and parcel of the dominions of Great Britain.

Colonel Mackenzie is the oldest officer in Berar and it seems that he retires for good in some few months to come. He confesses in his review of the Progress Report of Forest Administration that it may be his last privilege to review it. Evidently he takes great pain to lay down the general policy of the forest administration and to show to the public with due pride of his intimate knowledge of the subject how advantageous and fruitful the policy has been and how great a store of unforeseen blessings it has in store for us. We make no apology to quote his remarks from the report because they form a permanent record of future guidance and instruction. He proceeds to observe:—

"Our forest policy up to date has been to take up suitable areas for permanent reservation and to work these up to a healthy condition by fire conservancy and general protection, and during the time requisite for this, we met the demands of the province mostly from the unreserved or open forest, which ultimately was destined, where not cultivated, to meet the demands of grazing. The result has been that the cost of administration was very cheap, and an abnormal surplus possible. Now that the unreserved areas are being worked out, and the permanent reserves are in a condition to be, and are being drawn upon more and more, the cost of working them must rise; for, in a permanent reserve, the cost of regulating forest operations naturally must be more costly than what, as above described, was previously the case. I think it is necessary to recognize and bear this in mind, for a failure to do so might lead to a reduction of working charges, which would, I consider, undo the work of over 25 years, and would risk the future of a forest property, in the Melghat of considerable and rapidly increasing value.

"Intimately connected with the welfare of the forests is the prosperity of the people in and immediately around our reserves. Their well—being on whih follows their good will, depends on the wise adjustment of our forest concessions to their necessities. Luckily our position, especially in the Melghat, our chief forest tract, enabled us to be liberal, with the result that the people in the hill tracts are well affected towards us. They practically form an unpaid protective force of great value, in addition to our own staff. Without their ready and willing assistance our great success in fire conservancy would have been impossible. I trust nothing in the future may cause a break in this policy. It is with satisfaction, in this connection, that I can mention the Resident's acquiescence in recent proposals to tax at nominal rates culturable lands in villages within the forest. This recognizes the fact that cultivation in these villages unavoidably greatly suffers from the depradations of wild animals. The concession is one that will, I am sure, be greatly appreciated, and will have the most excellent future esults. Subsidiarily the opening outr of the hill tracts by roads, while it developed our forest resources, has immensely improved the condition of the hill men. From a position of precariously earning their livelihood, and with difficulty making Rs 2 a month to subsist on, the bamboo traffic alone has placed them above want, and on the average an able-bodied adult can make Rs. 10 to 12 a month. The commonest hill-man cooly last season could easily earn his six annas a day. As our roads

opened, the department helped them by advances on easy terms to purchase carts; this was an immense boon."

On the question of increase in the Police Force the Resident has thus expressed himself in his review of the Report of Police administration for 1893:—

"The question of increasing the strength of the Berar police has been separately considered by the Resident, and the necessity of some addition to its present numbers is admitted, but the requiste funds are not at present available. None of the three measures of relief advocated by the Inspector-General has yet come before the Resident, and the submission of one of them, relating to control over the Banjaras, has been considerably delayed. The fact to which the Inspector-General draws attention, that service in the police is becoming less attractive, is not peculiar to Berar, at the same time the number of vacancies specified in paragraph 31 out of a total force of 2,363 men—does not strike the Resident as excessive. It is curious that in Ellichpur, with the popular Melghat taluk attached to it, there is only a single vacancy."

वऱ्हाड.

हवामान— लोकवृंद अत्यंत आनंदित झाला आहे कांकीं

॥ मेघे वृष्टि करूनि तुष्टि दिधली
सृष्टीस पुष्टी हि ती ॥

एकंदर पाऊस ६ इंच झाला. गेल्या चार दिवसा पासून उघाडी आहे. आषाढांतील अमांश, हागवण, वगैरे किरकोळ दुखणीं जोरावर आहेत. मोहरमचा उत्सव निर्विघ्नपणें, शांततेनें व गोडीगुलाबीनें शेवटास गेला. हिंदु मुसलमानांमध्यें दंगाधोपा बिलकूल झाला नाहीं. मशिदी व देवालयें यांच्या पासुन पंचवीस कदम पर्यंत वाजवूं नये हा नियम मांडणें बंद करण्या साठीं पूर्वीच घालून ठेविला होता परंतु त्याची सक्त अमलबारी करण्याचा उभय लोकाच्या शांतपणा मुळें प्रसंगच आला नाहीं.

रा. रा. रामचंद्र भास्कर जयवंत क्लार्क आफ कोर्ट वाशिम यानीं आपली बदली उमरावती स्माल कान कोर्टतांत करून घेतली.

आणि त्यांच्या वाशिमच्या जागीं उमरावतीचे डेपुटी कमिशनरचे डेपुटी क्लार्क रा. रा. नारायण रामराव गुप्ते यांस ७० रुपयांचे पगारा वरून बढतीवर पाठविलें.

उमरावती स्माल कानचे आक्टींग क्लार्क आफ कोर्ट रा. रा. शिवरावपंत यांस तेथील डेपुटी कमिशनरचे डेपुटी क्लार्क नेमिलें.

रा. रा. लक्ष्मणराव गोखले नायब तहशिलदार, यवतमाळ यास वाशिमास पंधरा महिन्यासाठीं तहशिलदार नेमल्या अन्वयें ते आपल्या जागीं दाखल झाले.

मि. इलियट हे अकोल्याहून गेल्या गुरुवारीं मुंबईस गेले आणि तेथून यवतमाळास जाऊन नंतर उमरावती येथें मे. आबर्ड साहेब यांच्या गैरहजिरींत सिव्हील आणि सेशन जज्जाचे कामाचा चार्ज घेतील.

अगरबेशीकडील महिल्यांतील लोकांनीं पाण्याच्या एका नळा ऐवजीं चार नळ देण्या विषयीं डेपुटि कमिशनर मि. हेअर यांजकडे अर्ज केला होता. मि. हेअर यांनीं त्वरितच एक्झीक्युटीव इंजिनिअर यांस तसें फर्मावलें पण अद्याप त्याचा कांहीं पत्ता नाहीं !

मोहरमाच्या सुटीमुळें काल रोजीं वर्षोत्सव व्याख्यानमालेस प्रारंभ करण्याचें काम तडकूब राहिलें. पहिलें व्याख्यान रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांचें होणार आहे.

वऱ्हाडांतील सरकारी निरनिराळ्या खात्यांचीं कामें पूर्वीपेक्षां किती वाढलीं आहेत आणि कामाच्या मानानें लोकांची टंचाई आहे कीं काय या प्रश्नाची चौकशी करण्याचें काम मि. इलियट यांजकडे दिलें आहे. आणि ते गेल्या आठवड्यांत वरील चौकशीसाठीं अकोल्यास राहिले होते.

एका सेशन खटल्या निमित्त मि. आबर्ड सेशन जज्ज यांची स्वारी हैदराबादेस गेली आहे. यांच्या घरीं गेल्या ७वें तारखेस उमरावतीकर वकील मंडळी व कांहीं आफिसर लोक यांस फळफळावळीची मेजवानी झाली.

येथील हायस्कूलचे हेडमास्तरचे जागीं रा. रा. लक्ष्मण कृष्ण विपळूणकर बी. ए. यांची नेमणूक रावसाहेब पटवर्धन यांनीं केली ती अलिशान रेसिडेन्ट यांनीं मंजूर केली आता पुढील नेमणुका नीटपणें व न्यायदृष्टीनें रावसाहेब पटवर्धन करितील अशी आम्ही आशा करितों.

सरकारी आफिसराच्या लोअर व हायर परीक्षा तारीख १७ सप्टेंबर रोजीं उमरावती येथें सुरू होतील.

कारंजा शहरासाठीं एक तीन माजिस्ट्रेटाचें बेंच तूर्त स्थापण्यांत आलें आहे. सध्यां रा. रा. रामकृष्ण श्रीधर, नारायणसिंग माधोबा, आणि प्रयागजी लीलाधर या तीन गृहस्थाची ३ वर्ग माजिस्ट्रेटीवर नेमणूक झाली असून त्याच्या पुढील कामाच्या योग्यतेवर हे बेंच माजिस्ट्रेटची संस्था कायम होणार आहे. रा. प्रयागजी लीलाधर हे या बेंचाचे मुख्य चेअरमन आहेत.

हैदराबादच्या हास्पिटल असिस्टंटाच्या वर्गांतून पसार झालेले दोन गृहस्थ रा० रा० केशव तुकाराम व व्ही० रंगास्वामी हे वऱ्हाडांत निरे वर्षाचे हास्पिटल असिस्टंट झाले.

मि० अहमद अली एक्स्ट्रा असि० कान सरव्हेटर व तहशिलदार मेळघाट यांची तीन महिन्यांची रजा चालू महिन्या अखेर संपणार आहे. गेल्या रजेंत त्याचें काम रा० रा० विनायक विष्णु शिरस्तेदार इलिचपूर हे पहात आहेत.

गेल्या एप्रिल महिन्यांत वऱ्हाड प्रांतांत ६८८० माणसें जन्मलीं व १३६६० मरण पावलीं. हवेच्या उपद्रवामुळें मरणाचें प्रमाण भारी वाढलें होतें.

अकोल्याचे डेपुटी कार्क रा० रा० रघुनाथ बळवंत यास दोन महिन्याची रजा मिळाली.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. छा. १५ मिसल नंबर १३
१८९४

विद्यमान सिव्हिल जज्ज साहेब जिल्हा अकोलें. यांचे कोर्टांत

नांव बाळाबाई मर्द नारायणगीर गोसावी राहणार चिखलगांव ता० बाळापुर जिल्हा आकोला यांस मयत.

नारायणगीर बापाचें नांव गुरु दृतगीर रहाणार चिखलगांव ता. बाळापूर जि० अकोले यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून सदरहु अर्जदार यांणें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणुन ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख ४ माहे अगष्ट सन १८९४ इसवी रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ११ माहे जूलई सन १८९४. इसवी.

शिक्का

V. N. Dandeker.
सिव्हिल जज्ज.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरांत.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. छा. १५ मिसल नंबर १२
१८९४

विद्यमान सिव्हिल जज्ज साहेब जिल्हा अकोलें. यांचे कोर्टांत.

नांव— नागो

बापाचें नांव— उपंबक अ. पा. करणार म्यानेजर रामराव नैकृष्ण राहणार अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांस मयत.

उपंबक बापाचें नांव केशरीनाथ राहणार अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हे इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून सदहू अर्जदार यांणें अर्ज केला आहे त्याज करितां सदहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख १३ माहे आगष्ट सन १८९४ इसवी रोजीं सदहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २ माहे जुलै सन १८९४ इ०

C. E. Biddulph
Offg. Deputy Commissioner
Ellichpur

दि० जज्ज इलिचपूर.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरांत.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि० कि० मु० नंबर १०
१८९४
वर्ग १५

डिपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव ताई
गुरु गुलाबदास बाळउदासी
राहणार भंडारज तालुके दर्यापूर
जिल्हा एलिचपूर यांस मयत.

गुलाबदास बापाचें नांव आग्याराम उदासी राहणार भंडारज तालुके दर्यापूर जिल्हा एलिचपूर यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून सदरहू अर्जदार यांणें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं दाहा १० माहे आगष्ट माहे सन १८९४ इसवी रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं, या कोर्टात स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ९ माहे जुलई सन १८९४ इसवी.

C. E. Biddulph
Offg. Deputy Commissioner
Ellichpur

डिस्ट्रीक्ट ज्यडज्य.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करतां येण्या साठीं सरटीफिकीट मिळावे म्हणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहीरांत.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

वर्ग १५

दिवाणी किरकोळ मु० नंबर ८
१८९४

डेपुटी कमीशनर साहेब जिल्हा येलिचपुर यांचे कोर्टांत.

नांव राधाकीसन

बापाचें नांव सिवरामदास अ. पा. हरकोल रामसुख

राहणार चेंडकापुर तालुके दर्यापुर
जिल्हा येलिचपुर यांस मयत

सिवरामदास बापाचें नांव —

राहणार चेंडकापुर तालुके दर्यापुर जिल्हा येलिचपुर यांचें कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून सदहू अर्जदार यांणें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तीचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यानीं तारीख ८ आठ माहे अगष्ट सन १८९४ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळी या कोर्टात स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २० माहे जुन सन १८९४ इ०

C. E. Biddulph
Offg. Deputy Commissioner
Ellichpur

डिस्ट्रीक्ट ज्यडज्य.

वर्तमानसार.

सरहद्दीच्या बंदोबस्तासाठीं काश्मीरची फौज चित्रल किल्ल्यावर ठेवणार.

यंदा हिमालयावरून बर्फाचा लोंढा खाली आल्यानें तिबेट वगैरे देशांत मोठा अकांत झाला आहे.

मुंबईत खोटीं नाणीं पाडणारा इसम पकडला.

निजाम हैदराबाद पासून ३० मैलावर त्यांचे सेनापती राजा किसनत प्रसाद याचे आरब व हुजूर अरबांत मोठी चकमक उडाली व त्यांत कांहीं लोक पकडले.

रजिष्टर पत्रांतून १०० रुपयाची नोट चोरल्याचा खटला महाराजगंज पोस्ट मास्तरावर चालून शिक्षा झाली.

जर्मन स्त्रिया क्यापटनचे हुद्दे पटकाऊ लागल्या.

गवर्मेंट आफ इंडियानें ९ लक्षांचें सांगशन पिपरी आणि कराचीचे दरम्यान दुप्पट रेलवे लाईन. बांधण्यासाठीं दिलें.

पंजाबांत रावी नदीस एकाएकी महापूर येऊन दोन्ही कडाकडील पाणी फार दूरवर फैलावलें कांहीं गांव जागच्या जागीं बसले. शेती बुडाली, ओतें वगैरे वाहून गेल्यामुळें डिपुटी कमिशनर साहेबांपुढें लोकांनीं कसें करावें ह्मणून विचारलें आहे. म० मि०

मुसलमान व अफगाण लष्कर यांची कुनार खिंडींत मारामारी होऊन, त्यांत १४० मुसलमान व ५० अफगाण शिपाई मेल्याचें कळतें. मारामारीचें कारण समजलें नाहीं.

रशियाची राजधानी सेंटपीटर्सबर्ग येथें कलरा सुरू असून क्रान्स्टाट या बंदरावर तर तो अतिशय जोरांत आहे.

हिंदुस्थानच्या लष्कराची रचना, नव्या पायावर करण्याचा कायदा, लौकरच कौन्सिलापुढें येणार आहे.

जमीन महसुलाचा कायदा, हिंदुस्थान सरकार हल्लीं पुन्हा तपासून पहात आहे. साऱ्याबद्दल इतकी आरडा ओरड चालू असल्याबर अजूनही शोधूं नये तर काय !

हिंदुस्थानच्या गेल्या १० वर्षाचा, उत्पन्न व खर्चाचा नक्की आंकडा तयार करण्याचा हुकूम पार्लमेंटानें केला आहे.

अमेरिकेंतील चिकागो शहराच्या पूर्व, पश्चिम व दक्षिण बाजूच्या रेल्वेवरील कामदारांनीं एक मोठा संप करून काम बंद पाडल्याची तार आली आहे. त्यांच्या बंदोबस्ता करितां लष्करी फौज रवाना झाली. व जिकडे तिकडे बेबंद नगरी झाला आहे. स० वि०

सवा रुपया किंमतीचे पायांत घालण्याचे दोन जोडे चोरल्या बद्दल मुंबईच्या गेल्या सेशनांत एका माणसास जन्मपर्यंत काळ्या पाण्याची शिक्षा झाली ! हा इतकाच प्रकार वाचला ह्मणजे फार वाईट वाटतें व त्या काळ्या पाण्यावर रवाना झालेल्या माणसाची फार दया वाटून शिक्षा देणाऱ्या न्यायाधीशाच्या क्रूरपणाचा मोठा रागही येतो, पण कज्याची थोडी जास्त हकीकत मनांत आणली ह्मणजे जनाची राहाटी सुरळीत चालणें जर अवश्य आहे तर त्या माणसाची दया येण्याच्या बदला न्यायाधीशास शाबासकी देणेंच भाग पडतें. ह्या कैदीचा गेल्या वीस वर्षांपैकीं १२ किंवा १३ वर्षे वेगळाल्या शिक्षा भोगण्यांत तुरुंगांतच गेलेलीं असून नुकताच तो सुटला असतां लागलीच त्यानें, जर हा चोरीचा आणि तो जोडे चोरीचा धंदा सुरू केला तर त्याच्या त्रासापासून रयतेस सोडविण्यास दुसरा उपाय तरी काय? तेव्हां त्यास झालेली ही शिक्षा योग्य झाली असेंच होतें.

१८९१ च्या नोवेंबरांत काप्रीच्या शेजारी मुंबई रेलवेस जो अपघात झाला त्यांत एका गाऱ्या पलटणीचे कांहीं सोजीर मेले व कांहीं जखमी झाले असून त्या मेलेल्या सोजरांच्या वारसांनी दावे केले त्यांस ३७९ पौंड व जखमी झालेल्या आठ सोजरांस ८६५ पौंड इतकी रकम त्या रेलवेनें दिली असें बाहेर आलें आहे. नोटिवांस!

वऱ्हाड प्रांतांकरितां लांड रिविनियु कोड नावाचा एक नवा कायदा करण्याचा विचार चालू असून या संबंधानें माहिती करून देण्याकरतां त्या प्रांतांतला एक बडा कामदार सिमला येथें जात आहे.

सोन्या रुप्यानें भरलेली एक मोठी पेटी रावळपिंडीच्या रेलवे अधिकाऱ्यांनीं नुकतीच तेथील पोलिसाच्या स्वाधीन केली यांत मोत्यें वगैरे जवाहीर भरलेलें आहे असें सांगून एका नेटिव उतारूनें ती पेटी रवाना करण्याकरिता रेलवेच्या स्वाधीन केली, पण ती नौशरा स्टेशनावर जेव्हां आली तेव्हां त्या पेटीच्या वजनावरील तेथील रेलवे अधिकाऱ्यांस संशय आला, व त्यांणी त्या उतारूस ती उघडून दाखविण्याचा आग्रह केला व ती उघडून पाहातां त्यांत जवाहीर नसून हे सोन्यारुप्याचे दागिने असून ते चोरीचे आहेत असें बाहेर आलें.

कलकत्ता हायकोर्टाचे ठराव प्रसिद्ध करण्या बाबतींत सरकारानें नवे नियम केले असून ते लवकरच प्रसिद्ध होणार आहेत; आणि त्याच प्रमाणें मुंबई व मद्रास येथील हायकोर्टाचे ठराव प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत नियम करण्याकरतां त्या त्या सरकारांचीं मतें विचारलीं आहेत व तीं आल्यावर त्या संबंधाचे नियम ठरावयाचे आहेत.

उतकामंद येथें हिंदुच्या दोन देवळांत नुकतीच सुमारें आठ लाख रुपयांची चोरी झाली. ही चोरी काबुली लोकांनीं केली अशी पोलिसाची समजूत असून त्याप्रमाणें उटी येथें एका काबुल्यास पकडलें व त्याच्याजवळ २९ हजार रुपयांचे जवाहीर सांपडलें असून त्याच्या साथ्यांस पकडण्याचे उपाय चालू आहेत.

येत्या नोवेंबर महिन्यांत गव्हरनरजनरल हे लाहोर येथें एक बडा दरबार करणार असून त्याकरतां तेथें फार मोठी फौजही जमावयाचा आहे. अमीर जो गव्हरनरजनरलांच्या भेटीस यावयाचा आहे तो भेटीचा समारंभ त्याच वेळीं होणार असून मुंबईचे लार्ड हारिस हेही तेथें जाणार आहेत. ठा० अ०

माणसें गवत खाऊं लागलीं—सिंसिली बेटांतील कांहीं भागांत दंगे आणि उपासमार वाढत्या प्रमाणावर आहे, आणि असें ह्मणतात कीं, त्या प्रदेशांतील बायका आणि मुलें पोटाची आग शांत करण्यासाठीं ओंबे आणि वाळलें गवत खाऊं लागलीं आहेत. हरहर मनुष्य प्राण्याची कोण ही दैना ! ! !

गेल्या सालीं भुईमुग, जवस, एरंड्या वगैरे तेलाचीं द्रव्यें १२११००० टन हिंदुस्थानांतून परदेशीं गेलीं त्यांची किंमत १६ कोट रुपये होतीं. शू. सू.

सन १८४२—४३ सालीं सरकारानें शें कडा ४ रु. व्याजाच्या प्रामिसरी नोटी काढल्या होत्या. आतां इतकें व्याज देण्याची सरकारची इच्छा नाहीं ह्मणून ज्या कोणापाशीं त्या असतील त्यांनीं ता. २८ जुलईचे आंत दर शेंकडा ३॥ रु० दरानें बदलून घ्याव्या अथवा त्यांचे रु० घ्यावे असा ठराव प्रसिद्ध झाला आहे. ह्या नोटा ज्यापाशीं असतील त्यांनीं नेमल्या तारखेपूर्वी व्यवस्था करण्याची तजवीज ठेवावी.

एक मुशाफर 'रामदास' पत्रास असें कळवितो कीं, जुन्नर तालुक्यांत एक शाळा मास्तर आहे. त्यानें आपलें मुलीचें एकाशीं लग्न लावून देऊन त्याला न कळत कांहीं दिवसांनीं दुसऱ्या गांवीं दुसऱ्या एका इसमाशीं त्याच मुलीचें पुनः लग्न लावून दिलें व दोहोंकडेही फेरपाळीनें मुलीस पाठविण्याचा क्रम ठेविला. पुढें मुलीचें फळशोभन झाल्यानंतर दोहोंकडचा बोभाट वेळचेवेळीं सांभाळतां येईना, व थोडेच दिवसांत त्यांपैकीं एक नवरा मरण पावल्या वरून त्याच्या भावानें त्या मुलीच्या विनवणीकडे व आढेवेढ्याकडे लक्ष न देतां तात्काळ तिचें वपन करविलें, तेव्हां हें दोन लग्नाचें बेंड बाहेर पडलें ! !

रा० रा० मदनराव माधवराव मेकॅनिक आणि आरटिस्ट सेकंड कारपेन्टर स्ट्रीट मुंबई

सदरील गृहस्थानीं आह्मांस आपल्या घरीं बोलाविलें होतें. आह्मी गेल्यावर त्यांनीं आज २२ वर्षांत ज्या ज्या कौशल्यवस्तु तयार केल्या आहेत, त्यांचें यथास्थित प्रदर्शन आह्मी पाहिलें.

पाळणा— हा पाळणा लहान मुलींच्या खेळापैकीं असून याला एक वेळ चावी दिली असतां हा सहा तासपर्यंत झुलत राहतो.

कलावंतणीचा नाच— याला चावी दिली असतां दोन बाहुल्या चक्राकार गिरक्या मारतात आणि त्याचे साजिंदे (पखवाजी व सारंगीवाला) अवसानावर मानेची ऐट दाखवितात.

पंखा— यांच्या स्वतःच्या रोज निजण्याच्या पलंगावर एक पंखा लटकत असून चावी दिली असतां कांहीं वेळ वारा घालतो.

हत्ती, मोर आणि अस्वल— हे कृत्रिम तिन्ही प्राणी चावी दिल्यावर आपल्या सजीवतेच्या बाहाणा करून बराच वेळ जमिनीवर चालतात. त्यांत मोर आपला पिसारा पसरून उभा करणें, मान तुकावणें, आणि पोटाखालील पंखे लवकर लवकर हलविणें फार उत्तम तऱ्हेनें करितो.

कारंजें— या कारंजाला कारंजाखालीं मुगदलाच्या आकृतीचें एक जोडभांडें आहे. व त्या मुगदल खालीं व खालचा वर केला ह्मणजे कारंजे आपोआप चालू होतें. या गृहस्थानीं जरीचे व रेशमी कांठ सहज रीतीनें विणतां येतील, अशा प्रकारची यांत्रिक योजना केली आहे. व कांठही तयार करून पाहिले आहेत. त्याच प्रमाणें हल्लीं दोरखंड विणण्याचें एक यंत्र तयार केलें आहे. न्या. सु.

निजाम इलाख्यांतील जुनें नवें, सावकर, फेर शिक्का, फुटकें रुपये सराफ व्यापारी वगैरेनीं बट्टा न घतां घ्यावे, व चवल्या, पावल्या अधेल्यांसही बट्टा घेऊं नये, असा सरकारातून डांगोरा पिटला आहे. क० त०

NEARLY READY

CRIMINAL COURT MANUAL.

for the

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे (ह्मणजे चक्रांचें खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या बरआमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुलींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र कपाटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक

किंमत १० आणे

गुरुचरित्र

पांच किंवा जास्त प्रती एकदम घेणारास

दर प्रतीस

आठ आणे

हा ग्रंथ आज पर्यंत ८।१४ आण्यास मिळत होता. त्याच्या आतां फारच थोड्या प्रती शिल्लक आहेत ग्राहकांनीं त्वरा करावी.

आर्य भूषण छापखाना, पुणें.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

जाहिरात.

सन १८८६ च्या वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ३४ (१) प्रमाणें आकोला म्युनिसिपल कमिटीनें नवीन केलेले नियम सर्वांचे माहिती करितां प्रसिद्ध करण्यांत आले आहेत:—

* तारीख १ आगष्ट सन १८८९ चे रेसिडेन्सी आर्डर भाग २ यांतील १३३–३४ पानांवर छापून प्रसिद्ध केलेले नियम या नियमांनीं रद्द झाले आहेत.

B. M. Sathe
सेक्रेटरी
म्यु.क.आकोला

नियम.

(अ) म्युनिसीपल कमिटीची सभा भरविण्याची वेळ आणि स्थळ

१ नेहेमीचे कामाचा निकाल करण्याकरितां प्रत्येक महिन्याचे १५ वे तारखेस टाऊन हालांत कमिटीची सभा होत जाईल.

१५ तारखेस सुटी असेलतर पुढील दिवशी सुटी किंवा रविवार नसेल तर त्या दिवशी सभा होईल.

२ नेहमीचे कामाचा निकाल करण्या करितां दुसऱ्या सभा आणि विशेष कामा करितां (special meetings) सभा टाऊनहाल मध्यें चेअरमन किंवा ते नसतील तर व्हाईसचेअरमन नोटीसीनें कळवितील त्या दिवशी होत जातील.

(ब.) आरडिनरी (नेहमीच्या साधारण) आणि स्पेशल (विशेष) सभा भरविण्याची व त्या बद्दल सूचना करण्याची रीत.

३ अकोल्यास असणाऱ्या मेंबरांना सभेच्या दिवसा पासून निदान ५ दिवसपूर्वी सेक्रेटरी पैकीं एकानें आरडिनरी सभेची वेळ आणि त्या सभेत होणारे कामाची नोटीस द्यावी.

विशेष सभा भरण्याचे नोटिसींत कोणत्या कामा करितां सभा भरविली आहे हें असावें.

अशा नोटीसीमध्यें सेक्रेटरींनीं एखादे मेंबर कडून लेखी आलेल्या सूचना घालाव्या.

तथापि चेअरमन यांस ज्या विषयाची पूर्वी नोटीस दिली नव्हती असा एखादा विषय विचारा करितां कमिटीपुढें आणितां येईल.

(क) आरडिनरी सभेचें काम चालविण्या करितां निदान किती मेंबर पाहिजेत.

४ आरडिनरी सभेचें काम चालविण्यास निदान ६ मेंबर हजर असले पाहिजेत.

(ड) सभा मध्यें काम चालविणें व सभांचें काम होण्या करितां पुन्हा दुसरा दिवस नेमणें.

५ सभेच्या अध्यक्षानें सभेपुढें आणिलेल्या कामाची व्यवस्था करावी आणि शांतता राखावी.

६ कोणत्याही सूचनेस किंवा प्रति सूचनेस अनुमोदन मिळाल्या शिवाय ती सभेपुढें आणू नये.

७ प्रत्येक सूचनेवर किंवा प्रति सूचनेवर सभेमध्यें हजर असलेल्या मेंबरांस एकवार बोलण्याचा आणि सूचना करणारांस उत्तर देण्याचा अधिकार आहे.

८ आणिलेल्या प्रतिसूचनेवर पहिल्यानें मतें घ्यावीं. पसार झाली तर मूळ सूचना रद्द होईल. पसार न झाली तर मूळ सूचनेवर मतें घ्यावी. एका पेक्षां अधिक प्रतिसूचना असल्यास त्या सूचनांच्या उलट क्रमानें त्यांवर मतें घ्यावीं.

९ प्रोसिडिंगा वरून एखादा प्रश्न सर्वानुमतें किंवा बहुमतानें पसार झाला हें दिसावें. प्रतिकूळ असणाऱ्या मेंबरांनीं तशी विनंती केल्यास त्यांचें नांव प्रोसिडिंगामध्यें दाखवावें.

१० कमिटींत बहुमतानें उलट ठरलें नसल्यास कमिटीचे सभांस लोकांना येण्याचा अधिकार आहे.

११ एखाद्या प्रश्नाचा निकाल जाहाल्यावर निकालाचे दिवसा पासून त्याच प्रश्नाचा तीन महिन्यांचे आंत कमिटीपुढें पुन्हा विचार केला जाणार नाहीं. तथापि स्पेशल कमिटी मध्यें सदर्हू विषय पुनः विचारा करितां घेण्यास कारणें दाखविलीं जाऊन मताधिक्यानें घ्यावा असें ठरेल तर घ्यावा.

(इ.) कमिटीचे सभासदामध्यें कामाची वांटणी.

१२ म्युनिसीपल कायदा कलम ३४ पैकीं बाब 'इ' करितां म्युनिसिपल हद्दीचे आठ भाग केले जातील. व त्यां पैकीं प्रत्येक भाग एकेका डिव्हीजन मेंबरचे ताब्यांत दिला जाईल. सदर्हू डिव्हीजनचे स्वच्छतेकडे आणि त्यांतील सार्वजनिक हिताकडे लक्ष ठेवणें, त्यांतील जरूर गोष्टींचें टिपण करून त्या गोष्टी कमिटीचे नजरेस आणणें, त्यांतील राहिवाश्यांच्या तक्रारी ऐकून चौकशी केल्यावर कमिटीकडेस शिफारस करणें, त्यांचें ताब्यांत असलेले भागा संबंधानें म्युनिसीपल कायद्याचे हेतु अमलांत आणण्या करितां कमिटीस सल्ला देऊन मदत करणें: आणि कानसरवंसी व पब्लिकवर्क्स इन्स्पेक्टर यांस त्याचे कामांसंबंधी सल्ला देणें व त्यांस मदत करणें हीं डिव्हीजन मेंबरांनीं करावयाचीं कामें आहेत.

१३ डिव्हीजन मेंबर खेरीज करून खालीं दिलेले कामगार आणि सब कमिट्या असतील:—

१ चेअरमन, २ कानसरवंसी सुपरिंटेंडेंट. ३ पब्लीक वर्क्स सुपरिंटेंडेंट; ४ सेक्रेटरी (२); ५ व्हाईसचेअरमन (२); ६ म्युनिसीपल फंड कमिटी २ मेंबरची; ७ स्कूलकमिटी ३ मेंबरची ८ डिस्पेन्सरी कमिटी ३ मेंबरची; ९ आडिट कमिटी. तीन मेंबरची; १० गार्डन सुपरिंटेंडेंट; आणि ११ म्यानेजिंग कमिटी;

या शिवाय कमिटीनें एखादे विशेष कामा करितां सब कमिट्या नेमाव्या.

१४ चेअरमन यांनीं सर्व म्युनिसिपल कामगाराचे आणि सब कमिट्यांचे कामावर देखरेख ठेवावी. आणि जरूरीचे वेळीं ५० रुपये पर्यंत खर्चाचें काम करण्यास हुकूम द्यावा परंतु अशा प्रत्येक वेळीं त्यांनीं कमिटीस सदर्हू बद्दल रिपोर्ट करावा.

१५ कानसरवंसी सुपरिंटेंडेंट यांजकडे खालील कामांची देखरेख असावी.

(१) म्युनिसिपल हद्दींतील स्वच्छता.
(२) कमिटीची जागा लोकांस घेऊं न देणें.
(३) मैल्याची व्यवस्था लावणें.
(४) नदी, सार्वजनिक विहिरी, झरे, तळीं, आणि ज्यांतून लोक उपयोगा करितां पाणी आणितात किंवा आणण्याचा संभव आहे अशीं इतर सर्व ठिकाणांची देखरेख ठेवणें.
(५) धर्मशाळा, स्मशानभूमी आणि आणि कमेळे यांची देखरेख ठेवणे.
(६) आठवडा बाजार, भाजी बाजार व कसई बाजार यांची देखरेख करणें.
(७) जन्म मृत्यूचें रजिष्टर ठेवणें.
(८) म्युनिसिपालिटीचे ताब्यांतील कोंडवाड्यांची देखरेख करणें.
(९) रस्त्यावरील व इतर ठिकाणचे कंदील लावणें.
(१०) शहरांतील देवी काढण्याचे काम चाललें असतां देवी डाक्टर यांस मदत करणें.
(११) आग विझविण्याचे कामीं मदत करणें.
(१२) भंगीपट्टी वसूल करणें.
(१३) वऱ्हाड म्युनिसिपल कायदा १८८६ तील कलम ८३, ८६ ते ९२, १०१ ते ११५ आणि १२१ ते १३७ अन्वयें रिपोर्ट करणें आणि तत्संबंधीं कमिटीचे हुकूम आणि मंजुराती अमलांत आणणें.
(१४) कलम ९४, ९६ ते ९८ चे कामा करितां खाजगी घरांत शिरणें.

१६ पब्लिक वर्क्स सुपरिंटेंडेंट यांजकडे खालील कामाची देखरेख असावी.

(१) सार्वजनिक रस्ते, पूल, गटर, पाखाने आणि म्युनिसिपालिटीचीं इतर मकानें बांधणें, त्यांची सुधारणा व दुरुस्ती करणें.
(२) पाण्याच्या विहिरी, तलाव, नळ वगैरे दुरुस्तींत ठेवणें.
(३) म्युनिसिपाल कमिटीच्या गाड्या, कचऱ्याच्या पेट्या, हत्यारें आणि इतर सामान दुरुस्ती.
(४) रस्त्यावर पाणी घालणें.
(५) आग विझविण्याचे कामांत मदत करणें.
(६) म्युनिसिपल कायदा कलम ७९ ८०, ८३, ८४, ८५, ८६, १००, १०२, १०३, १०६, १०७, १०९, १११, ११२, ११४, ११५, १२४, १२५ १२८, १३४, १३५, आणि १३७, या अन्वयें कमिटीचे हुकूम आणि मंजुराती अंमलांत आणणें.
(७) कलम ९३ व ९५ यांतील कामा करितां खाजगी मकानांत शिरणें.
(८) म्युनिसीपल कमिटीचे रस्त्यावरील झाडें लावणें, वाढविणे व त्यांचें रक्षण करणें.

१७. म्युनिसीपल कमिटीचे आफीस सेक्रेटरीचे ताब्यांत राहील. व त्यांनीं पत्रव्यवहार व कमिटीचे हिशेब ठेवावे. आणि म्यानेजिंग अथवा जनरल कमिटीचे ठरावा प्रमाणें आणि हुकूमा प्रमाणें अमलबजावी झाली किंवा नाहीं हें त्यांनीं पाहावें.

१८ वर सांगितलेले कमिटीचे कामगार आणि सबकमिट्या यांचे कामावर देखरेख करणारा मुख्य कामगार व्हाईसचेअरमन हा आहे. जरूरीचे वेळीं त्यांनीं अथवा त्यांचे पैकीं कोणा एकानें २५ रुपयांचे आंतील खर्चाचें काम करण्यास त्यांनीं हुकूम द्यावा परंतु त्यांनीं अशा खर्चा बद्दल कमिटीस रिपोर्ट केला पाहिजे. म्युनिसीपल कायदा कलम ८५ प्रमाणें घेर पुन्हः बांधण्यास किंवा त्याची दुरुस्ती करण्यास परवानगी देणें किंवा न देणें या बद्दल व्हाईस चेअरमन (डिव्हीजन मेंबर सह) जबाबदार आहेत.

१९ म्युनिसीपल फंड कमिटी कडे खालील कामें दिलीं जातील.

१ टाऊन फंड कर वसूल करणें
२ म्युनिसिपालिटीचे हद्दींतील जमिनींचे भाडें. वसूल करणें व
३ भंगीपटी खेरीज करून इतर सर्व कर म्युनिसिपल कमिटीनें बसविले असतील किंवा पुढें बसविले जातील ते वसूल करणें.

२० म्युनिसीपल कमिटीचे ताब्यांतील सर्व शाळा आणि grant in aided शाळांची स्कुल कमिटीनें देखरेख ठेवावी व वर्षांतून निदान दोन वेळ तरी शिक्षणाचें परीक्षण करावें आणि शेरे बुकांत शेरा लिहावा.

२१ म्युनिसीपल हद्दींतील सर्व दवाखानें डिस्पेन्सरी कमिटीनें महिन्यांतून एक वेळ तरी पाहावे आणि शेरे बुकांत शेरा लिहून ठेवावा.

२२ म्युनिसिपल कायद्यान्वयें आ० रेसिडेंट साहेब यांनीं केलेले नियमा पैकीं नियम ४४ प्रमाणें ठेवलेले हिशेब आडिट कमिटीनें तपासावें.

२३ म्युनिसीपालीटीचे ताब्यांतील बगीचे गार्डन सुपरिंटेंडेंट यांचे ताब्यांत व देखरेखीखालीं रहावें.

२४. (a म्यानेजिंग कमिटींत खालील मेंबर असतील.

२ व्हाईस चेअरमन
२ सेक्रेटरी.
१ कानसरवंसी सुप
१ पब्लीक वर्क्स सु
१ सदर्हू गार्डन—
३ म्युनिसिपल फंड
कमिटी, आणि डि
टी यांतील एकेक मे
म्यानेजिंग कमिटी
कमिटीचे अमलबजावीचे

(b) प्रत्येक आठवड्यांत
क वेळ तरी म्याने
भरली पाहीजे.

(c) म्यानेजिंग कमि
चालविण्यास निद
हजर असले पाहिजे

(d) म्यानेजिंग कमिटी
क्षांचें काम व्हाईसचे
एकानें करावें.

[e] म्यानेजिंग कमिटी
पल फंडातून करत
असल्यास १०० र
खर्चाचें काम मंजूर

(f] जनरल कमिटीचे
वांचून म्यानेजिंग
स्वतः किंवा मागी
म्यानेजिंग कमिटीनें
बदलूं नये.

[g] म्युनिसिपल कायद
रेसिडेंट साहेब य
नियमां पैकीं नियम
म्यानेजिंग कमिटीनें
तक्के आणि रिपोर्ट त

[h] म्यानेजिंग कमि
मक्तयाचे हरास करा
जनरल कमिटीचे
अवलंबून राहतील.

(i) म्युनिसिपल कमि
म्यानेजिंग कमिटीचे
राहतील.

( ) म्यानेजिंग कमिटी
सिपल नोकरास तीन
तची रजा द्यावी.

रजा देणें ती बिन
करितां जे सरकारी
त त्या नियमांना
सावी. कमिटीचे न
कर ज्या मेंबरचे
काम करीत असेल
नें सेक्रेटरींनीं ३ दि
किरकोळ रजा द्या

(k) म्युनिसिपल नोकर
क्लार्क, म्युनिसिपल
नसरवंसी इन्स्पेक्टर
न इतर सर्वांची
जिंग कमिटीनें करा
स दंड, सस्पेंड
डिसमिस करावें.
तथापि वरील तीन
नेजिंग कमिटीनें दि

नीं सविंद करावें व त्यांनीं कद्दम सदर्हू बद्दल जनरल कमिटीकडेस रिपोर्ट करावा.

हाड म्युनिसिपाल कायद्यांतील ळीं दिलेल्या कलमान्वयें कटीस असलेले अधिकार म्यानेजिंग कमिटीनें चालवावें लमें ८०, ८१, ८३ ते ९५, , ९८, १०० ते ११३, म्युनिसिपल कायद्या प्रमाणें गुन्हा करणारावर मोकद्दमा करण्याचें काम म्यानेजिंग कमिटीनें मंजूर करावें.

पि जर मोकद्दमा म्यानेजिंग कमिटीची सभा होई पर्यंत तहकूब करितां येत नसेल तर अशा अडचणीचे वेळीं कानसरवंसी सुपरिंटेंडेंट यांनीं चेअरमन अथवा व्हाईस चेअरमन यांचे मंजुरातीनें मुकद्दमा करावा.

म्यानेजिंग कमिटीनें मंजूर केले मुकद्दमे कानसरवंसी इन्स्पेक्टर यांनीं चालवावे.

कायद्यांतील कलम ३९ पैकीं पोट कलम १ प्रमाणें कमिटी तर्फे करारनामे करण्याचा अधिकार चेअरमन यांस अथवा व्हाईस चेअरमन आणि सेक्रेटरी यांस दिला आहे.

हाड म्युनिसिपल कायद्यान्वये जो पैसा लोक देतील तो पावत्याबद्दल कमिटीचे तर्फे कोणी पावत्या द्याव्या.

कमिटी तर्फे सेक्रेटरीनें किंवा ज्या त्या खात्याचे व्यवस्था करणार मेंबरानें पावत्या द्याव्या.

किरकोळ

म्युनिसिपालिटीचा शिक्का सेक्रेटरीचे ताब्यांत राहावा व प्रत्येक महत्वाचे कागदावर आणि कररनाम्यावर तो दिला जावा.

NOTICE

following revised rules by the Municipal Com- t Akola under section 34 he Berar Municipal Law, published for general in- n:—

ese rules supersede the rules in pages 133 and 134 of of the *Residency Orders* of August 1889.

a) The time and place of of the Municipal Committee.

The Committee shall hold a on the 15th of each month Town Hall for the disposal ary business.

vided that if the 15th falls li day the meeting shall be any day next following not or a holiday.

Other meetings for the disposal of ordinary business and special meetings may be held at the Town Hall on such date and at such time as the Chairman, or in his absence one of the Vice-Chairmen, may notify.

(b) The manner of convening ordinary and special meetings respectively and of giving notice thereof.

3. Notice of the business to be considered at the ordinary meetings and the time of holding these meetings shall be issued by one of the Secretaries at least five days previous to the day of the meeting to all members resident at Akola.

The notice convening a special meeting shall state the business for which it is called.

The Secretary shall insert in such notices any proposition he may receive in writing from any member.

Provided that at any meeting the Chairman may bring up for discussion any question of which no notice was given.

(c) The quorum necessary for the transaction of business at ordinary meetings.

4. At an ordinary meeting the presence of six members is necessary to form a quorum.

[d] The conduct of proceedings at meetings and the adjourment at meetings.

5. The Chairman presiding at a meeting shall regulate the course of business brought forward at the meeting and shall preserve order.

6. No proposition or its amendment shall be put before the meeting unless it is seconded.

7. Every member present at a meeting shall have the right to speak once on each proposal or its amendment, and the proposers shall have a right of reply.

8. When an amendment has been brought it shall be first put to the vote; if carried the original proposition is lost. If the amendment is not carried, the original proposition shall be put to the vote. When there are more amendments than one they shall be put in the inverse order in which they are proposed.

9. The record of proceedings shall show how each question has been decided, whether unanimously or by a majority. Any dissentient shall, if he requests it, have his name recorded.

10. Every meeting of the Committee shall be open to the public unless decided otherwise by a majority of the Committee.

11. No subject or question which has been decided at a meeting of the Committee shall be brought up for reconsideration until a period of three months has elapsed since its decision.

Provided that a majority at a special meeting may give reason for its re-introduction earlier.

(e) The division of duties among the members of the Committee.

12. The municipality will be divided into eight divisions for purposes of sub section *(e)*, section 34 of the Law. Each division will be placed in charge of a divisional member, whose duty it shall be to look to the sanitation and general welfare of his division, note and represent its wants to the Committee, hear complaints from inhabitants therein, make inquiries and submit recommendations to the Committee and to advise and assist the Committee generally in carrying out the objects of the Municipal Law so far as the division in his charge is concerned, and to help and guide the Conservancy and Public Works Municipal Overseer.

13. In addition to the divisional members there shall be the following officers and sub—committees:—

1. The Chairman.
2. The Conservancy Superintendent
3. The Public Works do.
4. The Secretairs (2).
5. The Vice-chairmen (2).
6. The Municipal Fund Committee (consisting of two members).
7. The School Committee (consisting of three members)
8. The Dispensary Committee [consisting of three members].
9. The Audit Committeee [consisting of three members.
10. The Garden Superintendent.
11. The Managing Committee.

The Committee may in addition appoint sub-committees for any special purpose.

14. The Chairman shall supervise the working of all the Municipal officers and sub committees and in emergencies may order the execution of work involving an expenditure of not more than Rs. 50, but in each such case his proceedings shall be reported to the Committee.

15. The Conservancy Suderintendent shall ordinarily be entrusted with the following duties:—

1 The conservancy and sanitation of the municipality.
2 Prevention of encroachments.
3 Disposal of night-soil.
4 Supervision of river, public wells springs, tanks, and other sources from which water is or may be available for public use.
5 Supervision of serais, of burial and burning grounds, and of slaughter houses.
6 Supervision of weekly market and meat and vegetable markets.
7 Registration of vital statistics.
8 Supervision of cattle pounds under municipal control.
9 Lighting of roads and other places.
10 Rendering assistance to vaccinator in charge of the vaccination of the town.
11 Rendering assistance in putting out fires.
12 Collection of latrine cess.
13 Reporting on and enforcing the Committee's orders and sanctions connected with matters mentioned in sections 83, 86 to 92, 101 to 115, and 121 to 137 of the Berar Municipal Law, 1886.
14 Entering on private buildings for purposes mentioned in sections 94, 96 to 98 (both inclusive).

16 The Public Works Superintendent shall ordinarily be entrusted with the following duties:—

1 Construction, maintenance, improvement and repairs of public streets, bridges, drains, latrines and municipal buildings.
2 Upkeep of water-works.
3 Repairs to carts, dust-bins, tools and plant, and all other municipal property.
4 Watering of roads.
5 Rendering assistance in putting out fires.
6 Enforcing Committee's orders and sanctions under sections 79, 80, 82, 81, 85, 85, 100-102 and 103 105, 107, 109, 111, 112, 114 115, 124, 125, 128, 134, 135 and 137
7 Entering buildings for purposes under sections 93, and 95.
8 The preserving and planting of trees on Municipal roads.

17. The secretaries shall be in charge of the municipal office and shall conduct the correspondence and keep accounts of the Committee. It should further be their duty to ensure that all orders and resolutions of the Managing or General Committees are carried out.

18. The Vice-Chairman shall be the chief executive officer to the Committee supervising the working of the afore—mentioned officers and sub-committees. In emergencies they or any one of them may order the execution of work involving expenditure of not more than Rs. 25, but in every such case their or his proceedings shall be reported to the Committee. They shall also be responsible (in con—sultation with the divisional member) for the granting or withholding of permission to repair or to rebuild buildings within municipal limits under section 85 of the Law,

19. The Municipal Fund Committee shall ordinarily be assiged the duty of—

(1) Collecting the Town Fund Tax;
(2) The rent on sites within municipal limits; and
(3) All other taxes and assess—ments (except the latrine cess) that are levied or may be levied from time to time by the Municipal Committee.

20. The School Committee shall supervise and inspect at least twice in each year the municipal or grant-in-aid primary schools, and record their remarks in the visitors' book.

21. The Dispensary Committee shall visit at least once a month all dispensaries within municipal limits, and record their remarks in the visitors' book.

22. The Audit Committee shall audit the municipal accounts in terms of section 44 of the rules framed by the Resident under the Berar Municipal Law.

23. The Garden Superintendent shall ordinarily be entrusted with the superintendence of the gardens under municipal management.

24. *a*—The Managing Committee shall ordinarily consist of—

Two Vice-Chairmen,
Two Secretaries,
One Conservancy Superin—tendent,
One Public Works Superintendent,
One Public Gardens Superintendent,
Three members representing the Municipal Fund, the School, and the Dispensary Committees;

and shall conduct the executive duties of the Municipal Committee.

b—The Managing Committee shall meet at least once in every week.

c—The quorum necessary for the transaction of business at a Managing Committee shall be three.

d—One of the two Vice—Chairmen shall ordinarily act as Chairman of the Managing Committee.

e—A Managing Committee may order the execution of any work which does not involve an expenditure of more than Rs. 100, provided that the state of the municipal funds admit of it.

f—A' Managing Committee may not alter a decision once made by itself or that of any preceding Managing Committee without the permission of the General Committee.

g—It shall be the duty of a Managing Committee to prepare all returns, statements and reports as required by rule 46 of the rules made by the Resident under Berar Muni—cipal Law, 1886.

h—The Managing Committee shall conduct all auction sales or contracts subject to the confirmation of the General Committee.

i—The servants of the mu—nicipality shall be under the control of the Managing Committee.

j—The Managing Committee may grant leave of absence to servants of the Municipality up to three months

Ordinarily such grant of leave shall be in accordance with the orders of Government in the Leave Code for uncovenanted officials. Casual leave not exceeding three days may be granted to any servant by one of the Secretaries subject to the approval of the members under whose orders the servant may be serving.

k—The Managing Committee may appoint, fine, suspend or dismiss summarily any servant on the muni—cipal establishment except the Head Clerk, the Municipal and Conservancy Inspectors.

These three officials, however, may be suspended by the Managing Committee or by the Chairman of the municipality, who shall report their proceedings to the General Committee without dealy.

l The powers conferred by the sections of the Berar Municipal Law, 1886, hereinafter mentioned and rules framed there under may be exercised by the Managing Committee:—

Sections 80, 81, 83 to 95 (both inclusive), 97, 98, 100 to 113 (both inclusive),

m The Managing Committee shall have power to authorize the prosecution of any person guilty of an offence under the Municipal Law.

Provided that the Conservancy Superintendent, in emergencies, may institute prosecutions under the Law with sanction of the Chairman or a Vice—Chairman if the prosecution cannot conveniently be deferred till the meeting of the Managing Committee.

Ordinarily prosecutions made by order of the Managing Committee shall be conducted by the Conservancy Inspector.

n—The power of entering on behalf of the Municipal Committee into any contract falling under sub-section I of Section 39 of the Law is hereby delegated to the Chairman or a Vice—Chairman and Secretary.

(f) The persons by whom receipts may be granted on behalf of the Committee for money paid under the Berar Municipal Law

25. Receipt may be given on behalf of the Committee by a Secretary or by Managing Member for his own department.

(g) Miscellaneous.

26. The seal of the municipality shall be kept by the Secretary and shall be affixed to all contracts and other important papers.

B. M. SATHE,
Secretary, Municipal Committee, Akola.

साप्ताहिक ... ॥ १०
किरकोळ अंकास .....८ पै

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८।८ पै
दुसरें प्रेसेस .....८ पै

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

VOL XXVIII AKOLA MONDAY 23 JULY 1894 NO 29

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख २३ माहे जुलै सन १८९४ इ० अंक २९

चार तास होऊन गेले आतां आशा सोडा-

अरे देवा! मी तीन चार तास व्यर्थ घालविले ते जर परत आणतां आले असते तर किती मजा झाली असती. पहा! एका क्षणांत मनुष्यावर किती संकटें येऊन पडतात!

मिस्तर जेम्स करटीस आणि मिस्तर सी. एस बेनेट हे दोघेजण पुष्कळ वर्षे अगदीं जिवलग मित्र होते. ते स्थान फ्रान्सिसको शहरांत राहत असत. गेल्या उन्हाळ्यांत पहिल्याच वेळेस एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून बरेच भांडले. सुविचार मनांत आले व पुन्हां त्यांची गट्टी जमली परंतु एकदां घडी बिघडली ती बिघडली. विचार देवीनें अपल्या स्मरण वहीत टिपून ठेविलें होतें तें एकमेकांपासून अलग राहण्याबद्दल खबरदारी घेत होते. ह्या द्वयांची गांठ एका रस्त्यांत पडली. पुन्हां भांडण सुरू झालें. करटीसच्या मुखांतून फारच कठोर व काळजाला शोंबण्या सारखे शब्द निघाले आणि त्यानें रागाच्या सपाट्यांत पिस्तूल काढलीं व बेनेटवर झाडून त्यास लागलीच राम म्हणावयास लावलें. पुढेंही तो स्वनिंदेनें व दुःखानें नाडला गेल्यामुळें बरच्या सारख्याच लाखोल्या वहत असे.

हें पहा असें वागणें किती निरर्थक, कुवकामाचें व दांभिक आहे बरें!

परंतु करटीस म्हणत असे कीं एका क्षणांत मनुष्यावर कोणती संकटें येतील याचा नेम नाहीं. असें आपणास क्षणभर खरें वाटतें परंतु या पेक्षां दुसरा अगदीं खोल विचार आहे तो कोणाच्या ध्यानांत येतो या संकटाचें खरें स्वरूप समजलें नाहीं तर कांहीं चिंता नाहीं. तर याच मुद्यावर दुसऱ्या एका गोष्टीचा विचार करूं.

एक सुज्ञ बाई म्हणते कीं सन १८६० साली अक्टोबर महिन्यांत मला असा ज्वर जडला होता कीं त्यांतून मी वाचेन असें मला वाटत नव्हतें. माझ्या शरिरांत सर्व ठिकाणीं वेदना होऊं लागल्या व खोकल्यानें मला इतकें जर्जर करून टाकलें कीं माझ्या शरिराचा चेंदा मेंदा होतो कीं काय असें मला वाटलें. मी बिछान्यांत पडून राहो परंतु रात्रंदिवस झोंप म्हणाल तर देवाचें नांव. माझ्यानें उठून बसवत नसल्या मुळें मला चमच्यानें अमृतस माझ्या तोंडांत घालीत असत. माझी छाती इतकी धडधडत असे कीं ती उशीवर तुझास साफ दिसून येईल.

आणि वेदना इतक्या जालीम होत होत्या कीं जसें कोणी मला भोंसकत आहे. मी अशी पंगु होऊन अंथरुणाशीं खिळून राहिलें व मला दम बरोबर घेतां येईना. वैद्यबोवा आम्हास सतत एक महिनाभर औषधोपचार करीत होते. परंतु दिवसानुदिवस क्षीण होत चालले. कधीं कधीं रात्री माझी अशी गाळण होऊन जाई कीं सकाळपर्यंत मी जगेन किंवा नाहीं याची मला शंका वाटत असे. त्यानीं आपल्या दुसऱ्या वैद्याची सल्ला मसलत घेऊन असें ठरविलें कीं हा रोग बरा होणें कठीण आहे. मला तकवा आणण्यास थोडीशी दारू पाजीत असत. कोणत्याही औषधापासून मला काडी इतका गुण झाला नाहीं. मी आतां थपसवनीं जाणार असें मला वाटूं लागलें.

अशा वेळीं प्लिमथ जवळच्या मोटली गांवांतील मिसीस किर्टिंग माझी मैत्रीण होती ती धावून आली व मला मदर सिजेलचे क्युरोटिव सिरप्स म्हणजे माता सिजेलचा रोग हारक पाक) घेण्यास गळ घातली. मी लाम लींच एक बाटली पैदा करवून औषध घेण्यास सुरू केलें. थोड्याच दिवसांनीं मला अन्न घेतां येऊन पचविण्याची शक्ती आली आणि बाईट लक्षणें कमी होत चाललीं. यावरून असें दिसून येतें कीं ज्या उपाधीनें हिच्या शरीरांत आपला पूर्ण अम्मल बसवून इतक्या शिखरास पोचावला होता कीं तिच्या आयुष्याची दोरी तुटण्याची वेळ जवळ येऊन ठेपली. आपल्याला उपाधि समजो वा न समजो परिणाम असा व्हावयाचा. करटीसनें जो अपराध केला होता त्याचें मुख्य कारण त्याचें एकदम रागावणें व त्या भरांत धिःकार व सुड घेण्याच्या विचारास उत्तेजन देणें व मनांत असल्या दुष्ट हेतूस स्वाधीन होऊन अशा प्रकरचे खून करण्यास तयार होणें हें होय. याच प्रमाणें या बाईच्या रोगाची उपाधि झटली असतां अग्निमांद्य व अजीर्ण होय. कीं जो अखेरीस बेफाम होऊन जिवास धक्का व विनाश कारणीभूत झालें याचें सार म्हणाल तर एकच. अरिष्टाची टेहळणी प्रारंभींच करावी व पुढें वाटू देऊं नये म्हणजे तें अरिष्ट आपल्या अटोक्यांत सहज ठेवता येतें.

ह्या औषधाच्या सहा बाटल्याचा फन्ना केल्यावर माझी तब्येत पूर्ण ताळ्यावर आली आणि तीस वर्षा पूर्वी पेक्षां मला आतां हजार हिशानें बरें वाटत आहे. माझ्या दोन मुली पण अजीर्णा पासून त्रासल्या होत्या त्या या औषधानेंच बऱ्या झाल्या. मला कोणी विचारतील त्यास मी मोठ्या आनंदानें सांगेन.

(सही) मिसीस लुई ज्याकसन
निर्लडस आर्मस होटेल
ब्रिजरोड, हामरस्मिथ, लंडन
तारीख १४ माहे जानेवारी
सन १७६२

वर लिहिलेल्या ओळी ज्या पत्राचें सार आहे त्यांस मिसीस जानसन बाई असें प्रदर्शित करते कीं सन १८६०च्या अक्टोबरात जें दुखणे लागलें होतें त्याच्या वीस वर्षा पूर्वा तिचे पित्ताशय व पक्काशय बिघडलीं होतीं. तिच्या तोंडाची रुचि बिघडून गेली होती. आणि थोडें जरी खालें तथापि तिच्या पोटांत कळा मारीत. तिला थकल्यासारखें व गळून गेल्या सारखें आणि उदास झाल्यासारखे वाटे आणि पोट अगदीं खोल गेल्या सारखे वाटल्या मुळें तिला फारच वाईट वाटे तीच्या छातींत बरगड्यांत तीव्र वेदना होत. छातींत धडधड होई, घेरी येई व वारंवार रस्त्यांत पडे व तिला घेरी येई व वारंवार रस्त्यांत पडे व तिला घरी कोणी तरी उचलून आणीत. F. L.

पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

शिंदखेडचा मोहरमचा दंगा !

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि० वि० शिंदखेड ता० मेहेकर जि० बुलढाणे येथील ग्राम दैवत श्रीरामेश्वर म्हणून महादेव आहे. तेथें हिंदुलोक प्रतिवर्षीं आषाढ शुद्ध प्रतिपदे पासून सतत रुद्रची वार व नामसप्ताह व देवीजवळ सप्तशतीचे पाठ ज्याला शतचंडी म्हणतात ते असें अनुष्ठान सात दिवस चालूं असतें. आठवे दिवशीं दिंडी गांवांत निघून ग्रामस्थ लोक आपापले शक्ती प्रमाणें दिंडीस १ पासून पासून पांच रुपये पावेतो देतात मग जो पैसा जमतो त्याचें मोठें थोरलें ब्राम्हण भोजन होऊन उत्सवाची समाप्ति होते. अशी रीत आहे. परंतु हिंदूचा उत्साह आणि मुसलमान लोकांचे मोहरम हे एकाच महिन्यांत आले म्हणून सरकारात अर्ज करून हिंदुलोकांनीं सरकारांतून बंदोबस्त करून घेतला.

आज रोजीं म्हणजे तारीख ११।७।९४ रोजीं मामुल वहीवाटी प्रमाणें हिंदूनीं दिंडी काढण्याचा हुकूम आणला. व वरिष्ठ अधिकारी मे० फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट मेहेकर यांनीं हिंदुस हुकूम दिला कीं, तुम्हीं दिंडी काढावी; तुमचे बंदोबस्ता करितां पोलीस इनस्पेक्टर साहेब, चिफ कानस्टेबल, हे आम्ही पाठविले आहेत म्हणून काल तारीख १० रोजीं सर्व हिंदु मेहेकराहून आले. आतां रिती प्रमाणें पोलीस इनस्पेक्टर अगोदर न येतां दिंडीचे वेळीं म्हणजे ता० ११।७।९४ रोजीं आठ वाजतां आले. हे येण्याचे आधीं व सर्व मुसलमान लोकांनीं कट करून २०० इसम लहान मोठ्यासह सहा वाजतां सकाळीं ज्या ठिकाणीं सवारी बसते त्या ठिकाणीं मोठ मोठ्या काठ्या व बडगे घेऊन दिंडी येईल तिच्यावर हल्ला करावा असे बेतानें बसले इतक्यांत पोलीस इन्स्पेक्टर, चिफ, कानस्टेबल लोक ९।६ यांनीं हुकूम केला कीं दिंडी आणा. त्या प्रमाणें हिंदूनीं सर्व वाद्यें बंद करून तेस्तब्ध चालले. हिंदु बिचारे गरीब! त्यांनीं ज्या प्रमाणें सांगितलें त्याच प्रमाणें ऐकिलें. आणि जेथें मुसलमानाचा जमाव होता तेथें येतांच त्या ठिकाणचे एका मुसलमानास इनस्पेक्टर साहेबांनीं खाली बोलावून तुम्ही लाठे बडगे कशा करितां आणिले असें बोलता क्षणींच त्यांतील ८।१० मुसलमान खालीं येतात बाकीचे २०० इसम. हिंदूचे दिंडींत मिसळून दीन दीन म्हणून हिंदु लोकास मारीत सुटले. कोणाचे डोकें, मान, पाठ, कंबर, हातपाय, वगैरे न पाहतां रक्त भंबाळ केलें. कोणास तर अतीशय मारलें या प्रमाणें मुसलमान २ घंटे पावेतो मोठा दंगा करून आपापले घरी जाते वेळीं कोण कोणाच्या घराची कावडें मोडलीं; कोणी आपले घरा वरून पहात तर त्यास ही दगड मारीत. या प्रमाणें दंगा करून ते आपल्या घरीं गेले. खुद्द इन्स्पेक्टर चिफ व ४ कान्स्टेबल व हेड कानस्टेबल यास ही मारलें. ही वेळ वेळ्यासही नसावी. जिकडे हिंदु पळत तिकडे मुसलमान जाऊन त्यांस मारीत. घरांत सुद्धा जाऊन मारावें असा प्रकार झाला. वाहवा रे! सरकारचा बंदोबस्त. काय अनर्थ हा! या कामीं फ० मॅजिस्ट्रेट साहेब यांनीं जाहीरनामे लावण्यास दिले होते ते ही लावले होते परंतु मुसलमान लोकांस जाहीरनामा हुकूम म्हणजे कांहींच नाहीं असें ते समजत. जाहिरनाम्यांत असें होतें कीं हिंदूचे समोर मुसलमानांनीं राहू नये व मुसलमानाचे समोर हिंदूनीं रहू नये. असें असतां इनस्पेक्टर साहेब यांनीं कांहींच मनाई केली नाहीं. त्यांचे जवळचे सोटे बडगे घेतले नाहींत, शिवाय नागव्या तरवारी ही स्वारीचें मागें पांच सहा होत्या त्याही जप्त केल्या नाहींत. या प्रमाणें सकाळचे आठ वाजे पासून ११ पावेतो दंगा चालला होता उदमी लोकानीं आपलीं दुकानें बंद ठेवलीं आहेत एकंदरींत पोलीस बंदोबस्त अगदी नव्हता. हिंदूंचे हातांत कांहींच "हत्यार" नव्हते व असा प्रकार होईल हें त्यांचें स्वप्नीं ही नव्हतें परंतु प्रसंग आल्यावर त्याना जसा रस्ता मिळाला तसें ते पळाले. इंग्रजसरकारचे राज्यांत अशी गर्दी होणें भूषण नाहीं. या लोकांस खरोखर जर कडक शिक्षा झाली नाहीं तर हे लोक हिंदूचा अनेक प्रकारें छळ करीतील. मुसलमान लोक हे कृत्य करून पळून गेले आहेत. आतां बंदोबस्ता करितां देऊळगांवराजा, आंढेरा, बुलढाणा, येथील पोलीसास फौरन गेली आहे व लवकरच चौकशी सुरू होणार आहे परंतु. पोलीस इन्स्पेक्टर यांनीं आधीं २ दिवस येऊन जसा बंदोबस्त ठेवावा तसा ठेवला नाहीं. पोलीस इन्स्पेक्टर साहेब मुसलमान आहेत. तरी देखील सर्व प्रकार घडून आला! इन्स्पेक्टर येतांच हिंदूनीं जाहीर केलें कीं मुसलमान लोक हत्यारबंद आहेत याची वाट लावा आणि मग आम्हास न्या परंतु हें सुद्धा ऐकिलें नाहीं. या वेळीं कसें जाहलें असेल याचा विचार करावा. हल्लीं सर्व मुसलमान मोंगलाईत आपापलें आसांने घरीं पळून गेले. पत्रविस्तार झाला आता पुढें लिहूं. कळावें. १३।७।९४

आपला
"क्ष"

मंगरूळ दस्तगीर, १६।७।९४

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० पावसानें तर बहार करून दिली पण हवेंत अद्यापि गारवा नाहीं. पिकें चांगल्या स्थितींत आहेत रोगराई मुळींच नाहीं.

मोहरम— मोहरम हा मुसलमानांचा सण आला ह्मणजे त्यासंबंधानें तो संपे पर्यंत प्रत्येक वर्तमानपत्रांत त्या संबंधीं कांहीं तरी लेख असतोच व हिंदू मुसलमानांचे तंटेही होतातच! यास्तव दयाळू सरकारानें यंदा जो ठराव केला तो सर्वांस विदितच आहे. परंतु त्यांतही आश्चर्य कारक व आनंददायक गोष्ट ही कीं येथील हिंदू लोकांनीं असा कट केला कीं हिंदूनीं मुसलमान लोकांस नाडा पुडी विकूं नये व त्यांस कोणत्याही प्रकारें ताबुता संबंधी मदत करूं नये. महार मांग लोकांनीं त्यांच्या ताबुतापुढें वाद्यें वाजवूं न येत. ही बातमी मुसलमानास समजली तेव्हां त्या लोकांनीं असा विचार केला कीं हिंदु शिवाय आपलें कांहींच चालत नाहीं यास्तव हिंदूस एकादशीचे दिवशीं दिंड्या मिरविण्यास कोणतेही प्रकारें हरकत करूं नये ह्मणजे तेही आपणास हरकत करणार नाहींत या प्रमाणें दोघांची एकी होऊन हिंदु मुसलमानांचे सण निर्भयपणें शेवटास गेले. एडिटर राव आपणास तसदी दिल्याबद्दल माफी मागून पत्रविस्तार पुरे करितों. कळावें लोभ असावा हे विनंती. आपला एक

क्ष.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य ६ शके १८१६

॥ जाती शिवा अशिव ती
अपसव्य साची ॥

कर्नल मेकंझी साहेब आरोग्यविषयक वार्षिक हकीकती विषयीं आपला शेरा झोडते वेळीं असें म्हणतात कीं उमरावतीची मुनसिपालिटी नीट सुधरली नाहीं तर पूर्वीचें डेपुटी कमिशनरचें साम्राज्य मुनसिपालिटींत चालूं करण्यांत येईल. उमरावतीच्या मुनसिपालिटीवर संकट ओढवणार असेल तर हें विघान पूर्व दुश्चिन्ह होय. लार्ड रिपनच्या उदार कृपेनें मुनसिपालिटी ही लोकसंस्था झाली. स्थानिक स्वराज्याची पहिली शाळा मुनासिपालिटी होय. आणि या पूर्व शालागृहांतच उमरावतीकर लोक कार्यविन्मुख व अपात्र ठरत चालले ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. कर्नल मेकंझी साहेबांचा हा शेरा त्यांच्या कारकिर्दीच्या इतिश्रीच्या वेळचा आहे म्हणूनच आम्ही या ध्वनित केलेल्या अरिष्टाला विशेष महत्व देतों. त्यांच्या लेखांत लष्करी झांक विशेष मारते आणि ती त्यांच्या हुद्याला अनुलक्षूनच आहे. तथापि कर्नल मेकंझी साहेबांच्या या निष्ठूर स्वप्नाला आम्ही बिलकूल थारा देऊं शकत नाहीं.

हल्लींची उमरावती मुनसिपालिटीची स्थिती कायम राहिली तरी देखील आम्हास कर्नल मेकंझी यांच्या अभिप्रायास विशेष महत्व देववत नाहीं. लोकनियुक्त सभासदांची बंडाळी मुनसिपालिटींतून मोडली तरी डेपुटी कमिशनरच्या बादशाही खाली सांप्रतची बेबंदशाही मोडेलच अशी आम्हांस आशा वाटत नाहीं. कांहीं गोष्टी उमरावती सारख्या जुनाट, अव्यवस्थित, घाणेरड्या लोकवस्तीच्या मुनसिपल व्यवस्थेला फार घातुक आहेत. उत्तरोत्तर कामाची वृद्धि अती झाली, सार्वजनिक सौख्याचीं साधनें बहुविध होत चाललीं, कायदेकानू पुष्कळ वाढले, व लोक ही शहाणे होत आहेत अशा स्थितींत मुनासिपालिटीच्या कामांत चूकभूक व गैरशिस्तपणा कांहीं झाला तरी नवीन सुधरलेल्या सूक्ष्मदर्शक उपनेत्रांनीं दोष अतिव्यापक व स्थूलाकृतीचे दिसतात तद्वत उमरावती मुनसिपालिटीची स्थिती आहे. म्हणून तिला नामशेष करण्याची दहशत कमिशनर साहेबांनीं घातली आहे हें आज पर्यंत त्या लोकसंस्थेंत ज्या लोकांनीं नीतीमत्तेनें, अक्कलहुषारीनें, व परहितदृष्टीनें बहुसाळ कामें केलीं आहेत त्यांची कृति निष्कृतिरूप करण्या सारखें आहे. कोणत्या देशांत सार्वजनिक लोकसंस्था चांगल्या ह्मणून नाणवलेल्या असतांनाही उमरावती मुनसिपासिटी पेक्षां अधीक वाईट नसतात; तेव्हां सांप्रतच्या स्थितीवरून पाहिलें तरी देखील मेकंझी साहेबांचें लेखपौरुष्य निव्वळ अवहेलनेचें आहे.

तथापि, कठोर. अप्रिय, पण सत्य अशा लेखाचें अभिनंदनही निराळ्या दृष्टीनें केलें पाहिजे. उमरावतीस शहाणे लोकांचा कळस झाला आहे असें ह्मणतात तेव्हां तेथील विद्वान, कायदेपंडित व सार्वजनिक कार्यकर्ते लोक वरील अपशकुनानें ताळ्यावर येतील आणि आपल्या मधील मुनसिपल संस्था नांवाजण्या सारखी सत्वर करितील असें आम्ही मनापासून इच्छितों. आजपर्यंत ज्या लोकांनीं सार्वजनिक कार्यभार उचलला त्यांचे उतराई हल्लींच्या उमरावतीकर प्रमुख नागरिकांनीं अशा अवहेलनेनें व स्वकीय दौर्बल्यदर्शनानें होऊं नये. त्यांच्या जबाबदारी फार वाढल्या आहेत त्यांला ते कार्यक्षम आहेत असें आम्ही समजतों. त्यांच्याच कृतीवर सर्व प्रांताचा डोळा आहे आणि ती सत्कृती ठरली तर तिचें अनुकरण सर्वत्र होईल. अलिकडे लोक संपत्तिबलानें व स्वतंत्रतेच्या प्रतिकूळ वाऱ्यानें सार्वजनिक कार्यांना अपात्र व स्वैरगामी होत चालले आहेत असा पुष्कळांचा ग्रह आहे तो मात्र उमरावतीचे शिष्ट संभावित पुढारी लोक स्ववर्तनानें पक्का करीत आहेत. मनुष्यानें सत्यप्रतिज्ञ, संगमशील, व अल्पबहु परहितरत असणें हें त्यांच्या सौख्याला व भलेपणाला घरगुती कामांत देखील आवश्यक आहे तेव्हां लोककाजाच्या प्रकरणीं या गुणांची जरूरी विशेष आहे हें स्पष्ट दिसेल. कलहप्रियता व परस्पर मत्सर यांनीं राष्ट्रें रसातळास पोचलीं तेव्हां या दुर्गुणांचें प्राबल्य उमरावती मुनसिपालिटींत नसेल अशी आमची समजूत आहे. साराश आपलें अपण जपावें आणि दुसऱ्यास यश द्यावें यांतच लोकसंस्था व सरकार या उभयतांची भलाई आहे.

दुसऱ्याच्या अप्रतिष्ठेबद्दल व अहितावह स्थितीबद्दल वाईट वाटतें तेव्हां मनुष्याचीं दृष्टी स्वकीय स्थितीकडे चटकन वळते. अकोला मुनसिपालिटीची अभिनंदनीय व वर्णनीय स्थिती पाहून आह्मांस आमच्या सुस्थितीचे व हुमूख्य शतपट अधीक वाटते. आह्मी गेल्या वसंतऋतूंत येथील मुनसिपल सभासदांची उत्कृष्ट कामगिरी व मुख्यत्वें करून राव साहेब देवराव विनायक, बाळकृष्ण मोरेश्वर सोठे व गोपाळ हरी सावरकर या तिघा मुनसिपल मुखांचा नामनिर्देश मुद्दाम त्यांच्या कृतिवर्णनासहित केला होता आणि तोच आमचा अभिप्राय कमिशनर मेकंझी साहेब यांनीं राव साहेब देवराव विनायक यांच्या नांवानें गेल्या आरोग्यविषयक रिपोर्टांत केला आहे हें कळविण्यास संतोष वाटतो. हो सत्कृतिमाला पुढें अशीच गुंफली जावो आणि उमरावतीकर व इतर नगरवाले लोक येथून स्थानिक स्वराज्याचा पहिला पाठ पढोत असें आह्मी इच्छितों.

वऱ्हाड प्रांतांत नाहीं नाहीं ह्मणतां दंगे गेल्या मोहरमांत लहान मोठे बहुत ठिकाणीं झाले आणि दंगे झाले नाहींत तरी तंटे झाल्या शिवाय मोहरमाचा सण साजराच झाला नाहीं. दुसरीकडे शिंदखेडच्या दंग्याची हकीकत छापली आहे. तो दंगा फारच भयंकर झाला. बुलढाण्याकडेही थोडी चकमक झडली. आणि प्रांतिक सरकारनें त्या दंग्या बद्दलची योग्य शहानिशा केली नाहीं तर लोकांचा सरकारावरील विश्वास उडेल. सरकार संरक्षण करण्यास असमर्थ आहे असा लोकांचा ग्रह होणें राज्यास अपायकारक आहे. स्थानिक सरकार काय व्यवस्था करिते पहावें! शिंदखेडच्या हकीकतीवरून हिंदु लोक राजनिष्ठ, सत्वस्थ, व कायद्यानें वागणारे आहेत अशी पक्की खात्री होईल.

वऱ्हाडच्या शेतकऱ्यांची स्थिती वाईट आहे ती सुधरण्यासाठीं सरकारानें कांहीं व्यवस्था केली पाहिजे किंवा नको हा प्रश्न आतां उरला नाहीं. शेतकरी निकृष्ट दशेला पोचले आहेत ही निर्विवाद गोष्ट आहे तेव्हां त्यांस मदत कोणत्या प्रकारची पाहिजे हाच प्रश्न मोठा बिकट आहे. शेतकऱ्यांच्या सुखावर सर्व प्रांताच्या उत्पन्नाची भीस्त आहे परंतु सरकारचें वर्तन त्यांच्या सुखाकडे जितकें वळावें तितकें वळत नाहीं. उलटें त्यांच्या पोटावरच पाय देण्याची निराळ्या प्रकारें व्यवस्था होत आहे. सारा वाढविला जाईल अशी मोठी भिती पडली आहे आणि सारा वाढला तर शेतकऱ्यांच्या काबाडकष्टाचा व हाल अपष्टेचा कडेलोट झाल्या सारखा होईल सारा वाढविण्याची सोय नाहीं इतकेंच नाहीं तर सरकारांतून शेतकऱ्यांच्या तरुणीपायार्थ निराळी मदत झाली पाहिजे. तगाईचा पैसा देण्याची सरकारी नियमित पेढी आहे परंतु तिचा व्हावा तसा उपयोग होऊं शकत नाहीं. शेतकऱ्यांस दक्षिणेंतील शेतकऱ्याच्या कायद्या प्रमाणें एखादा कायदा लावून देखील भागण्या सारखें नाहीं. ही न्यायकोडतांतील मदत पुरेशी नाहीं. खरी मदत ह्मणजे शेतकऱ्यांस ऋणमुक्त करण्या संबंधानें पाहिजे. शेतकऱ्यांसाठीं सरकारी पेढ्या पाहिजेत ही मूळ गोष्ट होय, आणि पीकपाण्याच्या मानानें प्रसंग विशेषीं साऱ्याच्या रक्कमेंतूनही सूट मिळाली पाहिजे. उपाय सूचविणें हें काम लोकांचें आहे पण लोकमत मान्य करणें निव्वळ सरकारच्या खुषीवर आहे.

सिव्हील सरव्हीसची परीक्षा हंडियांत घेऊं नये आणि ती विलायतेसच फक्त झाली पाहिजे असा स्टेट सेक्रेटरी यांनीं ठराव केला आणि त्याचा प्रतिकार प्रतिकूळ मतप्रदर्शनानें पुण्याच्या जाहिर सभेनें केला. पुण्याच्या सभेप्रमाणेंच सर्व देश वर्तमानपत्रद्वारा आपला अभिप्राय प्रगट करीत आहे परंतु हें राष्ट्रमत प्रबळ, अप्रतिहत, व विजयदर्शक होण्याला सांप्रतच्या मनू प्रमाणें जाहिरसभा व अर्जाची बिंडोळी हींच साधनें आहेत. स्टेट सेक्रेटरीच्या ठरावानें सर्व राष्ट्र दीलगिर, असंतुष्ट, भग्नमनोरथ असें झालें आहे आणि त्या निराशेनें एका प्रकारची अस्थिरता व चैतन्यशून्यता उत्पन्न झाली आहेत. पण इंग्लिश लोकांच्या उदारपणावर भरंवसा ठेऊन व प्रयत्नांतीं परमेश्वर या निर्वाणीच्या तत्वावर अवलंबून राजनिष्ठपणें काल कंठला पाहिजे.

लवकरच सर्व राष्ट्रभर सभा भरतील आणि त्यांच्या मुखानें स्टेट सेक्रेटरीस आपल्या अपकृत्याचें योग्य स्वरूप कळेल. अशा राष्ट्रकार्याला वऱ्हाडच्या लोकांनीं औदासीन्यांत लोळत न पडतां थोडीबहुत मदत केली तर त्यांच्या अंगचे राजकीय विचारसामर्थ्य कदाचित् उजेडांत येईल ह्मणून आह्मी भीत आहो! या प्रांतांत लोकमत कांहीं असेल तर त्याचा स्पष्टोद्गार होईल तेव्हां खरा! नामदार पाल यांच्या अभिनंदनार्थ या प्रांता तर्फे एक अर्ज जाणार होता परंतु तो गेल्याचें आह्मास स्मरत नाहीं. आनंदाच्या समयीं अभिनंदन थोडें कमी झालें तरी हरकत नसती परंतु स्टेट सेक्रेटरीनें केलेल्या ठरावा विरुद्ध राष्ट्रमत एकवटलें तर कांहीं फायदा होण्या सारखा आहे. समाजाचे पुढारी असतात त्यांच्यावर या कामाचा बोजा आहे तेव्हां ते लोक या प्रांतात आहेत किंवा नाहींत आणि कांहींजण असल्यास त्यांची योग्यता किती आहे याचीच आतां परीक्षा आहे.

सोन्याची किंमत अत्यंत वाढली ह्मणजे सरकारी रुपयास पूर्वी जितकें सोनें मिळत असे त्या पेक्षा कमी मिळूं लागलें तेव्हां आपल्या नाण्याची किंमत कृत्रिम उपायांनीं वाढविण्याची क्लृप्ति सरकारांतून काढण्यांत आली. ही युक्ति ह्मणजे लार्ड लान्सडाऊन साहेबांच्या वेळचा नाण्याचा कायदा होय. हा अगदीं अयोक्त विचारानें व अदूर दृष्टीनें करण्यांत आला आणि त्यांत प्रत्यक्ष या देशाचें नफानुकसान फारसें लक्ष्यांत आणिलें नाहीं. कोणी सोन्याचें नाणें खनिन्यावर नेलें तर त्याचा भाव पौंडास १६ रुपया प्रमाणें मिळावा आणि लोकांना रुप्याचीं नाणीं लागलीं तर त्यांनीं सोनें आणिल्यास त्याच्या किंमतीच्या भावानें सरकारी रुप्यांचीं नाणीं दिलीं जातील असें ठरविलें. रुप्याच्या विटा नाणीं पाडण्या साठीं खानगी व्यापाऱ्याकडून घेतल्या जाऊं नयेत असेंही ठरविलें. सरकारची सोपी युक्ति अशी कीं रुपयाचें नाणें दामेळ केलें व व्यवहारांत नवीन पुरवठा पूर्वी प्रमाणें होऊं दिला नाहीं ह्मणजे अर्थात सरकारी रुपयाची टंचाई होऊन त्याची किंमत

वाढेल व पौंडाचा भाव उतरेल. परंतु हे विचार-संधान स्वप्नांतल्या राज्यश्रीप्रमाणें मिथ्या ठरलें. रुपयाची किंमत तर खरोखर वाढली नाहीं, लोकांवरील अप्रत्यक्ष करांचीं देणीं दुणावलीं, व व्यापारास अगदीं ओहटी लागली. हे अनिष्ट परिणाम निदर्शनास आल्या नंतर देखील हा नाण्याचा कायदा रद्द करण्या विषयीं लार्ड सभेंत प्रश्न निघाला होता त्या वेळीं लार्ड लान्सडाऊन हजर होतेच. आपण लाविलेल्या रोप्याचा वृक्ष होऊन काय काय फळें येतात हें पाहण्याची त्यांस मोठी हौस होती ह्मणून आगामी विषमय फळें आपलें विष इंडियांतील व्यवहारांत भिनवी पर्यंत हा प्रश्न तहकूब राहवा असें ठरलें होतें परंतु अद्याप हौस फिटली नाहीं असें दिसतें. इंडियाच्या लाभहानीची काळजी कोण वाहणार आहे!

The Berar Samachar

MONDAY JULY, 23, 1894

Colonel Lane has done us an immence service in his small note in the last Police report for 1893 on the favourable tendencies of the agragrian population to *dakaits*. Unwittingly he is a valuable testimony to bear us out that the peasantry of Berar is not in a flourishing condition. The impoverished state of the agricultural masses is well depicted in the following para:—

"A feature in these dakaitis which ought not to be left unnoticed, for I think it is a serious one in some lights, is the apathy, if not acquiescence, with which the villagers saw these dakaitis taking place in their villages. The men who suffered from the dakaits were those who had amassed wealth by usury, who had advanced money on mortagages of land, and had become the virtual, though always the actual, owners of the soil. The villagers will not lift a finger ot help to them.

"At Mop, a village which has for some time been threatened by the gang of Ootam Sing Sikh (who has been killed quite recently by the Hyderabad Contingent Cavalry), the villagers did not conceal the fact that they would be pleased if the dakaits gained their end and succeeded in looting the house of the wealthy man there, who they said had deprived them of ownership of their land. This they told the District Superintendent of Police on the spot."

Herein he asks us to trace the causes of an abnormal rise in the statistics of crimes. One bad harvest is enough to overflood our jails with criminals. Even in his hopeful forecast there is a touch of pessimism which is worth noticing.

"Times have been hard with the poorer part of the population for two or three years, for prices have ruled very high and harvests have not been good. Crime has risen in an unusual degree. The jails have been full to overcrowding. I believe, however, that indications are not wanting that the tide is on the turn, and that there is good hope for thinking that unless there is a serious a failure of crops this year, crime will gradually fall to the figures of normal times."

Who will doubt that the peasantry of Berar is on the lowest verge of living a life from hand to mouth? No further tension on their resources is sustainable and a bad year threatens the people with half-meals, privations and starvations. From this we make bold to question the accuracy of Colonel Mackenzie's inferences as to the enviable propriety of the people. While in the office of the Judicial Commissioner, he led us to believe that the rising and overwhelming litigation in civil courts enshrines his ideal of people's material advancement. We joined issue with him and pointed out that he was in a land of dreams. We have not seen that a few years' course has changed the common run of affairs so as to bring our agriculturists to a state of utter helplessness. The cause was there already at work and we perceive the approach of the other extreme to which the British rule will drive the people if no suitable means were provided to afford a helping land in time of need.

Under these circumstances we find no probable chance to enhance the land assessments. This will be a negative help. What is wanted is an Agricultuaal bank to assist the kunabi in his indebtedness. The Agriculturist's Loans Act is but an inadequate measure. The conditions difficulties, and stringent procedures under which a loan is available to one who holds land in his name make it a weary and unprofitable trial to deal with government in this new aspect of a money-lender. A rayat is already in debt. He wants a loan at a low rate of interest to satisfy his past creditor and to defray the present and probable expenses. Unless a remedial measure of this nature is put forth we do not see a possible way to extricate the helpless and hopeless peasant. He has almost been without land or house. Whatever rights he retains in his estate are of an equitable nature and will soon pass away in his default. Land in Berar has already changed its original owners to almost more than half its extent and the influences that play at present are sure to take away land from the hands of a sinking discontended people. In short, an extentive or administrative relief is wanted which will relax the rigidity of revenue laws, allow suspension or remission of revenue in times of a bad harvest and open an agricultural bank to meet the due and legitimate demands of the indebted agriculturists at a low rate of interest.

The 'Notes on the annual statements of the Civil hospitals and Charitable dispensaries in Berar for 1893 are short and unattractive. The year that is under review would have been almost barren if some two interesting facts have been dropped altogether. The munificent gift of Mr. Jehangir Hormusji to found a Charitable dispensary is the first and foremost event of the year. His honored name reminds the people in the province of a monument of Parsi-charity and sets down an enviable example for rich people to follow if they dare with their their money—hoarding habits. By-the-by we may refer here to a list of eight persons headed by Mr. Narhar Balaji Sahukar of Kolaspur in the Yeotmal taluka who contributed in all a sum of 1057. These men have spent money in a noble cause of relieving their fellow—men and such examples are very rare in these days of a hard and stirring struggle of life. If it be not invidious we would mention a fact of the total absence of a *European* contribution. The Englshmen in the province hoard piles of Rupees by way of salaries and have not the heart to spend a farthing in the place to which they owe their grandeur and rich luxuries. We are aware of an argument that their pay is in sufficient for their expenses but we may point out that even Her majesty's dominions will not be enough for their philosophy of a life in this land of exile India is a place wherein to grow rich and England is a country to witness the extent of her soujourners' riches. It is strahge that there is not one institution in Berar where we shall find an Englishman's charity. Rightly it is not his home and why he should waste money here for a *black* man's sake. Before we stop harping on this discordant string in the Englshman's conduct we quote below the summary of the main points in the report as noted by out Commissioner.

"The main points are—

1*stly*—That two dispensaries—one at Badnera, the other at Sirpur—have been added to those previously existing, bringing up our total to 6 civil hospitals and 38 dispensaries. The Badnera dispensary we owe to the generosity of Mr. Jehangir Hormusji Modi, after whom it is called.

2*ndly*—That *in*-door attendance in civil hospitals has fallen. No where is this explained, but as in Akola it reached the figure of 118, I think the Civil Surgeon should have been required to explain it. I hazard the guess that the decline here is mainly due to the removal of the military from Akola.

3*rdly*—Thot *out*-door attendance at civil hospitals has increased in all districts, except Amraoti, by a total of 3,060.

4*thly*—That as a test of popularity and confidence the return of major operations performed in civil hospitals seems to tell against Buldana, where Mr. Apothecary Montgomery only performed 7.

5*thly*—That *on the whole* attendance at dispensaries, *out* and *in*-door, has increased-

6*thly*—That an increase of major and minor operations performed at dispensaries is a favorable sign."

We think it to be a bad stroke of policy which is newly adopted this year in the whole—sale omission of mentioning the good and praiseworthy work of Hospital Assistants. This arrangement removed from the record one interesting and salutary influence which the Sanitary Commissioner's remarks produced upon the minds of Hospital Assistants.

The following is Colonel Mackenzie's observation which we have commented upon in our Marathi columns in connection with the municipal affairs of Akola and Amraoti:—

"Amongst our municipalities Akola is certainly at the present time the best managed, because its municipality, with Mr. Deo Rao Vinayak at its head take an intelligent interest in, and some considerable trouble with, their work. Amraoti, though it contains puite as able and good men, I regret to say, presents a marked contrast to Akola. Only very recently have I been obliged to draw the Deputy Commissioner's attention to a recent inspection report of the Sanitary Commissioner pointing out serious defects in supervision and neglect of duty. If they will not mend their ways, then the remedy is to abolish the municipality and return to the old autocratic system of working the town under the Deputy Commissioner."

वऱ्हाड.

हवामान— पावसानें अगदीं दाणादाण करून दिली. दोन दिवस सतत वृष्टि होत होती. एकंदर पाऊस १६ इंच झाला. पावसामुळें पडझड फार झाली. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं.

दारव्याचे पोलीस इनस्पेक्टर मि. नरसय्या यांस देवाज्ञा झाली हें कळविण्यास दुःख वाटतें. हे गृहस्थ हुषार व जुने अधिकारी होते.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन डायरेक्टर हे हल्लीं इमारतींची सुधारणा करण्याचे खटपट करीत असतात. कांहीं फेरफार फार चांगले होत आहेत असें कळतें.

कारंज्यास एक मुसलमानीण आपल्या पुतण्याशीच रत झाली, पुढें मूल झालें तें तिनें मारून शेजाऱ्याच्या घरीं फेंकलें. कामलीला अघटित आहे!

रा० रा० मनोहरपंत पोलीस इनस्पेक्टर बडनेरा यांनीं पेनशन घेतलें.

रा० रा० वामन नारायण काळे क्लार्क डेपुटी कमिशनर कचेरी हे लांड रिकार्डच्या कचेरींत बदली करून घेणार आहेत तेव्हां त्यांच्या ८० रुपयांच्या जागीं मि० हेअर बाहेरचा मनुष्य न नेमतां हाता खालील लोकांस योग्य बढती देतील असें आम्ही इच्छितों.

मोहरमांत आकोल्यास दंगा झाला नाहीं परंतु आमच्या छापखान्या जवळील नळा मुळें मात्र दंगा व तंटा होईल अशी भीती आहे तेथें चार नळ तरी द्यावे किंवा आहे तोच बंद करावा म्हणजे ठीक होईल!

अति पर्जन्यामुळें वाशिंद जवळील रेलवे कांहीं मैल वाहून गेली. आणि जबलपूर लायनीवरील चांदणीचा पूल ढासळला. मुंबई कडील मेल दोन दिवस बंद होती. रात्रीची बारा वाजतांची गाडी आज सकाळीं आठ वाजतां येथें येऊन पुढें नागपुरास रवाना होईल.

बुलढाण्याच्या नेटिव नेटिव मंडळींनीं एक विश्रांतिगृह स्थापिलें आहे आणि त्या साठीं स्वतंत्र इमारत बांधण्याचा त्यांचा विचार आहे.

येथील वर्षोत्सव व्याख्यान माळेस काल सायंकाळीं सुरुवात झाली. व्याख्यान रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं दिलें लोकसंख्येच्या वाढीचे नियम व त्यांचीं हिंदुस्थानांतलीं व युरोपांतलीं उदाहरणें हा विषय होता. भाषण उत्कृष्ट झालें.

To,

The Superintendent of
Police Akola District
Akola

In compliance with the provisions of section 42 of the Police Act V of 1861 I beg to inform you and give notice that after the expiry of one month from the service hereof as enjoined by the above act, I shall institute criminal proceedings before a proper Magistrate, against Chief Constable Behari Singh wd. Alumsingh now in charge of the Police Station Telhara, for the offence of wrongful confinement punishable under section 343 of the Indian Penal Code. The charge which I wish to prefer arises out of the following circumstances.

On 10th. June 1894, the said Chief Constable, at about 7-30 P. M. wrongfully restrained and imprisoned me in the lock—up attached to the Police station Telhara in such a manner as to prevent me from going beyond the said lock-up for five days.

Dated 13th. July 1894.

Shriram Motiram Khatri
of Telhara now residing at Amraoti

वर्तमानसार.

वायव्यप्रांतांतील इटा जिल्ह्यांत, हिंदूंनें सांडलेल्या पोळास ठार मारल्याबद्दल, पकडलेल्या मुसलमानांस सहा सहा महिन्यांची शिक्षा झाली. धर्म संबंधीं कोणाचेंही मत दुखावलें जाईल असें कृत्य कोणीही करूं नये.

जर्मनीबरोबर हिंदुस्थानाचा वाद वाढत चालला आहे.

असें कळतें कीं, आस्ट्रेलिया, सिलोन वगैरे संस्थानच्या युनिव्हर्सिट्या, आक्सफर्ड युनिव्हरसिटीनें मद्रास युनिव्हर्सिटीच्या स्वाधीन केल्या.

मुंबई आणि पेशावरच्या दरम्यान, टपाल लोकर मिळावें म्हणून, मेलचा वेग वाढविण्याचें, रेलवे कंपन्यांनीं कबूल केलें असल्याचें कळतें.

सरहद्दीच्या बेतावर तर अमीर व व्हाईसरायांची गांठ पडल्यावांचून रहाणार नाहीं असें सि० मि० ग्यासेट पत्र म्हणतें

अलीगढ जिल्ह्यांतील सुरजपूर गांवातील लोक आपल्यातील खटला, आपसांतच जज्ज कलेक्टर इनस्पेक्टर वगैरे लोक बनवून चालवितात वगैरे बातमीवरून, तेथील लोकांस असें न करण्याविषयीं सरकार कायदा करून सांगण्यांत येत आहे.

यंदाच्या पावसाळ्यानें आणि हिमालयावील गोहना सरोवरामुळें लोक अगदीं घाबरून गेले. कोणत्यावेळीं व किती पाणी येऊन काय नुकसान होईल या विवंचनेंत काश्मीर व पंजाबाकडील लोक असून, कांहीं लोक घरेंदारें सोडून जात आहेत.

मद्रासेकडील कुंभकोण जिल्ह्यांत सतानूर येथील राहणार एक तामील ब्राह्मण एक वर्षा पासून योगी होऊन, समुद्रांत बुडून राहिला होता; त्यास 'हें काय आहे' हें समजल्या करितां नाळे घालून नुकेंच कोळी लोकांनीं काढलें.

पंजाब प्रांतांतील लाहोर जिल्ह्यापेकीं येथील ककोली येथील खणिन्यावरील लष्करी सोल्जर दारू पिऊन गुंग झाल्यावर "हा खजिना कोणाचा ?" हा वाद करूं लागले. प्रत्येक इसम "माझा खजिना" असें म्हणूं लागून शेवटीं खूप मारामारी झाली, ज्याच्या हातीं जे सांपडलें तें घेऊन तो पसार झाला. त्यांना लागलीच पकडलें, पण शुद्धींत आल्यावर लूट कुठें ठेवली आहे हें त्यांनीं गैर शुद्धींत केलें असल्यामुळें आतां उमगत नाहीं म्हणून निकडे तिकडे शोधाशोधी व खणाखणी चालली असल्याचें हिं० ब्रं० वरून कळतें. श्रीस० वि०

दक्षिण अमेरिकेंत इतके घोडे आहेत कीं भिकारी घोड्यावर बसून भिक्षा मागतात.

चीन देशांत श्वास रोगावर मांजराचें मांस देण्याची चाल आहे बौद्धधर्माचा उलट परिणाम म्हणावयाचा.

शिकागोवर सर्व बाजूकडून सैन्य जात आहे.

१००० जपानी लोक कोरियांत उतरले आहेत.

कोरियांत दंगेखोरांची संख्या फारच वाढत चालली आहे. ते हत्यारें वगैरे गोळा करीत आहेत व आपल्या लोकांस दिवसा कवाईत शिकवीताहेत. हें प्रकरण तंट्यावर जाणार. होतें परंतु इंग्रजाची मध्यस्ती जपान व चीन यांनीं कबूल केली. सिंहाच्या हातीं खड्याची वाटणी!

जपानचें म्हणणें कबूल केल्या शिवाय जपान आपली फौज कोरियांतून काढीत नाहीं

चीन व जपान यांच्या मधील तंटा तोडण्याचें इंग्लंडनें पत्करल्यानें दोन्ही राष्ट्रें कबूल झालीं आहेत.

सु. प.

महादरबार—व्हैसराय साहेब येत्या नवंबरांत लाहोर येथें दरबार भरविणार आहेत. त्यावेळीं खूप भपका उडविण्याकरितां पुष्कळ फौज जमविण्यांत येणार आहे.

पोलिसांनें बायको पळविली—मेमेनसिंग येथें चारुमिहिरनांवाचें वर्तमानपत्र निघत असतें; त्यांत लिहिलें आहे कीं, फुलपोर येथील पोलिस स्टेशनच्या हद्दींतील एका मनुष्याची बायको एकाएकीं घरांतून नाहींशी झाली म्हणून त्यानें पोलिसास वर्दी देऊन तिचा शोध करण्यास सांगितलें. सायंकाळीं तो पुनः ठाण्यांत गेला, तेव्हां त्याच्या बायकोला बरोबर घेऊन पोलिसचे सब इन्स्पेक्टर, हेड कान्स्टेबल अडकी मामा व इतर साळकोनी माळकोनी हें चहापाणी पीत आहेत, असें त्याला दिसलें; त्याला क्रोध येऊन तो पोलिसाशी तंडू लागला, परंतु एका चौकीदारानें त्याला येथेच्छ खाऊ दिला! त्याबद्दल नवऱ्यानें डे० मॅजि० कडे फिर्याद केली असून हल्लीं चौकशी चालली आहे. बरे पोलीस!!!

चमत्कारिक शिक्षा—ठाणें जिल्ह्यांतील कोळी लोकांनीं आपसांत असें ठरविलें आहे जो मनुष्य दारू गुप्तांत जाईल, त्याची एका आंगची मिशी काढून टाकण्यांत येईल!!!

स० शो०

उटकमांडचे देवळांतून ८ लक्ष रुपयांची चोरी झाली तिचा पत्ता लावण्यासाठीं मुंबई पोलिसाकडे लिहून आल्यात योग्य खबरदारी ठेऊन त्या पोलिसानें शोध लावून ९० हजाराचे जवाहीर पकडलें व दुसऱ्या इसमाजवळ १ लक्षाचा माल पकडल्याची खबर मिळते. शाबास ! याचें नांव तपास ! !

हिंदुस्थानांतील जमीन महसुलाचा कायदा नवा होऊं पाहत आहे.

हिंदुस्थानांत २३००० वालंटीअरचीं संख्या झाली आहे.

ब्रह्म देशाचे सरहद्दीबद्दल हिंदुस्थान सरकार कायदा करणार आहे.

व्हाइसराय साहेब काबुलच्या अमिराची भेट सरहद्दीवर घेण्याच्या बालमेलींत आहेत.

मुंबई इलाख्याचे कमांडरइनचीफ (सेनापती) यांची जागा लौकरच कमी होणार.

सांवतवाडी व गोवें दरम्यान समुद्र बाटेनें दारू अपकारीचा व्यापार सरकारांतून सक्तीनें मना झाला.

पंजाब व नार्थवेस्ट प्राव्हिन्स यांचे मधील भागांत पावसानें कहर करून रेलवे व तार हापीसें उलथून दिलीं.

इनिसबे खेदीव कान्स्टनटिनोपल येथें जाणार. "बांसफरस" राजवाड्यांत त्यांच्यासाठीं तयारी होत आहे.

आर्मेनिया नामक बेटांत पंख असलेलीं मोठीं सांपडलीं आहेत.

हिंदुचे देव छिन्नभिन्न करून टाकण्याची सुरवात दाभाड्याचे तळेगांवीं झाली. त्याच प्रमाणें नगरचे न्या. सि. कळवितात कीं, २ कोसांवरील महादेवाची शाळुंका फोडून छिन्नभिन्न झाली., इचलकरंजीमधील देवीचे हात तोडल्याची बातमी दिली आहे आणखी कांहीं ठिकाणीं गतपतीच्या सोंडी फोडल्या जात हा प्रसंग बरा नाहीं! हिंदू सहनशक्ति खरे परंतु एकदां चिरडीस पेटल्यावर कोणत्या बिळांपास गोष्ट जाईल नकळे. म. मि.

सिंगाराणी दगडी कोळशांची खाण—ही निजामच्या राज्यांत आहे. हिच्यांतला कोळसा विलायतेसारखा उत्तम आहे. तिची लांबी १३ मैल, आणि रुंदी ३ मैल आहे, तींत 'रिंग' म्हणून जो कोळशाचा एक थर आहे त्याचे ९ चौरस मैल क्षेत्र असून त्यांत साडे तीन कोटी टणापेक्षां पुष्कळ जास्त कोळसा सांपडेल असा तत्वज्ञ लोकांचा सुमार आहे. शु. सू.

नोटीस

ति० तुळसाई मर्द पुंजाजी माळी रहाणार मुंडगांव ईस नोटीस देणार मानाजी वल्लद यादोजी माळी रहाणार मुंडगांव नोटीशीनें असें कळवितों कीं, तुझी आमची वडील भावाची बायको आहा. आमचे वडील बंधु पुंजाजी हे मयत होऊन सुमारे अडीच वर्षें झालीं. तुझी आह्मांस मातोश्रीच्या ठिकाणीं आहा. रितवार व आपले सर्व हंतरून पाहून पाय पसरावे. अशा हिशोबानें तुझी राहिल्यास सर्व कांहीं तुह्मांस आहे. व तुमचा वडीलपणाही त्यांतच आहे. असें तुझी केलें नाहीं. व विनाकारण स्थावर जंगम, रोकड, गल्ला, जिनगीची मन मानेल तशी तशी वाताहात करीत आहा. त्याअप्रमाणें ही नोटीस पावल्या पासून कराल तर तुम्हास अन्न वस्त्र वगैरे न देता घरातूनही बाहेर काढून लाविले जाईल. तर तुझी आपला वडीलपणा राहून. मोठ्या बेतबातीनें राहून आह्मां सर्वांस घेऊन चालावें. म्हणून दिली. नोटीस सही तारीख १७ माहे जुलाई सन १८९४ इसवी.

सही
मानाजी वल्लद यादोजी माळी
रहाणार मुंडगांव दस्तुर खुद.

जाहिरात

सर्व लोकांस या जाहिरातीनें मानाजी वल्लद यादोजी माळी रहाणार मुंडगांव तालुके अकोट जिल्हे अकोले हे असे जाहीर करितात कीं माझा भाऊ नामे पुंजाजी वल्लद यादोजी हा मयत होऊन सुमारे अडीच वर्षे झाली. पुंजाजी यांस मूल बाळ कांहीं नाहीं काय तो लग्नाची बायको—नामे तुळसाई ही आहे. आह्मी सर्वजण एकत्र होतो व पुंजाजीच्या स्थावर जंगम वगैरे सर्व इस्टेटीस वारस आह्मी आहो. बायको तुळसाई ही नुस्ती अब्रूची मालकीण आहे. असें असून तुळसाई ही स्थावर जंगम वगैरे जिनगीची निल्हे वाट करीत आहे. म्हणून सर्वांस ही जाहिरात देऊन कळवीत आहों कीं तुळसाई पासून पंजाजी वल्लद यादोजी या नावाची शेती वगैरे अथवा कर्ज देणें घेणें आमच्या संमती शिवाय शेती अगर घर गहाण, किंवा खरेदी वगैरे घेऊ नये व कांहींच कोणत्याही प्रकारचा व्यवहार करूं नये. केल्यास त्या जबदल ज्याचा तो जबाबदार आहे. आह्मी व पुंजाजी याची जिनगी वगैरे कोणी ही जबाबदार नाहीं म्हणून दिली जाहिरात सही तारीख १७ माहे जुलाई सन १८९४ इसवी

सही
मानाजी वल्लद यादोजी माळी
रहाणार मुंडगांव द० खुद.

NEARYL READY

CRIMINAL COURT MANUAL.

for the

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे (म्हणजे चक्रांचें खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोपप्रमाणें, आंकडे ठळक निळारी काचेचे मुदाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें विश्वांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें बाव आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र कपाटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

किंमत १० आणे

गुरुचरित्र

पांच किंवा जास्त प्रती एकदम घेणारास दर प्रतीस

आठ आणे

हा ग्रंथ आज पर्यंत ८।१४ आण्यास मिळत होता. त्याच्या आतां फारच थोड्या प्रती शिल्लक आहेत ग्राहकांनीं त्वरा करावी.

आर्य भूषण छापखाना, पुणें.

☞ हें पत्र आकोलें येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ,, ,, १८८
किरकोळ अंकांस ८४

Six monthly..... 3 ,, ६
Single copy.....

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८।८६
दुसरें खेपेस .....

वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as.
Repitition per line 3a.

THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 30 JUNE 1894 NO. 30

वर्ष २८ आकोला सोमवार तारिख ३० माह जुलै सन १८९४ इ० अंक ३०

सर्व नजरबंदीच्या माकडचेष्टांस हाणून पाडतां येतें.

मी रस्त्यांत जेव्हां झोकांडी खात चालत असे तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिंगून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुह्मासही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असतें. परंतु ते सर्व चुकत होते. भर रस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुःक्रमाचे पूर्व मार्गावर थोडेसें गेलें पाहिजे

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्या प्रमाणें मी सुखी प्राणी होतो परंतु चार पांच वर्षपूर्वी मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वीसारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्वाशयांतून उमळून येई व जसें कांहीं वेडावा [illegible] is [illegible] पाया हेतूस हाणून पाडे'. हें मला [illegible] will [illegible] नेहमीच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाठतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्या मुळें निजायाला जातांना आपल्यास नशी सुस्ती चढून थकवा येतो त्या प्रमाणें मला होत असें. ह्यामुळें रात्रीं झोपेचा कल अगदीं बदलला. झोप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्या सारखें मला वाटल्यामुळें मी केव्हां केव्हां अफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असे. मी जीभ पहातो तो तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यांत भाला टोंचल्या सारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तो माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांत व हिरड्या सभोवती कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दांताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्वाशयांत घाणेरडा वायू उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निघून जाई ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्या वेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी; हुळक वाटावें. आणि गरगर फिरल्यासारखें वाटून झोकांड्या देत चालावें व जमिनीवर सबशेल पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळता येईल तेवढें टाळून घेई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्र मंडळीनें व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तींत घेतलीं त्या पासून गुण न येतां मी अगदीं सुदामदेव झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें. ह्याप्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मास थोडक्यांत निवेदन करतो कीं बरा कसा झालों ह्याचें कारण आपणास कळवोंच हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिजेलचा रोगहारक सिरपा (ह्मणजे माता सिजेलचा रोगहारक पाक) तुह्मांस फारच गुणाकारी होईल.

माझा कांहीं त्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक वाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधापासून इतका जलद गुण आला कीं मला खातांना बरें वाटलें व झोप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार वाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविकासारखें वाटलें मला खचित वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हा ताजातवाना झालों व त्यामुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं, जें सर्वास होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतों व लागलींच मला त्यापासून आराम वाटतो.

ह्याचा तत्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होते परंतु खरोखर माता सिजेलच्या क्युरेटिव सिरपांत डोळ्यांत माती टाकण्यासारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच.

मी तुमचा उपकार मानणारा
(सही) जे. सी. सिमसन
२१ ब्रानोबरचा रस्ता, न्युकासटल अंडर लाईन, स्टाफर्ड शिपर इंग्लंड.
B. T.

विजयादशमीचें सोनें

I told her of the Knight that wore
Upon his shield a burning brand;
And that for ten long years he woo'd
The Lady of the Land.

I told her how he pined: and ah!
The deep, the low, the pleading tone
With which I sang another's love
Interpreted my own.

She listen'd with a flitting blush,
With downcast eyes, and modest grace,
And she forgave me, that I gazed
Too fondly on her face.

But when I told the cruel scorn
That crazed that bold and lovely Knight
And that he cross'd the mountain woods
Nor rested day nor night;

'शिलेदार बघ होता दयिते!, ज्वलदुल्काफल धरि जो हातें, वरांगना जी देशपतिची, सुता—खनी जणु लावण्याची—दशवर्षें तो प्रणयी साचा अनन्य भाव असे सतीचा,' कथा अशी मी सखीस सांगे, 'अनुराग दक्षिणा उलटी मागें, सतिचेठायीं विमलप्रीति, सदा स्मरे तत्सुंदर मूर्ति' कळकळुनी तद्राग वर्णिता, हलक्या शब्दें दृढभावानें, माझा ऐसा भाव तयेनें उमजुनि मजवरि दृष्टिस टाकी ती आर्ता ॥ ९ ॥ मधुर कथा प० ॥

सावधान तें श्रवण करोनीं, दयिता गाल हि जाय सुकोनी, लज्जानम्र विलोल विलोचन सव्रीडहि तें सुंदर आनन ठाउक तिजला अंतःकरणें, शुद्ध असें मम तन्मुख बघणें, थोरचि हा अपराध घेरवी, आतां हें मद्राग सूचवी वनिता पुतळी कारुण्याची, क्षमा करी मज तापि ती साची, कथा कथीं मी पुढें सखीला, 'वरांगनेनें झिडकारीला, घातुक हा उपमर्द तयाचा, शिलेदार मग वेडा साचा, सुंदर मदना सम तन्मूर्ती, बनीं दतीं मग हिंडे बहुती, रात्रंदिन तो (उपमर्द) जाळित तत्कोमलचित्ता' ॥ ६ ॥ मधुर कथा प० ॥

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य १३ शके १८१६

वऱ्हाडचे बंदिखाने.

[२७ वे अंकावरून पुढें चालूं.]

एकंदर १३१७ कैद्या पैकीं ९८८ कैदी सहा महिन्या वरील पण दहा वर्षां खालील शिक्षा पावलेले असे आहेत. आणि एक, दोन, पांच व दहा अशा चार प्रकारच्या मुदतीच्या कैद्यांची संख्या प्रत्येकी २२५ पासून २६० पर्यंत आढळतात. ह्मणजे बहुत कैद्यांचा भरणा अधिकाधीक मुदतीच्या शिक्षा पावलेल्या अपराध्यांचा आहे. १८९३ सालीं तीन कैदी फांशी गेले आणि २१ जणांस काळे पाण्याची सजा होऊन त्यांची रवानगी अंदमान बेटाकडे झाली. अवघ्या वर्षांत १६३९ कैदी तुरुंगांत आले त्या पैकीं दुबार किंवा अनेकवार शिक्षा पावलेले असे कैदी १९८ इसम होते. वारंवार शिक्षा पावलेले इसम निराळे काढण्या संबंधानें कर्नल लेन साहेबांची एक उत्तम सूचना आहे ती अशी कीं ज्या अपराधाचें स्वरूप नीतिभ्रष्टतेचें व पापाचरणाचें आहे असे अपराध वारंवार करणाऱ्या अपराध्यांची गणना स्वतंत्र करून त्यांस संबंधीच्या अपराध्यांच्या वर्गांत काढावें. यवतमाळच्या तुरुंगांतून एक कैदी दिवसा ढवळ्या पळून गेला आणि त्याला कारण पाहेरकऱ्याची ढिलाई व कामांत हयगय हीं झालीं. त्या तुरुंगांतील बंदोबस्त जोरदार, व्यवस्थेशीर व नेमस्त नव्हता असें दिसल्यावरून सिव्हील सर्जन मॉरिसन यांजवर हा पहिल्यानें दोष आला. नाहीं तर दरसालच्या वार्षिक हकीकतींत या डाक्टरांची त्यांच्या चांगल्या देखरेखी बद्दल स्तुती येत असे परंतु या वर्षीं त्यांच्या कामांत कसूर होती ह्मणण्यापेक्षां एक घोंटाळा अकस्मात झाला असें ह्मणणें बरें दिसतें.

तुरुंगांतल्या अंतरव्यवस्थेंत जे कैदी चुकींत अगर गुन्ह्यांत सांपडतात त्यांना त्यांच्या अपराधाच्या मानानें शिक्षा होत असतात. या शिक्षेचे दोन प्रकार आहेत. एक सौम्य व दुसरा कडक. उमरावतीस कडक शिक्षा व सौम्य शिक्षा सरासरी बरोबरीच्या प्रमाणानें झाल्या परंतु अकोल्यास एक शिक्षा जबर प्रकारची तर चौदा सौम्य प्रकारच्या होत्या यावरून इनस्पेक्टर जनरल साहेब ह्मणतात कीं उमरावतीची व्यवस्था व टापटीप आपणांस चांगली पसंत आहे. हल्लीं तुरुंगा संबंधानें नवीन कायदा तयार होत आहे तेव्हां त्यांत कैद्याच्या कोणत्या अपराधाला सौम्य अगर कडक शिक्षा द्यावयाची याविषयीं नियम होणार आहेत. ते अंमलांत आले ह्मणजे सिव्हील सर्जनांचें सुपरिनटेंडन्ट या नात्यानें काम टीपटाप व बिनचूक होत जाईल.

थोड्या मुदतीच्या कैद्यास देण्याचें अन्नाचें माप भारी मुदतीच्या कैद्यास देण्याच्या अन्नाच्या मापाहून कमी असे परंतु हिंदुस्थान सरकारच्या हुकुमा प्रमाणें उभय प्रकारच्या कैद्यांस सारख्याच वजनाचें अन्न देण्याची व्यवस्था नवीन चालूं केली आहे. कैद्यांनीं विनंती केल्यावरून मीठ मिरचीचें प्रमाण अनुक्रमें $\frac{३}{४}$ च्या ऐवजीं $\frac{१}{४}$ व $\frac{१}{४}$ च्या ऐवजीं $\frac{१}{१६}$ औंस ठेवण्यांत आलें आहे.

सन १८९२ पेक्षां १८९३ सालीं कैद्यांची भरती फार वाढली त्यामुळें खर्च सुमारें तीन हजार रुपये वाढला ह्मणजे एकंदर रुपये ७९४७७—११ आणे झाला. यापेक्षां कैद्यांनीं केलेल्या कामाचें उत्पन्न वजा जातां बाकी सरकारी खजिन्यावर टांच बसली ती रुपये ६१८२१—१२ आणे या रकमेची आहे. शिकंदराबादच्या तुरुंगाची व्यवस्था वऱ्हाडाकडे दिल्यामुळें तिकडील खर्चाचेंच दाखविला आहे त्यावरून इकडे दर माणशीं रुपये ६।८।९ खर्च आला त्या ऐवजीं तिकडे रुपये १०९८।९ खर्च आला आहे. वऱ्हाडच्या तुरुंगाचा खर्च मध्यप्रांत,

मुंबई इलाखा व मद्रास यांच्या मानानें ठीक व बेतावाताचा आहे असें आढळतें हो मोठो आनंदाची गोष्ट असून सर्व श्रय कर्नल लेन यांजकडे आहे. उमरावती पेक्षां अकोल्याच्या तुरुंगांत फार खर्च येतो याचें कारण इनस्पेक्टर जनरल असें दाखवितात कीं आकोल्यास व्यवस्था चांगली नाहीं. मक्त्यानें कंत्राटदाराकडून धान्य विकत घेण्याची चाल वाईट आहे आणि खर्च वाटेल तसा केला जातो. हें अपयश सर्जन लेफटनंट रेली यांच्या वांट्याला येतें आणि त्याला ते पात्र नाहींत असें आह्मी ह्मणूं शकत नाहीं. बुलढाण्याच्या तुरुंगाविषयीं अशीच हाकाटी आहे.

तुरुंगांतील बगिच्यासंबंधानें कर्नल लेन ह्मणतात कीं बटॉट बेरीज करून इतर भाजीपाला कैद्यासाठीं बाजारांतून घ्यावा लागूं नये. उमरावतीस एका एकर जमिनी मागें ४००० शेर कांद्यांचें उत्पन्न होतें पण मुंबईस याच्या तिपटीहूनही अधिक उत्पन्न होतें. बगिच्यांची व्यवस्था एकंदरीनें समाधानकारक नाहीं.

तुरुगांतील दोन कारखान्या विषयीं रिपोर्टीत विशेष हकीकत आहे. आकोल्याच माग रिकामे चार महिने होते त्याला कारण कीं कापडाची मागणीच कोठून आली नाहीं. कर्नल लेन ह्मणतात कीं पोलीसच्या पोषाखाच्या कपड्या प्रमाणें लागले लोकांसाठीं तुरुंगांतील कपडा वापरला जावा. तो स्वस्त मिळेल व कैद्यांस मुबलक काम मिळेल. एकंदर उत्पन्न रुपये १७६५५ झाले त्या पैकीं छापखान्यांचेंच उत्पन्न १३४४० रुपये आहे. कर्नल लेन ह्मणतात कीं वऱ्हाडांतील खाजगी छापखाने आमच्या दरा प्रमाणें काम छापू शकत नाहींत तेव्हां तुरुंगाचे छापकामाचे दर अगदीं स्वस्त आहेत हें लक्ष्यांत धरलें पाहिजे. आह्मास हें विधान कबूल नाहीं आणि आह्मी उमेद बाळगतों कीं टेंडरच्या पद्धतीनें छापणीचें सरकारी काम दिल्यास खाजगी छापखाने तुरुंगांतील छापखान्यास मागें हटवतील आणि काम अधीक सुबक, स्पष्ट व मनोहर निघेल.

सरासरीनें दररोजच्या कैद्यांचे प्रमाण १२८३-२ पडतें आणि त्या पैकीं एका हजारामागें २८-३ या प्रमाणानें कैदी तुरुंगांतच मेले. ही मरणाची संख्या गेल्या तीन वर्षा पेक्षां दिढीनें अधीक आहे. इनफ्ल्युएनझाच्या तापामुळें कैदी पुष्कळ मेले तथापि आकोल्याच्या गैरव्यवस्थेमुळें हें मरणाचें प्रमाण फुगलें आहे असें कर्नल लेन यांचें ह्मणणें आहे. एकंदरीनें, डाक्टर रेली यांस तुरुंगाची योग्य व्यवस्था व नीट देखरेख ठेविता येत नाहीं असें सिद्ध होतें आणि ही गोष्ट येथील लोकांस नवलाची वाटणार नाहीं.

सुधारलेल्या राष्ट्रांतून मनुष्याची सुखसाधनें वाढतात त्या मानानें दुःखाचींही निराळीं साधनें वाढतात. अमेरिकेंत शिकागो शहरीं मजूरदार लोकांचा बंडावा उद्भवला आणि तो लष्करी गोळीबारा शिवाय बंद झाला नाहीं. सध्यां तिकडे मोठी चळवळ उडाली आहे. अद्याप शांतता ह्मणण्या सारखी झाली नाहीं. हाच प्रकार इंडियांत घडला असतां तर राजद्रोहाच्या अपराधाच्या मिषानें किती जण बळी पडले असते याचा नेम नाहीं!

पार्लमेंटामध्यें इंडिया संबंधानें कळकळ वाळगणारी जी मंडळी आहे तिनें आपला उद्योग फार चांगला चालविला आहे. या देशाचा अवाढव्य व वाढता खर्च पुष्कळ विनाकारण होत असतो आणि सिव्हील व लष्करी खात्यांतून खर्च कमी करण्यास अनेक व बहुविध वाटा आहेत असें त्या मंडळीनें उत्तम प्रकारें सिद्ध करून दाखविलें आहे. परंतु ही विचाराची बाजू आंग्लो इंडियन राज्यकर्त्यांस अगदीं मान्य नाहीं. त्यांची सगळी बकदृष्टी चैनीच्या व स्वकीय वैभववृद्धीच्या व राज्यविस्ताराच्या तत्वाची असून तिच्या पायीं हा देश बुडाला तरीं हरकत नाहीं. सर्वंकष साम्राज्याची सार्वभौमिक राजनीती निराळी कोठून असणार!

अतिवृष्टीचे भयंकर परिणाम

मुंबई, २४।७।९४

गेल्या आठरावे तारखे पासून अति वृष्टीमुळें त्राहि भगवान त्राहि भगवान असें झालें आहे. गुजराथ, कोंकण, नाशिक, खांदेश वगैरे प्रांतात जो कहर उसळला आहे ता फारच हृदय द्रावक आहे! बी. बी. सी. आय. रेल्वे कंपनीचे जे लोह मार्ग आहेत ते बिलिमोरिया, अमलसाड, भरोच वगैरे ठिकाणीं पार वाहून गेले आहेत. त्यामुळें आगगाड्यांचें जाणें येणें बंद पडलें आहे. तापी, मही, अंबिका, साबरमती, नर्मदा वगैरे महा नद्यांना अदृष्टपूर्व असें महापूर आलेले आहेत. तापी नदीमध्यें तर हल्लीं ९८ फूट पाणी आहे. सुरत शहराचा बराच भाग पाण्यांत बुडालेला आहे. शहरांत जाण्या येण्याचा, हिंडण्या फिरण्याचा मार्ग जलोप्लावृत झाल्यामुळें नौकेमधून सर्व व्यापार करावा लागतो! त्यांतून पर्णतृणकुटिके मधून राहणारे, दिवसा काबाड कष्ट करून उदरनिर्वाह करणारे बिचारे गरीब लोकांचे हाल होताहेत. घंडीवाऱ्यामध्यें, पावसाची वरून मुसळधार कोसळतच आहे अशा स्थितींत कोठें तरी निवाऱ्याची जागा पाहून दिवस कंठीत आहेत! तारायंत्रे वाहून गेल्यामुळें संदेश पोंचविण्याचीही अडचण येऊन पडली आहे. कित्येक ठिकाणीं पुलांनाही धक्का पोंचला आहे. त्यामुळें आगगाड्या नेण्याचें धोक्याचें झालें आहे. तरी रेल्वे अधिकाऱ्यांनीं वेळींच सावध होऊन हर प्रयत्न चालविले आहेत. सुरत शहरांत तापीला १८८३त असाच महापूर आला होता. परंतु चालू सालच्या पुराचें स्वरूप त्यांहून ही विक्राळ आहे असें समजतें. ही सर्व शुक्रवार, शनिवार ह्मणजे तारीख २०।२१ या मधील स्थिति आहे. जीवनाश झाला किंवा नाहीं व तो किती झाला हें अद्याप समजलें नाहीं. परंतु मालमत्तेचें व व्यापाराचें अति नुकसान झालें आहे असें कळतें! गोध्रा गोंडाल रेल्वेवर ही अशीच शोचनीय स्थिति झालेली आहे. असें ऐकिवांत येतें! जी. आय. पी. आर. रेल्वे लायनीवर हीच दशा आहे. मुंबई जवळ मुंब्रा ह्मणून जें स्टेशन आहे. तेथील खाडीवर जो पूल आहे तो पाण्यांत पार बुडून गेला होता. त्यावर पांच फूट पाणी चढलें होतें. त्यामुळें शुक्रवारची रायचूर मेल ट्रेन त्या ठिकाणीं थांबवावी लागली. रेल्वे अधिकाऱ्यांनीं पुलाला कांहीं धक्का नाहीं अशी खात्री करून घेतल्यावर मग मेल पुढें नेली. यामुळें ती ट्रेन वेळेपेक्षां २।३ तासांनीं उशीरा मुंबईस येऊन दाखल झाली. मुंब्रा स्टेशना जवळच खाडीच्या किनाऱ्या नजीक अमेरिकन मिशनरीची एक तेलाची गिरणी नुकतीच उभारलेली आहे त्यामध्यें तर पाणी सरासरी ९।१० फूट झालें होतें! ठाण्याहून मुंबईला जाणारा जो साधा रस्ता आहे तो ही २।३ मैल पर्यंत सर्व बुडाला होता. कल्याणास तर फारच अनर्थ उडाला आहे. कल्याणचे स्टेशनाच्या प्लॅट फार्मवरही कल्याणची खाडी अतोनात फुगल्यामुळें कित्येक इंच पाणी आलें होतें. स्टेशन मास्तर मि० ब्रॅन्ड यांच्या बंगल्यांत पाणीच पाणी झाल्यामुळें त्यांना त्याची आशा सोडून स्टेशनावरच एका खोलींत वसतिस्थानाची योजना करावी लागली! गावांत तर कहरच उडाला आहे. गरीब लोकांच्या लहानशा झोंपड्यांचा नापत्ता झाला आहे. गांव सर्वत्र जळमय झालें आहे. होड्यांतून व्यवहार चालतो. स्टेशन मास्तरावरच जो प्रसंग गुदरला होता त्याचा पूर्ण अनुभव आल्यामुळें त्यांना गरीबांची करुणा आली असें वाटतें. व ह्मणूनच गोरगरिबांना त्यांनीं मालगाडीच्या रिकाम्या डब्यांत राहण्याची परवानगी शुक्रवारीं उदार मनानें दिली! हें वाचून कोणास आनंद व समाधान वाटणार नाहीं बरें! कल्याणच्या खाडीच्या प्रवाहांत मोठमोठाले वृक्ष, बैल, गाई, ह्मशी शेळ्या, वासरें वगैरे निरुपद्रवी पण उपयोगी प्राण्यांची मेंसूर प्रेतें प्रवाहाच्या वेगानें उलथी पालथी होत, गटंगळ्या खात जात जारानें वाहात चाललीं हातीं तो देखावा पाहून अंगावर भीतिजनक रोमांच उभे रहात! व हृदय विदीर्ण होऊन जाई! नद्यांना व खाड्यांनां जे हे महापूर लोटले आहेत त्यांचें मुख्य कारण थळ घाट व बोरघाट यामध्यें ह्मणजे सह्याद्रि, सातपुडा वगैरे पर्वतांमध्यें अतिवृष्टि हें होय! लहान ओहोळ सुद्धां नदी प्रमाणें झाले! मग असले भयंकर पूर नद्यांना व खाड्यांना आले त्यांत नवल तें काय!

पंजाबांत नद्यांच्या पुरानें लोक हवालदील झाले आहेत. आणि वायव्यकडील प्रांतांत गोहना सरोसर फुटून सर्व प्रदेश जलमय होईल अशा दहशतीनें लोक परमेश्वरावर हवाला ठेऊन स्वस्थ आहेत!

The Berar Samachar

MONDAY JULY, 30, 1894

The growth of population is a good presumption or rather a serviceable guess of a nation's properity. It is not however a sure index. Often times it is a false standard to measure the well being of a country. India, for example, serves a striking illustration of the exception. The decenial census of India in 1891 shows a steady increase in population at the average rate of one per cent per annum. With all this gradual rise in population. the nation has not witnessed a prosperous and thriving condition. The national exchequer is fast sinking, the people have no staying power in them and a bad harvest or a famine year is enough to starve them to death. These stern facts falsify the Anglo—Indian tale of India's material advancement. The argument is thus founded. Take a nation that has prospered well during tho last ten or twenty years. The Anglo— Indians generally select England or France. Find out the growth of its population and compare it with that of India. The totals of both countries retain the same proportion and hence advert to the sameness of condition and circumstances But here lurks a fallacy in the figures of the statistics themselves.

The detection of the illusion is a work of skill and deep insight into the details. Mr. Vishnu Moreshwar Mahajani M. A. has dealt with the same subject in his lecture on 22nd instant and it is well to advertize what strange facts an Indian census reveals. In 1881 the population was 25.3 crores and it has reached the grand figure of 28.75 crores. The leoturer put to his audience the significant question.— Is mere increase satisfactory ? He evidently answered no. We would here follow in the main his thread of argument. Increase in population is no satisfaction because the people are less and less comfortable In round numbers the growth in ten years is 11 per—cent. The growth is but an excess of births over deaths. This may be the same though there are different sets of births and deaths It is a rule of pure substraction. The same balance is left below when the difference between two numbers in any select couple is the same throughout. A small number of births accompanied by a small number of deaths will give the same excess as when we deduct a large number of deaths from a large number of births. The arithmetical calculations give the same result though we have dealt with different sets of numbers. In India, our substractions teem with very large numbers while in European countries the numbers are of lower digits. This is the point of difference to be noted. Where men are born in large numbers and die in large numbers there is a constant waste of vital energy. A mother that has 2 children living out of 3 must bless hereself and her family while a mother that has 2 children out of 10 will cripple herself a great deal and create a family of weak dregs of children. What stands good with one mother holds equally with a nation. A mother constitutes a family and families constitute a nation. The following figures are at once instructive and point to the selt same conclusion.

	Birth per 1000	Deaths per 1000
Europe	38	28
England	35	21
France	32	23
India	44	34
Russia	49	35

From these figures, one will perceive at a glance that Russia is more Asiatic that *European*. Russia however shows the largest excess of births over deaths. Next to Russia stands India where births and deaths occur in large numbers and leave the same excess of population as is fonnd in more economic countries of Europe.

Why them are there fewer births and fewer deaths in Europe and not so in India ? The causes are many and all are not perceptible. The climatic conditions cannot be helped. But it is the social causes that we can mend. But for want of space we are forced to reserve them to a second occasion. Let us note however that there are remedies at our oommand and we shall not be worthy citizens if we each and all shall not cultivate an ambition of giving India robust

and intelligent, people who shall occupy a high stage in the scale of other nations.

The well—being of India does not depend upon mere numbers. It depends upon the comfort and happiness each enjoys; and the avarage age of a nation is a good index to it. The average expectation of life in India is very low. It is 25 while in Europe it is 40. The low standard of life works out all evils that can befal a nation. Rao Bahadur Ranade has already shown that India's loss from early deaths of her worthier sons is an irreparable loss. It is in fact a full signal measure of loss of wisdom and experience. The wisdom and experience diesaway at its very development and it leaves therefore no hope of building a nation. It is this melancholy fact that we ought to learn first if we ever hope to live a national life of free and loyal British subjects.)

The Sanitary Commissioner has vastly dealt with the progress of sanitation within the limitts of municipal towns in Berar. From the portion that gives full details about sanitary works our towns—people should learn that the Sanitary Commissioner objects to the drainage in it present form as a defective one The following are the details which we would like our people to master because the question of drainge is one that is most likely to attract their attention when the scheme of water—supply will come in the full swing of regular usefulness:—

"A sum of Rs. 649-13-0 was spent on new works. The drainage of this town is very defective, sullage water is received into reserviors, the contents of which are supposed to be carted away daily, but as a matter of fact the establishment is insufficient to remove this house sullage completely, and most of it overflows and sinks into the ground round the reserviors. The municipality plead inability to meet the great expense involved in a carriage system, which, at the best, is unsatisfactory. All available money has been given towards the new water-supply, but this will scarcely prove an unmixed blessing if the added water brought into the town cannot be got rid of by drainage. The municipality are quite alive to this fact, and proposals were recently made to run the drainage into the river, but against which a very strong sanitary opinion was expressed. The committee seem to have exhausted their credit on the loan for water-supply and cannot see their way to raising the necessary funds for a scheme for delivering the drainage free of the town where it will do no harm. If the drainage is carried into the river a grave nuisance will probably result."

From the annual report of Vaccination for 1893—94 we learn that the department has not made a successful progress this year. But the result is due to some unusual difficulties in the way of its work. We quote below the remarks of the Sanitary Commissioner which will point out that infantile vaccination is more in the pursuit of the department and that the process of re—vaccination has not met with the appreciation of the general masses.

"Infantile vaccination is considered the first duty of the vaccinator, and the standard of protection in primary vaccination to which he is pressed to work up to is 40 per 1000 of the population. As a rule, all the available infants in a village are first protected before re-vaccination is attempted.

In primary vaccination, the percentage of success was 95·1, and in re-vaccination 21·2. For the previous year, the rate of success was 94·7 for primary and 24·8 for re-vaccination. Thus the rate of success in primary vaccination was slightly higher than last year, but lower as regards re-vaccination: the error here, however, is generally on the side of too high a rate, and with regard to authenticated cases of re-vaccination elsewhere in persons possessing good primary vaccination cicatrices, the result in revaccination should not exceed 25 per cent. of success, being inversely proportionate to the number and quality of the vaccination cicatrices."

The 'Power' a new weekly at Calcutta has a suggestive paragraph of the present mode of treatment which the Anglo—Indians seem to show to the sons of the soil. It runs as follows:—

"But all this is now changed. The Anglo-Indian administrator of the present day hates the very sight of Indians. He has not a single drop of sympathy for this dark—skinned people. He does his work from day to day like a machine, but he never takes the trouble to do anything more. He is not less able than his predecessor but he is far less successful as an administrator. He looks neither forward nor backward; his sole thought is for the present and he cares not if after him the deluge comes. Above all, he despises educated Indians who alone are in a position to interpret the wishes and wants of their countrymen, so that bereft of the light of enlightened public opinion, he has to grope in the 'dark and often stumbles in the way. After this, small wonder if British rule is not as successful as it might be."

A successful administration is a work of deep sympathy and clear insight into the wants of the people. False independence and self—arrogance betray the total absence of them.

NOTICE

It is hereby published for general information that the list of voters for Ward No. II prepared under Rule 6 of the Municipal election rules are posted as required by rule 7 at the following places.

The persons entitled to vote under rule 3 in that ward are requested to see their names included in the lists posted and make complaints if there be any under rule 8 and also to choose ward in which they choose to vote in case they are entitled to vote in two wards before the 10th. of August 1894.

The Deputy Commissioner's office
Small Cause Court
Tahasili
Patel Chawaris
Police Stations
Cotton and Grain Markets
Morna Bridge

D. G. Patvardhan
Secretary
A. M. C.

वऱ्हाड.

हवामान—या आठवड्यांत पाऊस व उघाडी चांगली आहे. शेत कामें झपाट्यानें चालू आहेत. एकंदर पाऊस १८ इंच पाऊस झाला. रोगराई विशेष नाहीं.

दुरुस्ती— वऱ्हाड समाचारच्या तारीख १६ जूलैच्या अंकांत तिसऱ्या पृष्ठावर तिसरें कालमांतील ३४।३५ ओळींच्या ऐवजीं "डेपुटी कमिशनर साहेब जिल्हा इलिचपूर यांचें कोर्टांत" असें वाचावें.

मि. एस. श्रीनिवासलू नायडू एक्स्ट्रा असि. कानसरव्हेटर, उमरावती यांस गेल्या पंधरावे तारखे पासून दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाली आणि त्यांच्या रजेंत मि० वुडपिपसन असि. कानसरव्हेटर यांस इलिचपुराहुन उमरावतीस बदलले.

यवतमाळ व वाशिम या जिल्ह्यांतील बंजारी लोकांच्या तांड्यावर सक्त पैरवी ठेवण्या साठीं व दरोडे घालण्याच्या कामांतील यांच्या चलनवलनावर प्रतिबंध ठेवण्यासाठीं नवीन नऊ पोलीस ठाणीं करण्यांत आलीं आहेत. प्रत्येक पोलीस स्टेशनाला दोन कान्स्टेबल दरमहा १७ रु. १४ आ. ८ पै खर्चाचे देण्यांत येऊन त्यांचा खर्च त्या बंजारी लोकांकडून वसूल केला जाईल. असा कडक बंदोबस्त करण्याचें श्रेय कर्नल लेन साहेबांस आहे. पोलीस ठाणीं नवीन खालील गांवांत बसविलीं आहेतः— नेर, कूळगांव, दारव्हा, बाभूळगांव यवतमाळ, पूसद, मानोरा, मंगरूळ व महागांव.

डाक्टर रेली सिव्हील सर्जन, आकोला हे रजेवरून परत आल्या नंतर आक्टींग आपथेकरी जे. मारिसन हे बुलढाण्यास, बुलढाण्याचे मांटगोमरी हे वाशिमास, आणि वाशिमचे डाक्टर जोन्स हे यवतमाळास सिव्हील सर्जनचे कामीं बदलले जाऊन वाशिमचे आपथेकरी ब्राऊन हे परत आपल्या लष्करी खात्यांत जातील.

आगष्ट १५ तारखे पासून रजिस्ट्रेशनचे कामानिमित्त इंगोल्च्या छावणीचा एक निराळा सब—डिस्ट्रिक्ट करून वाशिम जिल्ह्या खालीं दिला आहे. आणि तसेंच औरंगाबाद, जालना व मोमिनाबाद येथील छावण्यांचा एक स्वतंत्र रजिस्ट्रेशन—जिल्हा बनविला असून छावणी—मजिस्ट्रेट यांसच जिल्हा—रजिस्ट्रार नेमिलें आहे.

मि. सिम्पसन असि. कमिशनर, आकोला हे तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर विलायतेस रवाना झाले.

कांहीं एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरच्या बदल्या विषयीं वाटाघाट चालू आहे.

हैदराबादचे एक नवाब सरकारी कामा निमित्त आकोल्यास येऊन तीन महिने राहणार आहेत असें कळतें.

असें कळतें कीं मि. एदलजी संजाना यांची तेल्हाऱ्यास, मि. देवराव जयकृष्ण यांची मोशींस व मि. त्रिंबक गणेश यांची एलिचपुरास बदली होणार आहे. प. सिं.

नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या व पिठोरी किंवा पाठोरा हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्या पेक्षा त्यांत फरक करून किंमतही कमी करून उत्तम प्रकारचीं छपलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर पैसे पाठविले असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. किंवा व्हेल्यूपेबलनेंही पाठवूं. चित्राचा दर शेंकडा १।, रुपया प्रमाणें पडेल.

बाळकृष्ण अनंत दलाल कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिसांत मिळतील.

नोटीस.

लालखा वलद शेरखा मुसलमान राहणार कुऱ्हा तालुके चांदूर यास खिवराज व. लीला. धर वलद उत्तमचंद मारवाडी दुकान कुऱ्हा तालुके चांदूर यांजकडून या नोटिसीनें असें कळविण्यांत येतें कीं तुह्मी आह्मा पासून तारीख ६।८।९३ रोजीं ४९० चारशें नव्वद रुपये घेऊन सही करून दिली. ते रुपये तुह्मी दरमहा दर शेंकडा २ दोन रुपये व्याजानें आह्मी मागू त्या दिवशीं परत देंण्याचें कबूल केलें. आह्मी रुपये मागत असतां तुह्मी देत नाहीं तरी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत व्याजा सुद्धा रुपये देऊन आमची पावती घ्यावी. नाहीं तर रिती प्रमाणें फिर्याद करून कोर्ट खर्च सुद्धां रुपये घेतले जातील. कळावें तारीख २९ जुलाई सन १८९४ इ०

(सही)

खिवराज व लीलाधर तर्फे मुखत्यार
श्रीराम मोतीराम खत्री दस्तुर खुद्द

नोटिस.

या नोटिसीनें सर्वत्रांस कळविण्यांत येतें कीं निवडणुकीचें नियमा पैकीं नियम ६ प्रमाणें वार्ड नंबर २ करितां तयार केलेल्या मत देणाराच्या यादी नियम ७ प्रमाणें खालील ठिकाणीं लाविल्या आहेत. नियम ३ प्रमाणें सदर्हु वार्डांत ज्यांना मत देण्याचा अधिकार आहे अशा गृहस्थांस विनंती करण्यांत येतें कीं त्यांनीं आपलीं नांवें सदर्हू यादींत दाखल केलीं आहेत किंवा नाहींत हें पहावें. आणि नियम ८ प्रमाणें कांहीं तक्रार असल्यास ती आणि ज्यांना दोन वार्डांत मत देण्याचा अधिकार आहे त्यांनीं आपण कोणत्या वार्डांत मत देणार हे तारीख १० आगष्टचे आंत कळवावें.

डेपुटी कमिशनर कचेरी.
स्माल कान कोर्ट.
तहसिली.
चावड्या.
पोलीस स्टेशनें.
कापूस आणि ग्रेनमार्किटें.
लोखंडी पूल.

D. G. Patwardhan
Secretary M. C.
Akola

वर्तमानसार.

गोहना तलाव लौकर फुटला जाऊन, मोठा भयंकर प्रळय होण्याची भीति दिवसेंदिवस वस वाढत जाण्यास सबळ कारण उत्पन्न होत आहे तसें होऊन लोक पळून जातील तेव्हां जावोत, परंतु हल्लीं तो तलाव पहाण्यासाठीं युरोपियनांच्या झुंडीच्या झुंडी जात आहेत, व त्यांस सामान पुरविण्याचें तेथील रहिवाशांना भाग पडत असल्यामुळें, त्यांना आतांच पळून जाण्याचा प्रसंग आला आहे असें कळतें.

जबलपुराकडील 'तबलीग' नांवाच्या उर्दू पत्रावरून कळतें कीं, सिहोरा तालुक्यांतील मझौली गांवाहून एक स्त्री दुसऱ्या गांवास जात आहे अशी पाळत ठेऊन, एक मनुष्य कुऱ्हाड घेऊन तिच्या मागोमाग गेला. आणि निर्जन प्रदेश पाहून त्यानें तिला गांठलें ती निरुपाय होऊन, त्यानें सांगितल्याप्रमाणें मुकाट्यानें तिनें आपले सर्व डागीने वगैरे त्याच्या स्वाधीन केलें. एवढ्यानेंही संतोषित न होतां तो तिचें लुगडें मागूं लागला. परंतु नग्न होणें बरें नाहीं असें तिनें त्याला समजून सांगून, तूं आपलें कुडतें देशील तर तें नेसून, मी आपलें लुगडें तुला देतें" हें त्यानें त्यानें कबूल करून हातांतील कुऱ्हाड खालीं ठेऊन तो कुडतें काढूं लागला, इतक्यांत त्या स्त्रीनें चपळाईनें त्याच कुऱ्हाडीचा घाव करून त्यास ठार केलें. त्या स्त्रीस पकडलें असून हल्लीं खटला सुरू असल्याचें कळतें. काय न्याय होतो तो पहावा.

दार्दनस सामुद्रधुनीवर टर्कीचा अधिकार आहे. परंतु आजपर्यंत टर्कीकडून रशियाच्या जाण्या येण्यास कांहीं प्रतिबंध झाला नसून, इंग्रजांची आगबोट जात असतां, तिला मात्र हल्लीं प्रतिबंध करण्यांत आला आहे. टर्कीचें ह्मणणें कीं, आगबोटी वरील माल जोंपर्यंत उतरण्यांत येत नाहीं तोंपर्यंत आगबोट पुढें जाण्यास हुकूम मिळणार नाहीं. पहावें पुढें काय होतें तें.

काश्मीर पंजाबांत दिवसेंदिवस नद्यांना पूर येण्याचा प्रलय चालला आहे. त्यामुळें ठिकठिकाणच्या रेलवेच्या पुलांना धक्के पोंचत आहेत. लोक हवालदील झाले आहेत. आणखी एक महिनाभर तरी ही काळजी मिटणार नाहीं असें अनुमान करण्यांत आलें आहे.

मद्रासेकडील तिनवेली प्रांतांत यंदा दुष्काळ पडेल असें अनुमान असल्यावरून, आतांपासून त्या प्रांतांतील लोकांना विहिरी खोदण्याची परवानगी द्यावी असें तिकडच्या अधिकाऱ्यांनीं वरिष्ठ सरकारास लिहिलें आहे.

सिंध-सागर रेलवेचा कांहीं भाग पुरानें वाहून गेला आहे.

हिंदुस्थानच्या सरकारी जमाखर्चावर लौकरच पार्लमेंटांत विचार होणार आहे.

पासिफिक महासागरांत असलेलें हावाई बंदरावर, गेल्या ४थ्या तारखेपासून प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाल्याचें, परवाच्या तारेवरून कळतें.

इजिप्सीयन कापसाची लावणी, पंजाबांत केल्यापासून ती हल्लीं फायदेशीर होऊं लागली आहे.

अतिशय पाऊस पडल्यामुळें अफगाण सरहद्दीवरील रेलवेवरील खोलकच्या बाजूचे बोगद्याचें तोंड ढासळल्यामुळें, रस्ता बंद झाला आहे. चालूं होण्यास बरेच दिवस लागतील. असें दिसतें.

गोहना तलाव, एक महिनासुद्धां फुटण्याचा अवकाश धरणार नाहीं असें ताज्या तारेवरून कळतें. तसा प्रसंग आल्यास लोकांस लौकर पळून जातां यावें ह्मणून, त्याच्या नजीक असलेल्या दोन रेलवेवर, दोन स्पेशल ट्रेनी कायम ठेवण्यांत आल्या आहेत.

श्रीस. वि.

हिंदु देवतांच्या तसबिरा व मुर्ती विलायेतहून येऊन हिंदुस्थानांत विकूं लागल्या आहेत. छे. छे. हिंदुनो शिपीभर पाण्यांत जीव द्या.

गेल्या २६ आणि २७ तारखेस लोकांस न समजूं देतां पलटणीस तयार रहावें असा केल्यास हुकूम झाल्याचें ऐकण्यांत आलें कां! धामधूम तर कोठे दिसत नाहीं.

बंगाल इलाख्यांत बाकरगंज बयना नांवाच्या गांवीं एक आठ वर्षाचा मुलगा आहे त्याला चार इंच लांबीचें शेंपूट फुटलें आहे. सु० प०

सिंधसागर रेलवेचा हरपूर व खुशाब यांच्या दरम्यानचा रस्ता महापुरानें खराब झाला असून दुरुस्त करण्याचें काम चालूं आहे.

असमार सरहद्दीवरील बंदोबस्त जास्त मजबूत करण्याकरितां एक कंदहारी व एक तुर्कस्थानी अशा दोन पलटणी जलालाबाद येथें आल्या व तेथें थोडा मुक्काम करून असमार येथें जाण्या करतां निघून गेल्या. या पलटणी छपन सराईतल्या दांडग्या डोंगरी लोकांस शासन करून ताळ्यावर आणण्याचें काम करणार आहेत.

जांडालच्या उमरखानानें आपली फौज हूर्णे रस्त्यावर सज्ज करून ठेविली आहे व त्याचा हल्ला करण्याचा इरादा आहे असें समजून अफगाण सरदार जनरल गुलाम हैदर यांणेंही असमारच्या किल्ल्यांत फौजेची जास्त तयारी चालविली आहे.

खोलंग खिंडींत डोंगरांची एक मोठी दरड ढासळून ९ मांणसें, ७ घोडे व हजारों मेंढरें ठार झालीं.

कोरियाच्या दरबारीं असलेला इंग्रजसरकारचा राजकीय वकील व त्याची बायको यांस कोरियाच्या हद्दींत असणाऱ्या जपानी लोकांनीं मारहाण केली व त्या करतां त्या हद्दींत असणाऱ्या इंग्रजमाणसांच्या संरक्षणा करतां. म्हणून इंग्रजांचे कांहीं लोक गलबतावरून त्या देशांत उतरले आहेत.

काश्मीर व गिलजित यांच्या दरम्यान तारायंत्र तयार होऊन बातम्या जाण्या येण्याचें काम सुरू झालें.

दक्षण चित्रळ देशावर हल्ला करण्याचा जांडोलच्या उमराखानचा हेतु दिसत असल्यामुळें त्याच्या व्यवस्थेकरतां इंग्रज कामदार क्यायंगहसबंड हा चित्रळ येथें गेला आहे.

पंजाबांत धान्याची स्वस्ताई झाली आहे व त्या मुळें त्या इलाख्यांतील कैद्यांस खाणें देण्याच्या कामांत त्या सरकारचा कित्येक लाख रुपयांचा फायदा होईल असें सांगतात.

उमेरिया नांवाच्या खाणीचें काम सरकारांतून न चालवितां कोणा व्यापाऱ्याच्या ताब्यांतच द्यावें अशा बद्दल हिंदुस्थानसरकार व स्टेट सेक्रेटरी यांच्या दरम्यान एक पत्रव्यवहार सुरू आहे.

गोवधाच्या संबंधानें बरेलीच्या लोकांनीं कलकत्याच्या सभेमार्फत सरकारास जो एक अर्ज केला त्याच्या खरेपणाविषयीं शंका येऊन त्याची खात्री करून घेण्याकरतां तो सरकारानें बरेलीच्या कमिशनराकडे पाठविला. कमिशनरानें तारीख १६ रोजीं चवकशी सुरू केली. कमिशनरापुढें १,००० हिंदु लोक जमले होते. संभावित अशा सुमारें ५० हिंदु लोकांचे कमिशनरानें जबाब घेतले व त्यावरून तो अर्ज खरा आहे व तो बरेलीच्या लोकांस कबूल आहे अशी कमिशनराची खात्री झाली व जास्त चवकशीचें काम ता० १९ पर्यंत तहकूब ठेवलें होतें.

लाहोर येथें होणाऱ्या दरबारांत पंजाबांतले सर्व संस्थानिक हजर राहावयाचे असून काश्मीरचे महाराजही यावयाचे आहेत. त्याच प्रमाणें पुष्कळ इंग्रजी फौज हजर राहावयाची असून पंजाबांतले संस्थानिक व काश्मीरचे महाराज यांच्याकडून इंम्पेरियल कामाकरतां जी फौज देण्यांत आलेली आहे त्यापैकीं ही ५००० फौज हजर राहावयाची आहे. एकंदरीनें हा दरबार फार भपकेदार होणार आहे. ठा. अ.

ब्यारिस्टरास दंड—अलहाबादचे डिस्ट्रिक्ट मानिस्ट्रेट यांनीं आपल्या कचेरीं वरून कोणी गाडी नेऊं नये असा नियम केला आहे, तो अमलांत आणण्यासाठीं शिपाई बसलेला असतो. एकदा मि. ब्रायन ओकानोर नांवाचे ब्यारिस्टर त्या कचेरीवरून गाडींतून जात असतां त्यांची गाडी शिपायानें अडविली. त्यामुळें ब्यारिस्टर साहेबांनीं सदर शिपायाच्या तोंडांत मारलीं. ह्या अपराधाबद्दल डि. मा. नी सदर ब्यारिस्टरांस ५ रुपये दंड केला. ब्यारिस्टरांस जेथें दंड झाला तेथें गरीब नेटिवांचें काय चालणार!

जपानचें कापड परदेशी जाऊं लागलें—ह्या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत जपाहून चिनांत ४६५७ डालर किमतीचें २९३४३० पौंड कापड सूत चिनांत गेलें. जपानांतल्या गिरण्यांचें कापड सूत बाहेर जाण्याचा हा आरंभ आहे.

गोरी पेढी बुडाली— इंग्लंड देशांत निळीचा मोठा व्यापार करणारी मेसर्स अनर्स पासेन आणि कंपनी ही पेढी बुडाली. ह्या पेढीस १००००० पौंड देणें झालें आहे. दंदी येथील कित्येक पेढ्यांचें दिवाळें निघालें आणि निळीचा भाव उतरल्यामुळें ह्या कंपनीचें दिवाळें निघालें असें लंडनाहून आलेल्या तारेवरून समजतें. शु० सू०

ब्रह्मदेशांत हिऱ्या माणकाच्या खाणी आहेत असें समजून आमचे इंग्रज सरकारानीं तो देश हस्तगत करून घेतला. परंतु आतां आलेल्या अनुभवावरून असें दिसून येतें कीं, तेथें तसें मौल्यवान जिन्नस नसून इमारती लांकडें मात्र विपूल आहेत, याच्या उत्पन्नापासून तेथील राज्यव्यवस्था चालविण्यास लागणारा खर्च ही निघण्याची मारामार पडेल असें ह्मणतात.

मुसलमान लोकांस मद्रासेकडे खादयानी नांवाचा एक नवाच पंथ उपस्थित झाला आहे. त्याविरुद्ध गेल्या कत्तलच्या रात्रीस कांहीं मुसलमानांनीं एक निंदेचा फार्स केल्यामुळें, त्यांच्यावर फिर्याद होणार आहे.

NEARYL READY

CRIMINAL COURT MANUAL.

for the

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.

घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे (ह्मणजे चक्रांचें खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलायती काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें विश्वांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुरुस्ती घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र कपाटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक

किंमत १० आणे

गुरुचरित्र

पांच किंवा जास्त प्रती एकदम घेणारास दर प्रतीस

आठ आणे

हा ग्रंथ आज पर्यंत ८।१४ आण्यास मिळत होता. त्याच्या आतां फारच थोड्या प्रती शिल्लक आहेत ग्राहकांनीं त्वरा करावी.

आर्य भूषण छापखाना, पुणें.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.